



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

■ अमरावती, रविवार ३१ ऑगस्ट २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०+४





## सरकारसोबतची पहिली बैठक अयशस्वी

### तुम्ही आमच्या जीवाशी खेळताय- जरांगे

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदान येथे मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले आहेत. त्याठिकाणी आज सरकारकडून



न्या. शिंदे आणि विभागीय आयुक्त चर्चेला गेले होते. मात्र शिंदे समितीसोबत झालेली पहिलीच चर्चा अयशस्वी झाली आहे. जरांगे यांनी उपोषण मागे घेण्यास नकार दिला आहे. हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेट लागू करण्यास वेळ देणार नाही. बॉम्बे सरकार, औंध संस्थान गॅझेटसाठी वेळ द्यायला तयार आहोत. मराठवाड्यातील सारे मराठा कुणबी ठरवा. मंत्रिमंडळाने उद्याच बैठक घ्यावी, सरकार, मंत्रिमंडळ, राज्यपाल सगळेच आहेत. १० मिनिटांत गॅझेट लागू होईल असं जरांगेंनी न्या. शिंदे यांच्याकडे मागणी केली. या चर्चेत मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा जीआर सरकारने काढावा. संभाजीनगरला १९३० साली १ लाख २३ हजार कुणबी होते. मराठवाड्यातील ९० वर्षापूर्वीचे कुणबी आता गेले कुठे? जालन्यात ९७ हजार कुणबी होते. कुणब्यांच्या प्रत्येक घरात पाच पाच मुलं गृहित धरा. सरकारने आता जास्त वेळ घेउ नये. तुम्ही आमच्या जीविताशी खेळताय. आता एक मिनिटही सरकारला वेळ देणार नाही. शिंदे समितीला चर्चेला पाठवणे म्हणजे विधानसभा, विधान परिषदेचा अपमान आहे. विधिमंडळ कायदे मंडळाचा अपमान करण्याचं काम देवेंद्र फडणवीस करत आहेत असा आरोप त्यांनी केला. तर काही प्रमाणात जरांगे पाटील यांचं समाधान झाले आहे. काही गोष्टींना तत्वतः मान्यता दिली आहे. जरांगेंनी मांडलेले मुद्दे मंत्रिमंडळासमोर ठेवले जातील. हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाचा आहे. तो माझा नाही. त्यामुळे मी सध्या यावर बोलणार नाही. जे काही मुद्दे चर्चेत आले त्याबाबत उपसमितीच्या अध्यक्षांना कळवणार आहे असं जरांगेसोबत चर्चा करण्यासाठी आलेल्या न्या. शिंदे यांनी म्हटलं. दरम्यान, आम्हाला ६ महिन्याचा वेळ द्या अशी समितीची मागणी होते. प्रक्रियेसाठी वेळ लागेल तो द्यावा. सरसकट संपूर्ण समाजाला प्रमाणपत्र देता येणार नाही असं शिंदे समितीचे चर्चेत सांगितले. तर मागासवर्गीय आयोग सोडून इतर कुठल्याही मागणीसाठी वेळ देणार नाही अशी भूमिका जरांगे यांनी घेतली. पुढच्या शनिवारी, रविवारी एकही मराठा घरात दिसणार नाही. मराठवाड्यातील सर्व मराठा समाज कुणबी असून त्यांना उद्यापासून प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात करा. मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्यांच्या वारसांना सरकारी नोकरी आणि १० लाखांची मदत द्यावी. ५८ लाख नोंदीचा आधार घेत मराठा कुणबी एकच असल्याच जीआर काढा, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं.

## मराठ्यांच्या प्रश्नावर सरकार सकारात्मक

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील हे मुंबईतील आझाद मैदानात आंदोलनाला बसले आहेत. करोडो मराठा आंदोलक मुंबईत ठाण मांडून आहेत. आरक्षण घेवूनच मुंबई सोडणार असल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी मांडली.



या सर्व आंदोलनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. 'सर्व समाजाला समान वागणूक दिली जात आहे. मराठा आरक्षणाबाबत आम्ही सकारात्मक आहोत,' असं स्पष्ट करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली. 'लोकशाही पद्धतीनं आंदोलन चालत असेल तर त्याला मनाई नाही. सरकारच्या वतीनं त्यांना सहकार्य केलं जात आहे. आंदोलकही सहकार्य करत आहेत. वाहतूक कोंडी झाली हे मात्र नक्की आहे. काही लोक हे वेगळ्या पद्धतीनं वागतात. अशा लोकांकडं लक्ष दिलं पाहिजे. मनोज जरांगे पाटील यांनी देखील सहकार्य करण्याचं आवाहन आंदोलकांना केलं आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रशासन काम करत आहे. त्यामुळं आमच्यावरही काही बंधनं आहेत,' असं म्हणत शांततेच्या मार्गानं आंदोलन करण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. 'मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनासाठी पुन्हा परवानगीसाठी अर्ज केला आहे. कायद्याच्या चौकटीत राहून प्रशासन निर्णय घेणार आहे.

# 7 वर्षांनी पंतप्रधान मोदी चीनला पोहचले

■ रेड कार्पेटवर भव्य स्वागत ■ पुतिन-जिनपिंग यांना भेटणार




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी २ दिवसीय जपान दौरा संपवून टोकियोवरून चीनच्या तिआनजिन शहरात पोहचले. याठिकाणी शिखर संमेलनात ते सहभागी होणार आहेत. त्याशिवाय या संमेलनाच्या निमित्ताने रशियाचे राष्ट्रपती व्लादीमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबतही मोदी यांची भेट होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या एक्स पोस्टमधून चीनला पोहचल्याची माहिती दिली. इथल्या एससीओ शिखर संमेलनात विविध देशातील प्रमुख नेत्यांसोबत चर्चा करण्यासाठी उत्सुक असल्याचे त्यांनी सांगितले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा चीनच्या तिआनजिन एअरपोर्टवर पोहचले. तिथे रेड कार्पेटवर मोदींचे भव्य स्वागत करण्यात आले. चिनी मंत्रिमंडळातील सदस्यांनी मोदींचे स्वागत केले. यावेळी विमानतळावर पारंपारिक नृत्यात त्यांचे स्वागत झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा चीन दौरा अशावेळी होत आहे जेव्हा जगातील बरेच देश ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे त्रस्त आहेत. अलीकडेच अमेरिकेने भारतावर ५० टक्के आणि चीनवर ३० टक्के टॅरिफ लागू केला आहे. चीनमध्ये ३१ ते १ सप्टेंबर या काळात च्क्र शिखर संमेलन होणार आहे. त्यात २० हून अधिक देशांचे प्रमुख नेते हजर राहतील.

**७ वर्षांनी चीन दौ-यावर-** २०१५ साली पहिल्यांदा पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी चीन दौ-यावर गेले होते. त्यावेळी स्वतः जिनपिंग यांनी उपस्थित राहून त्यांचे स्वागत केले. तेव्हा मोदींनी टेराकोर्ट वॉरियर्सला भेट दिली होती. त्यानंतर २०१६ साली मोदी हांगझोउ येथील जी २० संमेलनाला हजेरी लावली. त्यावेळी ओबामा, पुतिन यांच्यासोबत भेट झाली होती. २०१७ साली डोकलाम वादानंतर ब्रिक्स समिटमध्ये सहभागी व्हायला ते पुन्हा चीन दौ-यावर गेले. त्यावेळी पहिल्यांदाच घोषणा पत्रात पाकिस्तान सक्रिय असलेल्या दहशतवादी संघटनांचा उल्लेख झाला होता. २०१८ साली मोदी आणि जिनपिंग यांच्यात वुहान येथे भेट झाली होती. त्यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये करारांवर सही करण्याऐवजी फक्त चर्चा केली होती. २०१९ साली किंगदाओमध्ये च्क्र समिट झाले, तेव्हा भारताला पहिल्यांदा पूर्ण सदस्यत्व मिळाले. त्यावेळी भारताने क्ष्क्ष्ब्र च्या एडक्ष प्रकल्पाला विरोध केला होता.

दरम्यान, मागील महिन्यात परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी चीन दौरा केला होता. त्यावेळी त्यांनी शी जिनपिंग आणि परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्यासोबत भेट घेतली होती. जयशंकर यांच्या दौ-यात जल संसाधन डेटा शेअर करणे, व्यापारी निर्बंध, सीमेवरील तणाव कमी करणे, दहशतवादाविरोधात कठोर भूमिका घेणे यासारख्या मुद्द्यांवर चर्चा केली. या दौ-यातून मोदी यांच्या चीन दौ-याचा रोडमॅप तयार केल्याचे बोलले जाते. याआधी मोदी आणि जिनपिंग ऑक्टोबर २०२४ साली रशियाच्या कझानमधील ब्रिक्स संमेलनात भेटले होते. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय चर्चा झाली.

## आरोपीचा पोलिसांवर कोयत्याने हल्ला; पोलिसांनी थेट एन्काउंटरच केला;

### 4 पोलीस जखमी, साता-यात खळबळ

**सातारा**-जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. सातारा शहर पोलिसांवर पुणे येथील शिक्रापूरमध्ये हल्ला झाल्याची घटना घडली आहे. हल्ला करणा-या आरोपीचा शिक्रापूर येथे सातारा पोलिसांनी एन्काउंटर केला आहे. लखन भोसले असे एन्काउंटर झालेल्या आरोपीचे नाव आहे. जबरी चोरी प्रकरणात लखन भोसलेला अटक करण्यासाठी गेलेल्या चार पोलिसांवर त्याने हल्ला केला होता. हल्ल्यात सातारा पोलीस दलातील चार पोलीस गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी एन्काउंटर केलेला आरोपी लखन भोसले हा खटाव तालुक्यातील जयराम स्वामी वडगाव येथील रहिवासी आहे. लखन भोसलेवर सातारा जिल्ह्यासह सांगली जिल्ह्यात जबरी चोरीसह दरोड्याचे अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोन दिवसापूर्वी महिलेच्या गळ्यातील चेन स्नॅचिंग करु न फरार झालेल्या लखन भोसले या आरोपीला शोधण्यासाठी सातारा पोलिसांचे पथक शिक्रापूर येथे गेले असताना ही घटना घडली आहे.

## गृहमंत्री शाहांनी जाणून घेतली मराठा आंदोलनाची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी:** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह (ॠत्र्त्ञ्द्य च्ण्ठ्ठण्) हे सध्या मुंबईच्या दौ-यावर आहेत. काल (शुक्रवारी) रात्री त्यांचं आगमन झालं. दरवर्षीप्रमाणे यंदा देखील अमित शाह हे आज लालबागच्या राजाचं दर्शन घेणार आहे. यासह ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरी जाउन गणरायाचे दर्शन घेणार असल्याची माहिती आहे.

दरम्यान, मुंबई दौ-यावर असलेल्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भाजपचे विद्यमान राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्याशी चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे. राज्यातील मराठा आरक्षणासह, बिहार निवडणूक आणि उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीबाबतही चर्चा झाल्याचे बोललं जात आहे. सध्या मुंबईत सुरू असलेल्या मराठा आंदोलनाबाबतही अमित शाह यांनी विनोद तावडे यांच्याकडून माहिती जाणून घेतली. त्यामुळे या बैठकीत नेमकं काय ठरलं आणि सध्या सुरु असलेल्या आंदोलनावर काही तोडगा निघाला का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.



मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आजचा दुसरा दिवस. दुसरीकडे, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी कालपासून मुंबईच्या आझाद मौदानावर आमरण उपोषण सुरु केलं आहे. आज या उपोषणाचा दुसरा दिवस आहे. कोणत्याही परिस्थितीत आरक्षण घेतल्याशिवाय आता मुंबई सोडणार नसल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. सरकारनं मराठा समाजाला आरक्षण द्यावे असं जरांगे पाटील म्हणाले. उपोषणाला एकेक दिवस मुदवाढ देण्यापेक्षा कायमस्वरु पी दिली तरीही हे उपोषण निर्णय होईपर्यंत सुरु राहणार असल्याचे जरांगे म्हणाले. अशातच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा मुंबई दौरा महत्वाचा मनाला जातोय. परिणामी यावर काही तोडगा निघून आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागतो का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

सध्या मुंबईच्या दौ-यावर असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह अंधेरीत पहिल्यांदा गणपती मंडपात बाप्पाचे दर्शनासाठी येत असल्यामुळे अंधेरीकरांमध्ये मोठा उत्साह आहे. अमित शाह शनिवारी दुपारी दीड वाजता अंधेरी पूर्वेत ओल्ड नागरदास रोडवर असलेल्या मोगरेश्वर सार्वजनिक गणपती मंडपात विराजमान बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी येत आहेत.श्री मोगरेश्वर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून मागील ३० ते ३५ वर्षापासून गुजरात राज्याचे राज्यमंत्री पुरु षोत्तम भाई सोलंकी यांच्याकडून गणपती बाप्पा विराजमान होत आहे.



## कंटेनरने पायी चालणा-या भावीकांना चिरडले; 6 ठार

**बीड /प्रतिनिधी-**धुळे- सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर आज ३० ऑगस्ट रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातामध्ये भरधाव कंटेनरने सहा जणांना चिरडले. यात चौघांचा जागीच मृत्यू झाला तर दोघांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. हे सहा जण पेंडगाव येथील मारु तीच्या दर्शनाला जात होते. कंटेनरच्या दोन चालकांना बीड ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरू न पेंडगाव येथे असलेल्या मारु तीच्या दर्शनासाठी जात होते. नामलगाव येथील उड्डाणपूल ओलांडून ते पुढे असलेल्या जिनिंग जवळ चालत असताना पाठीमागून येत असलेल्या भरधाव कंटेनरने सहाही जणांना चिरडले. बीड येथील दिनेश दिलीप पवार, पवन शिवाजी जगताप,आकाश अर्जुन कोळसे,अनिकेत रोहिदास शिंदे,किशोर गुलाब तोर,विशाल श्रीकिशन काकडे असे या अपघातातील मृतांची नावे आहेत.

## मला खोलात जायला लावू नका

### *मराठा आरक्षणप्रश्नी तोडगा सुचवणा-या शरद पवारांना अजित पवारांचा इशारा*

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसले आहेत. या आंदोलनावर व आरक्षण प्रश्नावर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया देखील येउ लागल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख व ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी देखील यावर टिप्पणी केली आहे. अहिल्यानगर येथील एका कार्यक्रमात भाषण करताना शरद पवार यांनी तामिळनाडूत आरक्षण वाढू शकतं तर महाराष्ट्रात का नाही? असा प्रश्न उपस्थित केला आहे. घटनेत दुरु स्ती करण्याची भूमिका घेतल्यास मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो असं पवार यांनी म्हटलं आहे. शरद पवारांच्या सूचनेवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, जे नेते वेगवेगळे सल्ले देत आहेत ते यापूर्वी अनेक वर्षे सत्तेत राहिले आहेत. त्यामुळे मला त्यावर बोलायला लावू नका, त्याच्या खोलात जायला लावू नका. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या आधीच आरक्षणाचा निर्णय घेतला



होता. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, तुम्हाला माहिती आहे का, ५० टक्क्यांच्या संदर्भात देण्यात आलेलं आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या आधीच दिलं आहे. तुम्ही पत्रकारांनी नीट माहिती घ्यायला हवी. तुम्ही मला हे असले प्रश्न विचारूच नका. कोणी काय म्हटलं त्यावर उत्तर द्यायला मी बांधील नाही. मी आज दिवसभरात काही बैठका घेतल्या, विकासकामांसंदर्भात काही निर्णय घेतले त्याची माहिती द्यायला मी तुमच्यासमोर आलो होते. तुम्ही ती माहिती घेण्याऐवजी तुमच्याकडील प्रश्न संपल्यावर कोण काय म्हणाले त्यावर मला प्रतिक्रिया विचारत बसता.त्यांनी (शरद पवार) जे काही सांगितलं, ते त्यांचं मत आहे. त्या मताशी माझा दुरान्वये देखील संबंध नाही. मी फक्त इतकच बघतो की हे राज्य कायद्याने, नियमाने व लोकशाही पद्धतीने चालावं. जनतेचं भल व्हावं. आरक्षणासंदर्भात काही नेतेमंडळी ज्या काही सूचना करतात. ही सर्व मंडळी बराच काळ सरकारमध्ये होती. ते लोक १०-१० दहा वर्षे सरकारमध्ये होते.



# पराभव पचवणे बच्चू कडूंना झाले अवघड

## दहा कोटींचे काम मोर्शीत केले स्थानांतरित

### आमदार प्रवीण तायडे यांचा पत्रकार परिषदेत आरोप



**अमरावती/प्रतिनिधीः-**
अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी माजी आमदार प्रहार जनशक्ती पार्टीचे संस्थापक ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांच्यावर गंभीर आरोप केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, बच्चू कडू यांनी आपल्या कालकीर्दीत अनेक कार्य मोर्शी मतदारसंघात स्थानांतरित केले. आणि माझ्यावर उलट आरोप लावत आहे. चांगला राजकारणी असल्याची ते नौटंकी करत आहे. निवडणुकीतील झालेला पराभव पचवणे त्यांना अवघड झाले आहे, असा आरोप देखील प्रवीण तायडे यांनी आज शनिवार ३० ऑगस्ट रोजीएका पत्रकार परिषदेत केला आहे.

प्रवीण तायडे यांनी सांगितले की, आपल्या मतदारसंघातील कामे त्यांनी दुसऱ्या मतदारसंघात पाठवले. याचे पुरावे त्यांच्याजवळ आहे. सोफिया विद्युत प्रकल्पसह अनेक मुद्द्यांमध्ये कडू यांनी कमिशन खोरी केली आहे असा आरोप त्यांनी केला. राज्यातील १५६ आमदारांनी आपल्या मतदारसंघात १९७ प्रकारांचे कामांसाठी परिवर्तन करण्यासाठी वित्त व नियोजन विभागात आयोजन केले तरीं पण कोणीही मतदार संघ नाही बदलले. बच्चू कडू यांनी दहा कोटीचे मंजूर विकास काम मोर्शी आणि वरुड मतदार संघात ट्रान्सफर करण्यासाठी आवेदन केले. बच्चू कडू संविधानाचे उल्लंघन करत आहे. कडू यांनी जे दहा कोटीचे कामे स्थानांतरित केले त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, अहिल्याबाई होळकर यांचे सभागृह बनणार होते. विधानसभा निवडणुकीपूर्वी बच्चू कडू यांनी या कामाचे भूमिपूजन केले तेथे निर्माण साहित्य पण आणून टाकले. निवडणुकीमध्ये अपयश आल्याने कडू आणि समर्थकांनी ती सामग्री हटवली आणि हे काम अचलपूर मतदारसंघ सोडून मोर्शी मध्ये करण्याची विनंती केली. बच्चू कडू आपल्या अपयशाचा बदला जनतेकडून घेण्याचा प्रयत्न करत आहे. वीस वर्षात ते मतदार संघाचा विकास नाही करू शकले. यामुळे सोशल मीडियावर ते मला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहे असा आरोप आमदार तायडे यांनी केला. या व्यतिरिक्त आणखीन काही आरोप आमदार तायडे यांनी बच्चू कडू वर लावले आहे. पत्रकार परिषदेमध्ये शिवराय कुलकर्णी, प्रमोद बोरडे, मुरली माकोडे, रुपेश ढेपे, कुंदन यादव, विलास काकड, सचिन कडू, विशाल तायवाडे, अतुल गोंडे, शंकर मालखेडे, सतीश शर्मा, हर्षल डोरे, रमेश तायवाडे आदि उपस्थित होते. सत्ता तुमची, मुख्यमंत्री तुमचा मग निधी पळतो कसा

# सत्ता तुमची, मुख्यमंत्री तुमचा मग निधी पळतो कसा

## प्रहार पदाधिकाऱ्यांचा सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल



**अमरावती :** आमदार प्रवीण तायडे यांनी पत्रकार परिषद घेऊन बच्चू कडू यांच्यावर गंभीर आरोप केले. त्यानंतर लगेच प्रहार जनशक्ती पार्टी च्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन आमदार तायडे यांनी केलेल्या आरोपाचे खंडन केले. पदाधिकाऱ्यांनी सत्ताधाऱ्यांवर थेट निशाणा साधला. सरकार तुमचे, सत्ता तुमची, मंत्री तुमचे ,मुख्यमंत्री तुमची आहे. मग निधी पळतो कसा? असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला. जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी आणि स्वताचे काळे कारणामे लपवण्यासाठी प्रवीण तायडे बच्चू कडू यांच्यावर खोटे आरोप करत आहे असे प्रहारने स्पष्ट केले. बच्चू कडू यांच्या नावाने बनावट पत्र तयार करून मंत्री स्तरावरून निधी वळविण्याचा आरोप करणे ही जनतेची दिशाभूल आहे. कडू यांना बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे पण सत्ता सत्ताधाऱ्यांच्या हातात आहे ,मग नावाने पत्र तयार कसे होते आणि निधी पळतो कसा असा सवाल उपस्थित त्यांनी केला. जर तुमच्या मतदारसंघाच्या सात कोटी चा निधी गेला असेल तर सत्ताधारी आमदार म्हणून तुम्ही म्हणायला हवे होते की मी ७० कोटी आणून दाखवतो. ती धमक असेल तर दाखवा पण स्वतःची निष्क्रियता लपविण्यासाठी आमच्या नेत्याला बदनाम करता हे जनताला कळत आहे. मागील एका वर्षात बच्चू कडू यांनी ८५०० कोटीचा निधी आणला. त्यांनी किती निधी आणला हे जनतेला ठाऊक आहे. उलट सत्ताधारी आमदारांनी मागील महिन्यात किती निधी आणला हे जनतेला माहित आहे. म्हणून आमच्या नेत्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करू नका असे प्रहार पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट म्हटले. बच्चू कडू शेतकरी आणि दिव्यांगासाठी लढत आहे. त्यांचा हा संघर्ष सुरू राहणार आहे,

# मत चोरी विरोधात युवक काँग्रेसचे आंदोलन

## एसटी बसवर चिटकविले पोस्टर



**अमरावती/प्रतिनिधीः-**काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी मतदान प्रक्रियेमध्ये वोट चोरी केल्याचा गंभीर आरोप केला आहे. राहुल गांधी यांच्या आरोपाला युवक काँग्रेसने गंभीरपणे घेतलेले आहे. वोट चोरांच्या विरोधात युवक काँग्रेसने आता आंदोलन छेडले आहे. युवक काँग्रेस व राष्ट्रीय विद्यार्थी संघच्या पदाधिकाऱ्यांनी आज शनिवार ३० ऑगस्ट रोजी एसटी बसांवर ' वोटचोर खुर्ची सोडचे ' पोस्टर चिपकवून सत्ताधाऱ्यांचा निषेध केला. विधानसभा निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्रात एक कोटी पेक्षा अधिक संशयित मतदाता मतदार यादी मध्ये मिळाले आहे. राहुल गांधी यांनी मध्यप्रदेश, हरियाणा आणि बिहार निवडणुकीमध्ये पण मतदाता यादीमध्ये घोळ केल्याचा आरोप केला होता. या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेस द्वारा भाजपा शासनाच्या विरोधात आंदोलन छेडले आहे. ' वोट चोर खुर्ची सोडा'... 'देश का नेता कैसा हो राहुल गांधी जैसा हो'... असे स्टिकर एसटी बसवर लावण्यात आले.शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलन करणाऱ्यांमध्ये निलेश गुहे, वैभव देशमुख सुराग पंथ, नितीन काळे सह युवक काँग्रेस आणि राष्ट्रीय विद्यार्थी संघाचे पदाधिकाऱ्यांचा सहभाग होता.

# 'सुपर' मध्ये डॉक्टरांच्या कामबंदमुळे रुग्णांचे हाल

**तोडगा काढण्याची मागणी**

### प्रहारचे पालकमंत्र्यांना निवेदन



**अमरावती/प्रतिनिधीः-**
विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय सुपर स्पेशालिटी मधील डॉक्टरांना मागील सात महिन्यापासून वेतन न मिळाल्याने त्यांनी कामबंद आंदोलन पुकारले आहे.यामुळे रुग्णालयात हृदयविकार , कर्करोग, मूत्रपिंड विकार तसेच अन्य गंभीर आजारावर होणारे सर्व उपचार व शस्त्रक्रिया बंद आहे. त्यामुळे रुग्णांचे हाल होत आहे. या गंभीर प्रकरणाकडे लक्ष देऊन तोडगा काढण्याची मागणी प्रहार जनशक्ती पार्टी द्वारा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आलेली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सुपर स्पेशालिटी मध्ये कार्यरत डॉक्टरांचे मानधन गेल्या सात महिन्यापासून रखडले आहे. यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. मानधन न मिळाल्याने डॉक्टर संपावर आहे. गेल्या चार दिवसापासून सुरू संपामुळे गोरगरीब सर्वसामान्य जनतेला वेळेवर उपचार मिळत नाही आहे. हृदयरोग, कर्करोग, मूत्रपिंड विकार सह अन्य आजारावर होणारे ऑपरेशन बंद झालेले आहे. त्यामुळे रुग्णांचे हाल होत आहे. रुग्णांपर्यंत तज्ञ डॉक्टर पोहोचत नाहीत. सर्वसामान्यांना याचा फटका बसत आहे. यामुळे डॉक्टरांच्या वेतनाचा प्रश्न तत्काळ निकाली काढण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी प्रहारचे छोटू महाराज वसू, महानगर प्रमुख बंटी रामटेके, गोलू पाटील, अतुल शिंगणे, प्रशांत शिरभाते, नितीन शिरभाते, शेषराव धुळे, विक्रम जाधव, समीर तायडे, अजय तायडे, नंदू वानखडे, कुणाल खंडारे आदि उपस्थित होते.



# युवा उत्कर्ष सार्वजनिक गणेशोत्सव मंडळात ब्लड शुगर कॅम्प यशस्वी

### ३०० पेक्षा अधिक नागरिकांनी घेतला लाभ

**अमरावती/प्रतिनिधीः-**युवा उत्कर्ष सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, आंबापेठ यांच्या वतीने दि.३० ऑगस्ट २०२५ रोजी ब्लड शुगर व ब्लड प्रेशर तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या उपक्रमात प्रसिद्ध आरोग्यमित्र रूपेश नगरनाईक यांनी नागरिकांची तपासणी करून त्यांना आरोग्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे या शिबिराचा लाभ ३०० पेक्षा अधिक नागरिकांनी घेतला. कॅम्प दुपारी १२ ते ३ या वेळेत पार पडला. यावेळी नगरनाईक यांनी दैनंदिन जीवनशैलीतील बदल, योग्य आहार नियोजन (डायट प्लॅन) तसेच नियमित तपासणीचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. या सामाजिक उपक्रमाला मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, कार्यकारिणी सदस्य, माजी नगरसेवक अध्यक्ष अजय सारसकर आणि माजी नगरसेवक रश्मी नावंदर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रम शांततेत, समाधानकारक व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. नागरिकांनी समाधान व्यक्त करताना गणेशोत्सव फक्त धार्मिक सणापुरता मर्यादित नसून समाजहितासाठीचा उत्सव आहे, असा संदेश या उपक्रमातून दिला गेला. युवा उत्कर्ष सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व आरोग्यमित्र रूपेश नगरनाईक यांचे हे समाजोपयोगी योगदान निश्चितच प्रशंसनीय आहे.

पान १० वरून

### जीर्ण रेल्वे उड्डाणपुलाच्या सौंदर्यीकरणासाठी

काँग्रेसचे अध्यक्ष बबलू शेखावत यांनी स्पष्ट केले आहे की, या सर्व प्रश्नांची लेखी माहिती सात दिवसांत उपलब्ध करून दिली गेली नाही, तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर जनआंदोलन उभारण्यात येईल. त्यांनी या आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही अनुचित घटना किंवा अपघाताची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागावर राहील, असाही इशारा दिला. काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, जनतेच्या पैशांचा योग्य उपयोग करण्यासाठी आणि रेल्वे उड्डाणपुलावर फक्त सौंदर्यीकरणाऐवजी दुरुस्ती आणि सुरक्षा प्राधान्याने केली जावी. नागरिकांना सुगम आणि सुरक्षित वाहतूक उपलब्ध करणे हे प्रशासनाचा प्राथमिक कर्तव्य आहे, परंतु सद्यस्थितीत पुल बंद असल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

### मुख्य मार्गावर जाम,

न केल्यास रुग्णांचा जीव धोक्यात येईल, याची जबाबदारी कोण घेणार?' असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

वाहतूक कोंडीमुळे रोजच नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीचा विचार करता, तात्काळ पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच, वाहतूक नियंत्रणासाठी अधिक पोलीस कर्मचारी तैनात करावेत, अशी मागणी नागरिकांमार्फत केली जात आहे. शहरातील महत्त्वाचा हा मार्ग रुग्णवाहिका व इतर वाहनांच्यासाठी अत्यंत आवश्यक आहे, त्यामुळे प्रशासनाने त्वरित उपाययोजना करणे गरजेचे आहे.

### गिट्टीच्या ढिगाऱ्यामुळे

काम यवतमाळ येथील पठाण नामक कंत्राटदार करीत असून अंतर्गत रस्त्यासाठी लागणारे गट्टी व मटेरियलचा ढिगारा हा मुख्य रहदारीच्या असलेल्या या महामार्गावर पडलेला होता. रात्रीच्या वेळी सदर ठिकाणी कुठल्याही प्रकारचे सूचनाफलक अथवा रिफ्लेक्टर नसल्याने चोहोट्टा कडे येत असलेल्या अक्षय इंगळे या २३ वर्षीय युवकाची दुचाकी ही दुर्दैवाने गिट्टीच्या ढिगाऱ्याला धडकली आणि हा अपघात घडला. यावेळी नागरिकांनी तातडीने अक्षयला उपचारासाठी इस्पितळात दाखल केले होते. मात्र त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर या गंभीर प्रकरणी मृतकाच्या कुटुंबीयांना भेट देण्याची तसदी सुद्धा संबंधित अधिकारी वर्गाने न दाखविल्याने महावितरण प्रशासनाची मग्रूरता यानिमित्ताने पुढे आली आहे. याप्रकरणी महावितरण अकोला उपविभागाचे अतिरिक्त उप कार्यकारी अभियंता श्रीराम डांगरे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

या संपूर्ण घटनेत कंत्राटदार आणि संबंधित अधिकारी वर्गाच्या निष्काळजीपणा बाबत स्थानिकांनी संताप व्यक्त केला असून दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर गुन्हे दाखल करावे अशी जोरदार मागणी केली आहे.

### रुग्णांच्या जेवणात अळया व सोंडे

शहरासह, ग्रामिण भागातील शेकडो रुग्ण येथे विविध उपचारासाठी येत असतात. काही दुर्धर आजाराचे वयोवृद्ध व इतर रुग्ण उपचारासाठी भरती असतात. भरती असलेल्या रुग्णांना विविध अडचणींना तोंड द्यावे लागते हे वास्तव चित्र आहे. तसेच कधी औषधी व लसींचा तुटवडा, डॉक्टर वेळेवर हजर नसणे आदी कारणाने नेहमीच उपजिल्हा रुग्णालयाबाबत बोंबाबोंब असते. त्यात आणखी भर म्हणजे प्रशासनामार्फत देण्यात येणाऱ्या मोफत जेवणात शनिवारी अळया,सोंडे व कीडे निघाल्याने सशक्त आरोग्यासाठी भरती असलेल्या रुग्णांनाच आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक असे निकृष्ट जेवण देण्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.

अक्षरक्ष: काही रुग्णांनी निकृष्ठ जेवण असल्याने कचरा बकेटीत टाकून दिल्याचे समोर आले आहे. या गंभिर प्रकाराबाबत उपजिल्हा रुग्णालय प्रशासन व जेवण पुरविणाऱ्या कंत्राटदारावर जिल्हा शल्यचिकित्सक काय ठोस कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

### हॉटेल सुरूची बारवर दरोडा

पार्श्वभूमीचे आहेत. त्यांच्यावर खून, खुनाचा प्रयत्न, दंगा, आर्म्स ॲक्ट अंतर्गत शस्त्र बाळगणे अशा गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त रमेश धुमाळ व सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सपोनि महेश इंगोले व पथकातील सुनील लासूरकर, फिरोज खान, सतीश देशमुख, आस्तिक देशमुख, जहीर शेख, विकास गुडधे, मंगेश शिंदे, संग्राम भोजने, रंजीत गावंडे, विशाल वाकपांजर व योगेश पवार यांनी सहभाग घेतला.

### झेडपीत नोकरीचे स्वप्न दाखवून

कनिष्ठ अभियंता पद मिळवून देण्याचे आश्वासन दिले आणि त्यासाठी तब्बल ८ लाख रुपये घेऊन टाकले. मात्र, ही वचनबद्धता पूर्ण न झाल्याने विकास यांना मोठा आर्थिक फटका बसला. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### घरफोडीतील आरोपी जेरबंद

आले. न्यायालयाच्या आदेशानुसार, सुजीत भोंगारे याला अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त शाम घुगे व सहाय्यक पोलिस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक पुनित कुलट यांच्या नेतृत्वात करण्यात आली. वॉरंट पथकातील पो.हवा. आशिष विघे, विक्रम देशमुख, जगदीश वानखडे, सतीश टपके व आबिद शेख यांनी कारवाईत सहभाग घेतला.

### देवदर्शनानंतर मंगळसूत्र

अचानक १९ ग्रॅम वजनाचे, अंदाजे १ लाख रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचण्याचा प्रयत्न केला. महिलेनं घाबरल्याशिवाय दोन्ही हातांनी मंगळसूत्र घट्ट धरून प्रतिकार केला. आरडाओरड केल्याने चोरटे घाबरले आणि दुचाकीवर बसून पळ काढले. या घटनेनंतर गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून कलम ३०४, ३०६(२), ३२(५), ६२ बीएनएस अंतर्गत तपास सुरू आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासायला सुरूवात केली असून आरोपींचा शोध सुरू आहे. अमरावतीत मागील काही महिन्यांत सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. महिलांना लक्ष्य करून हेल्मेट, स्कार्फ लावलेल्या टोळ्या सक्रिय आहेत. पोलीस गस्त असूनही चोर निर्भयपणे शहरात फिरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील

, प्लास्टिक सर्जरी ठप्प आहे. परिणामी रुग्णांना खासगी रुग्णालयात जावे लागत आहे.

दुसऱ्या टप्प्याचे कामही ठप्प आहे. मेंदूविकार, कॅन्सर व हृदय शस्त्रक्रियेसाठी आधुनिक सुविधा थांबल्या आहेत. चार वर्षांपूर्वी आवश्यक यंत्रसामग्री मंजूर झाली, मात्र अद्याप बसवली नाही.

संपात सहभागी डॉक्टरांमध्ये युरोलॉजी, कार्डिओलॉजी, न्युरोलॉजी, पेडियाट्रिक्स, प्लास्टिक सर्जरी आदिंचा समावेश आहे. वेतन स्थिती: ऑगस्ट २०२४ पर्यंत वेतन मिळाले, १ सप्टेंबरपासून थकबाकी आहे. पूर्वी संप: २०१३, २०१५, २०१७, २०२१ मध्ये संप करण्यात आला होता.

वर्तमान स्थितीत ११ किडनी ट्रान्सप्लांटसह ३००–४०० शस्त्रक्रिया ठप्प आहेत.

संपाच्या पार्श्वभूमीवर, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील रुग्णांचे जीवन धोक्यात आले आहे. डॉक्टरांचे मानधन तातडीने दिले गेले नाही, तर रुग्णांच्या उपचारांवर आणखी गंभीर परिणाम होऊ शकतात.

### कुख्यात आरोपी तडीपार

पोलीस अधिनियम कलम ५६(१)(अ)(ब) अंतर्गत त्याच्याविरुद्ध तडीपारीचा प्रस्ताव सादर केला होता. उपविभागीय अधिकारी, मोर्शी यांनी हा प्रस्ताव मान्य करून वानखडे यास अमरावती जिल्ह्याच्या हद्दीतून दोन महिन्यांसाठी हद्दपार करण्याचे आदेश दिले. त्यानुसार शिरखेड पोलिसांनी ही कारवाई अंमलात आणली.

ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत ठाणेदार सचिन लुले यांच्यासोबत पो.उपनिरीक्षक स्वप्निल रणखांब, पोलिस हवालदार मनोज कळसकर व नितेश आसोलकर यांचा सहभाग होता.

### ट्रकच्या धडकेत दुचाकी चालक

जाताना भरधाव वेगाने वर्धेकडे येणाऱ्या ट्रकने चिरडले. या अपघातात दुचाकी चालकाचा घटनास्थळी मृत्यू झाला असल्याची घटना वाढोणा जवळ सकाळच्या सुमारास घडली.

ज्ञानेश्वर जायभाये असे मृतकाचे नाव आहेत. ते लातूर जिल्ह्यातील रहिवासी आहे.

आर्वी येथील डाक विभागात कर्तव्यावर ज्ञानेश्वर माधवराव जायभाये वय (३८) रा महादेवपुरा वर्धा एम एच ३२ ए आर १९८८ या क्रमांकाच्या दुचाकीने वर्धा आर्वी मार्गाने जात होते.दरम्यान आर्वी कडून वर्धेकडे भरधाव वेगाने एम एच २८ आर ८७७९ या क्रमांकाचा ट्रक येत असताना, जायभाये यांच्या दुचाकीला समोरुन धडक दिली.या दिलेल्या धडकेत दुचाकी चालकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला असल्याची घटना आर्वी मार्गावरील वाढोणा गावाजवळ सकाळी ९:३० वाजताच्या सुमारास घडली.ज्ञानेश्वर जायभाये हे नेहमी आर्वी येथे जाण्यासाठी एसटीने प्रवास करीत होते. शनिवारी मात्र त्यांनी त्यांच्या दुचाकीने प्रवास केला आणि घटना घडली. याप्रकरणी आर्वी पोलिसांनी वाहन चालका विरुद्ध गुन्हा दाखल केला असून,पुढील तपास पोलीस करीत आहे.

### सोनेगावच्या जुगार अड्ड्यावर धाड

करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनात चांदुर रेल्वेचे ठाणेदार अजय आकरे यांच्या नेतृत्वात हवालदार नितीन शेंडे, राहुल वानखडे, राहुल इंगळे, अतुल क्षीरसागर, संदीप बडुकले, शुभम मुरमे, चालक मुजफ्फर यांनी केली.

### नदीच्या पुरात वाहून गेल्या

मायलेकीचे नाव आहे.

पावसामुळे नदी नाले दुधडी भरून वाहू लागले आहे. शुक्रवारी आलेल्या पावसामुळे शेतात मजुरी करीता गेलेल्या रेखा मते आणि साक्षी मते सायंकाळी परत येत होत्या. त्यावेळी कळमगंगा नदीच्या पुरात दोघी वाहून गेल्या.मात्र मुलगी साक्षी मते झाडाला अडकल्याने सुखरूप असून, बचाव पथक तिच्या आईचा शोध घेत आहे.तिचा शोध घेण्यासाठी कुरणखेड येथील वंदे मातरम बचाव पथकाकडून बचावकार्य सुरू आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना पुराच्या पाण्यात जाण्याचे धाडस करू नये. पूर आलेल्या रस्त्यांवरून गाडी चालवू नये, झाडाखाली आश्रय घेऊ नये असे आवाहन केले आहे.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ रविवार, ३१ ऑगस्ट २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# ३५ वर्षीय शेतकरी मजूर महिला कमळगंगा नदीत वाहून गेली

## मुलगी काटेरी झुडपात अडकल्याने बचावले प्राण; तीन आपत्कालीन पथकाद्वारे शोध मोहीम

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

**तालुक्यातील कंझरा गावाजवळील कमळगंगा नदीत ३५ वर्षीय शेतकरी मजूर महिला रेखा रमेश मते या काल (दि. २९) दुपारी दोन वाजताच्या सुमारास मुलीसह वाहून गेल्याची धक्कादायक घटना घडली. सुदैवाने मुलगी साक्षी रमेश मते ही नदीत असलेल्या काटेरी झुडपाला अडकल्याने तिचे प्राण वाचले. मात्र रेखाबाई मात्र पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्या.**





तालुक्यात २८ व २९ ऑगस्ट रोजी झालेल्या जोरदार पावसामुळे नद्या-नाले तुडुंब भरून वाहू लागले. कंझरा परिसरातही मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने कमळगंगा नदीला पूर आला होता. रेखाबाई या मुलीसह शेतातील काम आटोपून घरी परतण्यासाठी नदी ओलांडत असताना अचानक वाढलेल्या पाण्याच्या प्रवाहाने दोघींनाही वाहून नेले.

गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत साक्षीला पाण्यातून सुरक्षित बाहेर काढले.

मात्र रेखाबाईंचा पत्ता लागला नाही. घटनेची माहिती मिळताच आमदार पिंपळे, उपविभागीय अधिकारी संदीप अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे, ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्यासह पोलिस व महसूल अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

कुरणखेड येथील वीर भगतसिंग, मॉ. चंडीका पैलपाडा आणि संत गाडगेबाबा पिंजर येथील आपत्कालीन शोध व बचाव पथके घटनास्थळी पाचारण करण्यात आली. या पथकांमध्ये विजय माल्टे, शाहबाज शहा, मोहन वाघमारे, उमेश माल्टे, अक्षय मोरे, शुभम दामोदर, शेख वसीम, दिनेश श्रीनाथ यांचा समावेश आहे. रेखाबाईंच्या शोधासाठी जवळपास सहा किलोमीटरपर्यंत सर्च ऑपरेशन राबविण्यात आले. मात्र अंधार पडल्यामुळे दि. ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसहा वाजता मोहीम थांबवावी लागली.

# गणेशघाट, विसर्जन मार्ग आणि ईद मिलादुन्नबी जुलूस मार्गाची पाहणी

## आ. साजिद पठाण यांनी पाहणीदरम्यान मनपा अधिकाऱ्यांना दिले विविध निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील सर्व गणेश घाटांना स्वच्छ, सुंदर आणि आध्यात्मिक स्वरूप द्या, सोबतच गणेश विसर्जन मार्गावरील आणि ईद मिलादुन्नबी निमित्त निघणाऱ्या जुलूस मार्गावरील खड्डे तत्काळ बुजवा, या धार्मिक काळात नागरिकांना स्वच्छ व प्रसन्न असे वातावरण वाटावे यासाठी कार्य करा असे निर्देश आ. पठाण यांनी शनिवारी मनपा अधिकाऱ्यांना गणेशघाट, विसर्जन मिरवणूक मार्ग आणि ईद मिलादुन्नबी जुलूस मार्गाच्या पाहणीदरम्यान दिले. यावेळी मनपाचे कार्यकारी अभियंता अजय गुजर, विद्युत विभागाचे अधिकारी रवींद्र वाकोडे, स्वच्छता विभागाचे संजय खोसे यांच्या सह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



शहरात गणेशोत्सवाची धूम सुरू आहे. संपूर्ण शहरात आध्यत्मिक वातावरणात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत आहे. दहा दिवस सर्व नागरिकांच्या घरात, सार्वजनिक गणेशोत्सव मंडपात मोठ्या श्रद्धा, सुमनात गणेशजीची पूजा, अर्चना पार पाडली जाते. तर येत्या ६ सप्टेंबर रोजी अनंतचतुर्दशी दिनी गणेशजीच्या विसर्जन पार पडणार असून महानगर पालिकेच्यावतीने गणेश घाटाची निर्मिती करण्यात येते. या गणेश घाटांवर नागरिक आपल्या घरातील गणेश मूर्तीचे मोठ्या भक्ती भावाने विसर्जन करीत बाप्पांना निरोप देतात. अश्यावेळी नागरिकांना ही गणेश घाट स्वच्छ, सुंदर आणि आध्यात्मिक असे वाटावे सोबतच या गणेश घाटांवर विद्युत रोषणाईचा पुरेपूर बंदोबस्त करण्यात यावा. यासोबतच यंदा गणेश घाटांना आकर्षित असे तयार करण्यात यावे असे निर्देश आ. पठाण यांनी सिटी कोतवाली गणेश घाट आणि हरिहर पेठ गणेशघाट पाहणी दरम्यान दिले. यावेळी गणेश विसर्जन मार्गाची पाहणी करीत सदर मार्गावरील खड्डे तत्काळ बुजविण्याचे आदेश त्यांनी यावेळी यंत्रणेला दिले. यावेळी महानगर अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे, जावेद जकारिया, कपिल रावदेव, पराग कांबळे, रवी शिंदे, आकाश कवडे, अंकुश तायडे, अभिजित तवर, गणेश कळसकर, विजय जामनिक, अथर्व राऊत, अथर्व ढोरे, विनोद मराठे, विशाल पाचपोर, बाबू दौंड, बंटी भोंडे, सिद्धार्थ शिरसाट, ॲड. ओम खंडारे, फिरोज गवळी, सैय्यद शहजाद यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



**ईद मिलादुन्नबी जुलूस मार्गाची पाहणी :** शनिवारी सकाळी आ. पठाण यांनी गणेश घाट, विसर्जन मार्गाची पाहणी करतावेळी याच मार्गावरून ईद मिलादुन्नबी निमित्त जुलूस सुद्धा निघतो. तर आगामी ९ सप्टेंबर रोजी ईद मिलादुन्नबी निमित्त जुलूस निघणार असून या मार्गावर अनेक ठिकाणी पडलेल्या भेगा, खड्डे यांचे निरीक्षण करून ते सर्व बुजविण्याचे आदेश दिले. तर सोबतच संपूर्ण मार्गावर साफसफाई करण्याचे, विद्युत रोषणाई उपलब्ध करण्याचे निर्देश यावेळी मनपा अधिकाऱ्यांना आ. पठाण यांनी दिले.

# ट्रकला धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू; ट्रक चालकावर गुन्हा दाखल



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ वरील मेडशी बायपास येथे शुक्रवारी दुपारी झालेल्या भीषण अपघातात गजानन निताराम अवचार वय ५५, राहणार राजणी, ता. लोणार, जि. बुलढाणा यांचा जागीच मृत्यू झाला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गजानन अवचार हे आपली मोटारसायकल क्र. MH-28-AU-4316 घेऊन पातूरकडे जात होते. दरम्यान, मेडशी बायपासवर ट्रक क्र. CG-04-HV-5292 चालकाने आपले वाहन रस्त्याच्या मधोमध उभे केले होते. अचानक समोर आलेल्या या ट्रकवर मोटारसायकल जाऊन धडकली. या भीषण धडकेत गजानन अवचार गंभीर जखमी झाले व त्यांनी घटनास्थळीच प्राण सोडले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक राजेश येलगुलवार व इतर अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह मालेगाव ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या घटनेची तक्रार मृतकाचा भाऊ विजय सिताराम अवचार वय ४५, रा. राजणी, ता. लोणार, जि. बुलढाणा यांनी नोंदवली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल भानुदास निवाणे करीत आहेत.

# स्थानिक स्वराज्य निवडणूका राष्ट्रवादी (श.प) ताकदीने लढणार - खडसे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

आगामी जि.प, पं.स, नगर पालिका, नगर पंचायत निवडणूका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शरद पवार पक्ष अत्यंत शिस्तबध्दपणे व सर्व जाती धर्माला सोबत घेवून लढणार असे परखड मत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी वाशिम येथे बोलतांना व्यक्त केले.

ते यावेळी बोलतांना पुढे म्हणाले की, विधानसभा लोकसभा निवडणूका हया नेत्यांच्या निवडणूका होत्या.आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका हया कार्यकर्त्यांच्या निवडणूका आहेत.त्यामुळे कार्यकर्त्यांना शक्ती देण्याचे काम या निवडणूकीत होईल. मागील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हा पक्ष एक संघ होता. यावेळी मात्र, रा,कॉ, शरद पवार पक्ष आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष वेगवेगळा आहे. आपण महाविकासआघाडीमध्ये असल्याने आघाडीमध्ये असलेल्या काँग्रेस, तसेच उध्दव ठाकरे यांची शिवसेना या पक्षासोबत आपण आगामी निवडणूका एकत्रित लढण्याच्या अनुषंगाने पक्ष निर्णयानुसार प्रयत्न करु परंतू यामध्ये कुठे जागा वाटपात बदल किंवा मतभेत होत असतील तर त्यामध्ये वरिष्ठ पक्ष नेतृत्वाकडून योग्यतो निर्णय घेतला जाईल. पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ता यांना या निवडणूकीत योग्य ते बळ दिल्या जाईल म्हणजे जाईल असे त्यांनी यावेळी बोलतांना स्पष्ट केले. लवकरच वाशिममध्येराष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार, आमदार रोहीत पवार, प्रदेश अध्यक्ष शशिकांत शिंदे यांना बोलविल्या जाईल, या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. असे बाबाराव पाटील म्हणाले. पक्ष निरिक्षक प्रा.विश्वनाथ कांबळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाच्या जडण घडणीचा आढावा या बैठकीत मांडतांना पक्ष हिताला महत्व देणाऱ्या कार्यकर्त्यांचा या निवडणूकीत निश्चित विचार होईल असे सांगतांना पक्ष हिताला बाधा आणणाऱ्यांना मात्र यावेळी कुठेही स्थान दिल्या जाणार नाही. असे सांगून जे कार्यकर्ते व पदाधिकारी जे निष्क्रीय आहेत. याचा निश्चित पक्ष विचार करेल. असे प्रा. विश्वनाथ कांबळे म्हणाले, याप्रसंगी जेष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे, माजी जि.प.अध्यक्षा ज्योतीताई गणेशपुरे, अनंता काळे, सुमित पाटील, अशोक मुंदे, इम्रान भाई फकिरावाले, रमेश गोटे, भगवानराव जाधव, बाळू पाटील टोपले, काशिराम राठोड, गजानन सरनाईक ,मनिष चिपडे, कैलास खानझोडे, माधव शेवाळे, दिलीप रोकडे, राम पाटील आदींची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**कारंजा :** दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित स्थानिक श्री किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये भारताचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या स्मृतींना उजाळा देत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# पुरुषोत्तमजी चितलांगे यांच्या वाढदिवसानिमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■



भाजपा जिल्हाध्यक्ष व चितलांगे इंण्डेण चे संचालक पुरुषोत्तम चितलांगे यांच्या वाढदिवसानिमित्त १ सप्टेंबर सोमवार रोजी सकाळी ९.०० वाजता कृष्णा लॉन ऑड मॅरेज हॉल गोलवाडी फाटा मंगरुळपीर या ठिकाणी लोकाभिमुख व रोजगारा संदर्भात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या मध्ये जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र वाशिम यांच्या सयुक्त विद्यामानाने पंडित दिन दयाल उपाध्याय रोजगार मेळावा चे आयोजन तसेच डॉ. अजय वाघमारे, यांच्या उपस्थिती मध्ये मोफत नेत्र तपासणी शिबीर व रक्तदान शिबिर तसेच महिला भगिनीसाठी २ लाख रुपये किंमतीचा प्रधानमंत्री सुरक्षा अपघात विमा मोफत व प्रधानमंत्री

आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना याचे पोर्टलद्वार नोंदणी नगर परिषद शाळा क्र २ मध्ये मंगरुळपीर युवा मोर्चाच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम तसेच कारंजा लाड येथे शहर भाजपाच्या वतीने वृक्षारोपन तसेच वाशिम येथिल शासकीय रुग्नालया मध्ये फळ वाटप व मानोरा येथे वृक्षारोपन व गोवर्धन रिसोड येथे वृक्षारोपन कार्यक्रमाचे आयोजन भाजपाच वतीने करण्यात आले. पुरुषोत्तमजी चितलांगे यांच्या वाढदिवसा निमित्य दरवर्षी प्रमाणे अशाच समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

# स्व. बायणाबाई अर्जुन धबाले यांचे मरणोत्तर नेत्रदान

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक शुक्रवार पेठ, वाशिम ता. जि.वाशिम येथील प्रताप अर्जुन धबाले यांची आई स्व. बायणाबाई अर्जुन धबाले यांच्या वयाच्या ८५ व्या वर्षी दिनांक ३० ऑगस्ट रोजी सकाळी ०४.०० वाजता निधन झाले. त्यांच्या मागे बराच मोठा आप्त परिवार आहे तसेच संपूर्ण धबाले कुंटुबातील आधारस्तंभ तथा सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या तसेच समाजकार्याची आवड असलेल्या स्व. बायणाबाई अर्जुन धबाले यांचे निधन झाल्याने संपूर्ण धबाले



कुटुंबावर दुःखाचा डोंगर उभा असताना धबाले कुटुंबियाने एवढ्या दुःखामध्ये मुत्यनंतर दोन अंधाच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानूसार जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, नेत्र शल्यचिकित्सक, डॉ. आशिष बेदरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रशल्य चिकीत्सक डॉ. अश्विन पराती, नेत्र चिकित्सा अधिकारी ज्ञानेश्वर पोटफोडे व नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे यांनी स्व. बायणाबाई अर्जुन धबाले यांची नेत्र बुबुळे काढली व नेत्र बुबूळे त्याच दिवशी वैद्यकिय महाविद्यालय, अकोला येथे पाठविण्यात आली. तरी सदरील नेत्रदान करण्याकरीता प्रताप अर्जुन धबाले व संपूर्ण धबाले कुटुंबाचे तसेच रुग्णालयातील कर्मचारी सचिन गिलवरकर, निलेश मार्गे, रूपेश पांगारकर, महेश देशमुख, अनिल देशमुख, अंजली माने सिस्टर, बालाजी शिंदे, अदिती अवचार, प्रांजली जाधव यांचे सहकार्य लाभले. तरी सर्व समाजातील गणमान्य व्यक्तींनी या नेत्रदान चळवळीत सक्रीय सहभाग घेवुन नेत्रदान चळवळ ही लोक चळवळ व्हावी.

# आझाद हिंद मंडळात गोंधळाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | कारंजा ■

दरवर्षी प्रमाणे शहरात दि. २७ ऑगस्ट रोजी बाप्पाचे आगमन मोठ्या उत्साहात झाले. विविध गणेश मंडळांनी ढोल-ताशांच्या गजरात बॅड पथक लावत आगमन मिरवणुका काढल्या

विघ्नहर्ता गणेश मंडळाने बैलगाडी मिरवणूक काढून शेतकऱ्यांचा सन्मान राखला. बाप्पाची आराधना नित्यनेमाने, भक्तिभावाने सुरू असून, मंडळांकडून देखावे व समाजोपयोगी कार्यक्रमही राबविले जात आहेत.

अशाच उपक्रमांतर्गत आझाद हिंद गणेश मंडळाने दि. २९ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते १० या वेळेत जागरण गोंधळाचा कार्यक्रम आयोजित केला होता. सध्याची तरुण पिढी डीजेला प्राधान्य देत असली तरी या मंडळातील १६ ते २४ वयोगटातील तरुणांनी जागरण गोंधळात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. देवीभक्तीच्या गाण्यांवर युवक थिरकत असल्याचे पाहून जेष्ठ कार्यकर्ते आनंदित झाले.

# अनसिंग येथे ब्रम्हाकुमारीजच्या वतीने रक्तदान शिबीर; १६ दात्यांनी केले रक्तदान



■ प्रतिनिधी | वाशिम ■

ब्रम्हाकुमारीजच्या दिवंगत मुख्य प्रशासक राजयोगिनी दिदी यांची पुण्यतिथी आणि विश्व बंधुत्व दिनाचे औचित्य साधून २५ आंगष्ट रोजी अनसिंग येथील विठ्ठल रूक्मीणी मंदिरामध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.या शिबीरात १६ दात्यांनी रक्तदान केले.

प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय,अनसिंग केंद्राच्या संचालक भागिरथी दिदी यांनी अनसिंगच्या पंचक्रोशीत या केंद्राच्या माध्यमातून जनजागृती करून सामाजिक सेवा करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. ब्रम्हाकुमारीजच्या वतीने २५ आँगष्ट रोजी भारतातील सर्व केंद्रामध्ये विश्व बंधुत्व दिनानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. अनसिंग केंद्रामध्ये आयोजित रक्तदान शिबीरात शिवाजी शिंदे, शांतीलाल मोदाणी, मनोज मोदाणी,दीपक लढ्ढा, अनसिंगचे ठाणेदार अमर चोरे, जमादार नंदकिशोर भडके, डॉ.संदीप बाजड,प्रवीण सारडा, नारायण वाघ,गोपाल राठोड, अविनाश खोटे,पार्थ चव्हाण, अनिल इंगळे,जगदीश आळणे, देवेश मंत्री,संतोष सावके यांनी रक्तदान करून या सामाजिक कार्यात सहभाग नोंदविला.

# इमामपूर–खतनापुर पांदन रस्त्याची दयनीय अवस्था

## शेतकऱ्यांचे हाल, प्रशासनाचे दुर्लक्ष

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा तालुक्यातील इमामपूर व खातनापुर शिवाराकडे जाणारा पांदन रस्ता अक्षरशः खड्डयांनी व्यापलेला असून त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आहे. या मार्गाने दररोज शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. ट्रॅक्टर, बैलगाड्या, दुचाकी व चारचाकी वाहनांना या रस्त्यावरून जाणे कठीण झाले असून अपघात होण्याची शक्यता कायम आहे. या दुरवस्थेमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



शेतकरी सांगतात की, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत ते मागील अनेक वर्षांपासून पाठपुरावा करत आहेत. ग्रामपंचायत, पंचायत समिती, तहसील कार्यालय तसेच विविध लोकप्रतिनिधींना अनेकदा निवेदन देऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. शेतमाल वाहतूक तसेच शेतकऱ्यांचे दैनंदिन जीवन या रस्त्याच्या खराब स्थितीमुळे विस्कळीत झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते चांद भाई मुन्नीवाले यांनी या समस्येबाबत वारंवार आवाज उठविला असून प्रशासनाशी अनेक वेळा संपर्क साधून देखील त्यांना कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. 'शेतकऱ्यांच्या मूलभूत गरजा दुर्लक्षित करून शासन व प्रशासन आपल्या जबाबदाऱ्यांपासून पळ काढत आहे,' अशी टीका त्यांनी केली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी हा देशाचा कणा असून त्यांच्यासाठी रस्ते ही मूलभूत गरज आहे. तरीसुद्धा अशा महत्त्वाच्या प्रश्नाकडे स्थानिक प्रशासन व शासनाकडून कायम दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर शासन व प्रशासनाने तातडीने लक्ष घालून इमामपूर–खतनापुर पांदन रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी शेतकरी वर्गाकडून जोरदारपणे होत आहे. अन्यथा शेतकरी आंदोलनाचा इशारा देत आहेत.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

■ वर्धा, रविवार ३१ ऑगस्ट २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे ४


## सिलेंडरने घेतला पेट, युवकांच्या सतर्कतेने टळला मोठा अनर्थ

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील कोरा येथील एका घरातील सिलेंडरने पेट घेतला. घटनेची माहिती ग्रामस्थांना मिळाल्यानंतर एका धाडसी व्यक्तीने धाडस दाखविल्याने मोठा अनर्थ टळला असल्याची घटना शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. कोरा येथील अनिल सायकाटे यांच्या घरातील सिलेंडरने पेट घेतला आणि घरातील साहित्य अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तूंसह इतर विद्युत उपकरणे जळून खाक झाले.या घटनेची माहिती ग्रामस्थांना मिळाल्यानंतर गावातील राम गेडाम या व्यक्तीने धाडस केले,आणि पेट घेतलेल्या सिलेंडरची आग आटोक्यात आणली.जीवाची पर्वा न करता सिलेंडर खांद्यावर घेऊन लांब अंतरावर असलेल्या एका शेतात नेऊन ठेवले.व्यक्तीने धाडस केले नसते तर मोठी हानी झाली असल्याचे सांगितले जात आहेत.राम गेडाम यांनी धाडस केले आणि मोठा अनर्थ टळला असल्याचे सांगितले जात आहे.या घडलेल्या घटनेत अनिल सायकाटे यांचे आर्थिक नुकसान झाले असल्याने तातडीने पंचनामा करावा आणि आर्थिक मदत द्यावी अशी मागणी यावेळी केली जात आहे.

# निविदा प्रक्रिया घोटाळा

- चौकशी अहवाल संशयाच्या फेऱ्यात
- येनगाव ग्रामपंचायत ई-निविदा प्रकरण
- अहवालात प्रशासकासह कंत्राटदाराला अभय

**कारंजा (घा.) जनमाध्यम -** तालुक्यातील येनगाव ग्रामपंचायत भवनाच्या बांधकामाकरिता मागवण्यात आलेल्या ऑनलाइन निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात घोळ झाल्याची तक्रार कंत्राटदार मोहम्मद रेहान रफिक शेख आणि सुरेश राक्षे यांनी केली होती. या तक्रारीची दखल जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांनी घेऊन गटविकास अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले होते. याप्रकरणी सुनावणी घेऊन गटविकास अधिकाऱ्यांनी चौकशी अहवाल वरिष्ठांना सादर केला. मात्र, चौकशी अहवालात येनगाव ग्रापंचे तत्कालीन प्रशासक आणि कंत्राटदाराला अभय दिल्याने गटविकास अधिकाऱ्यांचा चौकशी अहवालच संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

येनगाव येथील ग्रामपंचायत भवनाच्या बांधकामाकरिता मागवण्यात आलेल्या ऑनलाइन निविदा प्रक्रियेत घोळ झाल्याची तक्रार प्राप्त होताच जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांनी कारंजा पंसचे गटविकास अधिकारी प्रवीण देशमुख यांना चौकशीचे आदेश दिले होते. देशमुख यांनी या प्रकरणाची ३० जुलै रोजी सुनावणी घेऊन २५ ऑगस्ट रोजी चौकशी अहवाल वरिष्ठांना सादर केला. मात्र, या चौकशी अहवालात येनगाव ग्रापंचे तत्कालीन प्रशासक मंगेश पंधरे यांचा कुठेच उल्लेख केला नसून निविदा उघडण्याच्या वेळी कंत्राटदाराच्या उपस्थितीत निविदा उघडली नाही, त्यांच्या उपस्थितीची ग्रामपंचायत दप्तरी नोंदही नाही, असा अभिप्राय नोंदवित निविदा प्रक्रिया रद्द करण्यात यावी. तसेच निविदा प्रक्रियेमध्ये कोणतीही स्पर्धा झालेली नाही आणि विहित मुदतीत ग्रामपंचायत भवन बांधकाम पूर्ण करता यावे, असा उद्देश मनात ठेवून ग्रामपंचायत अधिकारी यांनी निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता केली असल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला.

सव्वा वर्षापूर्वीचे शपथपत्र सादर केलेल्या कंत्राटदाराच्या बाबतीत चौकशी अहवालामध्ये कारवाई संबंधाने कोणतीही बाब आढळून येत नाही. कोणत्याही अनियमिततेमध्ये सरपंच व सचिव संयुतरित्या जबाबदार असताना सरपंच्याच्या जागी प्रशासक म्हणून भूमिका पार पाडणारे गटविकास अधिकाऱ्यांच्या मर्जितील मित्र मंगेश पंधरे यांचा कोणताही उल्लेख या अहवालात करण्यात आलेला नाही. अनियमिततेचे संपूर्ण खापर ग्रामपंचायत अधिकारी भाग्यशाली गवई यांच्यावर फोडून गटविकास अधिकारी मोकळे झाले. बोगस शपथपत्र दाखल करणाऱ्या कंत्राटदार धीरज जळीत यांना चौकशी अहवालात अभय देण्यात आले. त्यामुळे या प्रकरणात मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाला असून गटविकास अधिकारी प्रवीण देशमुख यांचा चौकशी अहवाल संशयाच्या भोवऱ्यात सापडल्याची चर्चा सुरू आहे.

## शिवणी पारधी बेडा येथे धडक वॉशआऊट मोहिम

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील शिवणी पारधी बेड्यावर वर्धा येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने धडक वॉशआऊट मोहिम राबवून १८ लाख २९ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल नष्ट केला.

प्राप्त माहितीनुसार ३० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता वर्धा येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला शिवणी पारधी बेड्यावर अवैध गावठी दारुची मोठ्या प्रमाणात गाळपान होत असल्याची गुप्त माहिती मिळताच पथकाने याठिकाणी जाऊन वॉशआऊट मोहिम राबवली असता याठिकाणी जमीनीत गाडून असलेल्या १२३ प्लास्टीक व लोखंडी ड्रममध्ये १६,४५० ली. मोहा सडवा रसायण

**१८ लाख २९ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल केला नष्ट**

व २७० ली. गावठी मोहा दारू व इतर भट्टी साहित्य एकुण कि. १८,२९,२०० रू चा मुद्देमाल जप्त करून, जागीच नष्ट करण्यात आला असुन, आरोपी सुनेकला काळे, प्रतिकार पवार, कुमान पवार, चरणदास पवार, शिवणकला पवार सर्व रा. शिवणी पारधी बेडा, तह. समुद्रपूर यांचेविरूध्द समुद्रपुर येथे दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.हि कार्यवाही पोलीस अधिक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, यांचे निर्देशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा वर्धाचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पो.उपनि. प्रकाश लसुंते मनोज धात्रक, अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, पवन पन्नासे, महादेव सानप, रवि पुरोहित, विनोद कापसे, अभिषेक नाईक सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा वर्धा यांनी केली.

# विद्यार्थ्यांच्या अपघातानंतर वाहतुक शाखा ॲक्शन मोडवर




अल्पवयीन लहान मुलांनी वाहन चालवीने ज्यांचे जवळ लायसेन्स नाही अशा ५२ विद्यार्थ्यांवर वाहतूक पोलिसांनी मोटार वाहन कायदा कलम ४(१)/१८१ कलमनवये कायदेशीर कार्यवाही करून ५३ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, वाहतूक नियम पालन करावे याबाबत जनजागृती करण्यात आली आहे, तरी यांनतर अपघात होऊ नये याकरिता हीं आणखी मोहीम राबवून कठोर कार्यवाही करण्यात येणार आहे.

**विलास पाटील**
पोलीस निरीक्षक वाहतूक
शाखा वर्धा,

- अठरा वर्षापेक्षा कमी वयाच्या विद्यार्थ्याला वाहन देऊ नका : वाहतूक निरीक्षक विलास पाटील
- खाजगी शिकवणी व महाविद्यालयासमोर कारवाई होणार सुरू

**वर्धा जनमाध्यम :** १८ वर्षाखालील विद्यार्थी विद्यार्थिनीला ५० सीसीहून जास्त क्षमतेची दुचाकी चालवताना आढळल्यास २५ हजार रुपये दंड व १८ वर्षांचे होईपर्यंत वाहन परवाना देऊ नका, असा आदेश परिवहन आयुक्तांनी दिला आहे. मात्र, या प्रकरणात वर्धेत अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने अनेक अल्पवयीन मुले-मुली दुचाकी सुसाट पळवत असल्याचे पाहायला मिळते.शहरातील रामनगर परिसरातील जनता चौकात शुक्रवारी ट्रकने दोन शाळकरी विद्यार्थी ई-बाईकने खाजगी शिकवणी वरून घरी परत जात असताना अपघात झाला, त्यात पंधरा वर्षीय मुलाचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर दुसरा विद्यार्थी गंभीर जखमी झाला,

शाळकरी विद्यार्थी व अन्य अल्पवयीन मुलांच्या हातात स्कूटर, दुचाकी वाहने सर्रास दिसून येत असून सुसाटपणे धावणाऱ्या या वाहनांचा सुळसुळाट हा रस्त्यावर चालणाऱ्या लोकांसह इतर वाहनधारक व स्वतः अल्पवयीन वाहन चालकासाठी धोकादायक व अपघाताला निमंत्रण ठरत आहे. विनापरवाना अल्पवयीन वाहन चालकांमुळे त्यांच्यासह मार्गावरील वृद्ध नागरिक, शाळकरी विद्यार्थी, वाहनधारक व पादचाऱ्यांचे देखील जीव धोक्यात येऊ शकतात. अल्पवयीन मुलांच्या हातात वाहन देणाऱ्या पालकांवर कठोर कारवाईची तरतूद असली तरी कारवाईची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने त्यांचे मनोधैर्य वाढत आहे. दुचाकी वाहनावर किती प्रवासी बसावेत याचे भान देखील हे अल्पवयीन विनापरवाना वाहनधारक ठेवत नसल्याचे दृष्टीस पडत आहे. पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये अल्पवयीन वाहन चालवणारे वाहन चालक, मालक व पालक यांच्यावर मोटार वाहन कायदा व इतर कलमान्वये गुन्हे दाखल करण्याची मोहीम वाहतूक पोलिस यंत्रणेने सुरू करणार आहे, सैराट दुचाकीस्वार व अल्पवयीन शाळकरी वाहन चालकांवर धडक कारवाई करण्यात येणार आहे. ही मोहीम खाजगी शिकवणे शिकवणे महाविद्यालय या परिसरात राबविण्यात येणार आहे, अशी माहिती वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी सांगितले,

पाल्यांना खाजगी शिकवणी तसेच महाविद्यालयात सोडण्यासाठी अनेक पालकांना नोकरी, व्यवसाय, कामानिमित्त वेळ मिळत नाही. स्कूटी अन्य वाहने खरेदी करून पाल्यांना दिली जातात. हेच अल्पवयीन वाहनचालक मुला-मुलींची संख्या रस्त्यावर जास्त असल्याचे दिसून येते. क्लासला जाण्यासाठीही ते वाहनांचा वापर करतात. महाविद्यालयाच्या आवारात हे अल्पवयीन विद्यार्थी ट्रीपल सीट जातानाही दिसून येतात.म्हणून १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना दुचाकी चालविण्यास देऊ नका असे आव्हान वाहतूक शाखा करीत आहे.

## आंदोलकांचे पाणी बंद केल्यास सुटी नाही

### जरांगेंचा बीएमसी आयुक्तांना इशारा

मुंबई : प्रतिनिधी-मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा आज शनिवारी (३०ऑगस्ट) दुसरा दिवस आहे. मराठा आरक्षणासाठी सरकारविरोधात लढा सुरू आहे. मात्र आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी खेड्यापाड्यातून आलेल्या आंदोलकांचे प्रचंड हाल झाले. यावरून जरांगे पाटलांनी राज्य सरकारसोबतच बीएमसी आयुक्तांवरही टीका केली. वास्तविक, मराठा आंदोलक आंदोलनाच्या पहिल्या दिवशी (२९ ऑगस्ट) रात्रभर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकातील फलाटांवर झोपले. यानंतर आज सकाळी आझाद मैदानाच्या परिसरात असलेल्या अनेक शौचालयांमध्ये पाणी नव्हते. तसेच मुंबई महानगरपालिकेने या परिसरातील हाटेल्स बंद ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे पहिल्या दिवशी मराठा आंदोलकांचे खाण्याचे प्रचंड हाल झाल्याचे पाहायला मिळाले.यावरून जरांगे यांनी राज्य सरकार आणि मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना लक्ष्य केले. आझाद मैदानावरून बोलताना मनोज जरांगेंनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर गंभीर आरोप केले. फडणवीसांना महाराष्ट्र अस्थिर करायचा आहे, असा आरोप त्यांनी केला. जरांगे म्हणाले की, मराठ्यांना वेठीस धरू नका तुमच्या हातात संधी आहे. संधीचं सोनं करा. तुम्हाला वाटत असेल, हाणेन मारेन पण जर तुम्ही आंदोलकांवर लाठीमार केला तर त्यामुळे नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनाही अडचण होईल.

# पिकाच्या नुकसानीपोटी मिळणाऱ्या नुकसान भरपाईमध्ये वाढ करा

- रस्त्यावरील खड्डे, वाहून गेले पुलाची तात्काळ दुरुस्ती करा
- खासदार काळे यांची जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मागणी




**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्याची जिल्हा नियोजन समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या बैठकीत खासदार अमर काळे यांनी महत्त्वाचे व लोकांच्या सोयीशी निगडीत अत्यावश्यक असे मुद्दे बैठकीत उपस्थित केले. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जिल्हयातील अंगणवाडयांना स्वत:च्या मालकीच्या इमारती नसल्याची बाब उपस्थित करण्यात आली. त्यावेळी खासदार श्री अमर काळे यांनी जिल्ह्यातील किती अंगणवाडयांना स्वत:च्या मालकीची इमारत उपलब्ध आहे असा प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाला अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. यासोबतच पट्टे वाटपाचा प्रश्न सुध्दा खासदार अमर काळे यांनी उपस्थित केला. २०१९ च्या निवडणूक प्रचारात मा. पंतप्रधान यांनी सर्व बेघर लोकांना पाच वर्षात घर उपलब्ध करुन देण्यात येईल असा शब्द दिला होता. परंतु अजूनही लोकांना घरे तर दूर पण स्वत:च्या मालकीचे घर बांधण्यासाठी जागा सुध्दा उपलब्ध झालेली नाही. याबाबत पालकमंत्र्यांनी हा प्रश्न तात्काळ तीन महिन्यात सोडविण्यात यावा असे निर्देश दिले. अतिक्रमणधारकांनी बांधलेली घरे पाडण्याचे काही ठिकाणी सुरु आहे. याबाबत काही लोकांना अभय तर काही लोकांची घरे शासनाचा नियम दाखवून पाडली जात आहे. असा भेदभाव सुध्दा होऊ नये व सध्या पावसाळा असल्यामुळे शासनाच्या निर्देशानुसार सध्या या अतिक्रमण हटाओ मोहिमेला तूर्त स्थगिती देण्याबाबत मुद्दा उपस्थित केला.

दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे रोही व रानडुक्कर हे शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या पिकांचे नुकसान करतात. यामुळे शेतकरी अतिशय त्रस्त आहेत. झालेल्या नुकसानीचा वनविभागाकडून पंचनामा केल्या जातो. परंतु कितीही नुकसान झाले तरी जास्तीत जास्त मदत नुकसानीचा विचार न करता केवळ ५०००० रु. दिली जाते. ही बाब खासदार अमर काळे यांनी शेतकऱ्यांचे दु:ख लक्षात घेऊन मोठया पोटतिडकीने बैठकीत उपस्थित केली. यावर पालकमंत्र्यांनी सदर बाब शासन स्तरावर उपस्थित करुन याबाबत निर्णय घेतला जाईल असे आश्वासन दिले. यासोबतच सध्या पावसाळा असून पावसाच्या पाण्याच्या पुरामुळे जिल्हयातील अनेक रस्ते वाहून गेलेत. पुल सुध्दा वाहून गेले. त्यामुळे या रस्त्यावरुन प्रवास करणे कठिण झाले आहे. काही ठिकाणी तर एस.टी. महामंडळाने बसेस पाठविणे सुध्दा बंद केले आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना गावावरुन शहरात शिक्षणासाठी येण्याची अडचण निर्माण झाली आहे व गावकऱ्यांना सुध्दा शहरात येतांना मोठया अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे पुरामुळे वाहून गेलेले रस्ते पुल याची तात्काळ दुरुस्ती करुन वाहतूक पूर्ववत करावी व वाहून गेलेले रस्ते व पुल नविन बांधण्यात यावे असे प्रस्तावित केले. यावर पालकमंत्र्यांनी जि.प. बांधकाम विभाग व सा.बां. विभाग यांना तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

यानंतरचा सर्वात महत्वाचा विषय म्हणजे जिल्हयात वाढलेला एम.डी.चा वापर. एम.डी. चे सेवन करण्यामध्ये तरुण मुलांची संख्या सर्वात जास्त आहे. एम.डी. हे ड्रग्ज देवाण घेवाणीच्या दृष्टीने अत्यंत सुलभ असल्याने ही सहज उपलब्ध होते. या ड्रग्जच्या सेवनाने तरुण पिढी या व्यसनाच्या आहारी गेल्याने या पिढीला सर्वात मोठा धोका निर्माण झालेला आहे. अनेकदा पोलिस विभागाकडून या ड्रग्ज हाताळणाऱ्या व्यक्तींना पकडल्याच्या बातम्या पहावयास मिळतात. परंतु हे ड्रग्ज सेवन करणाऱ्याचे प्रमाण सतत वाढत असून ही तरुण पिढीच्या भविष्याच्या दृष्टीने अत्यंत घातक बाब असून यावर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर याची भयानकता भविष्यात अत्यंत नुकसानदायक असेल असे स्पष्ट मत खासदार अमर काळे यांनी व्यक्त केले. यावर पालकमंत्र्यांनी पोलीस विभागाला तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. वर्धा-अमरावती लोकसभा मतदार संघात राष्ट्रीय महामार्ग व रेल्वेचे जाळे खुप मोठया प्रमाणावर असल्याने राष्ट्रीय महामार्गावरील दुरुस्ती, होणारी निकृष्ठ कामे, रेल्वे विभागाने बांधलेले अंडरपास व त्यामध्ये डोक्यापर्यंत पाणी साचल्यामुळे बंद झालेली वाहतुक असे गंभिर प्रश्न असतांना सुध्दा राष्ट्रीय महामार्ग किंवा रेल्वे विभागाचा जबाबदार अधिकारी बैठकीत नसणे हे उचित नाही. हा मुद्दा खासदार अमर काळे यांनी उपस्थित करताच पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना पुढील बैठकीस संबंधित विभागाला उपस्थित ठेवण्याबाबतचे निर्देश दिले.शेवटी खासदार अमर काळे यांनी जिल्हा नियोजन समितीकडे विकास कामाकरीता निधी मिळण्याबाबतचे जवळपास ६० कोटींचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर केले असून जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी हे प्रस्ताव पुढील कार्यवाहीकरीता संबंधित यंत्रणांकडे पाठविले आहे. याकरीता जिल्हा नियोजन समितीकडून निधी देण्यात यावा अशी मागणी मा. पालकमंत्री अमरावती जिल्हा यांचेकडे केली.

## घरगुती गणपती सजावट स्पर्धा

### आशिष आकरे मित्रपरिवाराचे आयोजन

वर्धा जनमाध्यम - सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले आशिष आकरे यांच्या पुढाकारातून उत्कृष्ट घरगुती गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या आकर्षक गणपती सजावटीवर बक्षीस देण्यात येणार आहे, हि स्पर्धा हिंदनगर परिसरातील नागरिकांसाठी असून सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी घरगुती गणपती सजावटीचे दोन फोटो ८४४६६३७५५९ या नंबर वर १ सप्टेंबर पर्यंत व्हाट्सअप करण्याचे आव्हान आशिष आकरे मित्रपरिवारांनी केले आहे.

**पर्यावरणपूरक गणेश विसर्जनात सहभागी व्हा-** विविध कारणांमुळे नदी, नाले प्रदुषणयुक्त झाले आहे. यात गणेश मूर्ती विसर्जनाचाही समावेश आहे. गणेश मूर्तीसह निर्माल्य थेट नदीत विसर्जित केले जाते. त्यामुळे पाणी प्रदुषित होते. यासाठी हिंदनगर येथे आशिष आकरे मित्र परिवाराच्या वतीने ईको-फ्रेंडली गणेश विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली आहे. ६ सप्टेंबर रोजी गणेशभक्तांनी थेट नदीत गणपती मूर्तीचे विसर्जन न करता या अभियानात सहभागी होऊन पर्यावरणपूरक गणपती विसर्जन करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



## एमगिरी मध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**वर्धा जनमाध्यम :** एमगिरी (मगणवाडी) येथे ३० ऑगस्ट रोजी हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थानचे संचालक डॉ. आशुतोष मुरकुटे यांनी राष्ट्रीय क्रीडा दिन सप्ताहाच्या शुभेच्छा दिल्या आणि खेळांबद्दलची आवड वाढवण्यासाठी आपआपल्या क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी आणि मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेवर माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर प्रमुख वैज्ञानिक अधिकारी डॉ. अपराजिता वर्धन यांनी अधिकारी, कर्मचारी आणि आऊटसोर्स कर्मचारी यांना 'फिट इंडिया' शपथ दिली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. शीतल शर्मा यांनी केले.राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त एमगिरी परिसरात विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या, ज्यामध्ये लिंबू शर्यत, दोरीखेच व क्रिकेट यांसारखे खेळ समाविष्ट करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये संस्थेतील कायमस्वरूपी व तात्पुरते कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने आणि खेळाडूवृत्तीने सहभाग घेतला होता.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. अपराजिता वर्धन, डॉ. शीतल शर्मा, स्वानंद कळंबे, गणेश थेरे, आदींचा विशेष सहभाग घेतला.

## ट्रकच्या धडकेत दुचाकी चालक ठार

### वाढोणा पिंपळखुटा मार्गावरील घटना

**वर्धा जनमाध्यम -** आर्वी येथील डाक विभागातील कर्मचारी दुचाकीने ड्युटीवर जाताना भरधाव वेगाने वर्धेकडे येणाऱ्या ट्रकने चिरडले. या अपघातात दुचाकी चालकाचा घटनास्थळी मृत्यू झाला असल्याची घटना वाढोणा जवळ सकाळच्या सुमारास घडली. ज्ञानेश्वर जायभाये असे मृतकाचे नाव आहेत. ते लातूर जिल्ह्यातील रहिवासी आहे. आर्वी येथील डाक विभागात कर्तव्यावर ज्ञानेश्वर माधवराव जायभाये वय (३८) रा महादेवपुरा वर्धा एम एच ३२ ए आर १९८८ या क्रमांकाच्या दुचाकीने वर्धा आर्वी मार्गाने जात होते.दरम्यान आर्वी कडून वर्धेकडे भरधाव वेगाने एम एच २८ आर ८७७९ या क्रमांकाचा ट्रक येत असताना, जायभाये यांच्या दुचाकीला समोरुन धडक दिली.या दिलेल्या धडकेत



दुचाकी चालकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला असल्याची घटना आर्वी मार्गावरील वाढोणा गावाजवळ सकाळी ९:३० वाजताच्या सुमारास घडली.ज्ञानेश्वर जायभाये हे नेहमी आर्वी येथे जाण्यासाठी एसटीने प्रवास करीत होते. शनिवारी मात्र त्यांनी त्यांच्या दुचाकीने प्रवास केला आणि घटना घडली.

## संक्षिप्त

### मराठा आंदोलनासाठी मुस्लीम महिला सरसावल्या, 2500 भाक-या पाठवल्या



**नाशिक :** नाशिकमधील मुस्लीम महिला मनोज जरांगेंच्या आंदोलनासाठी सरसावल्या आहेत. चुलीवर भाकरी थापटून तब्बल २५०० भाक-या मुंबईच्या दिशेने मुस्लीम महिलांनी पाठवल्या आहेत.मराठा आरक्षणाची मागणी घेउन मनोज जरांगे पाटील शुक्रवारी मुंबईत दाखल झाले आहेत. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, यासाठी त्यांचे हे आंदोलन सुरू आहे. जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्याच्या कानाकोप-यातून मराठा समाज मोठ्या संख्येने मुंबईत दाखल झाला आहे.मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत आंदोलनात सहभागी झालेल्या मराठा आंदोलकांना नाशिक जिल्ह्यातील येवला-लासलगाव मतदारसंघातून भाकरी पुरविल्या जात आहे. या व्यवस्थेत मुस्लीम समाजाचाही मोठा पुढाकार दिसून येत आहे. मुस्लीम समाजाच्या महिलांनी मराठा आंदोलनकर्त्यांसाठी तब्बल २५०० भाक-या तयार करून खारीचा वाटा उचलला आहे.

### राजीनामा दिल्यानंतर जगदीप धनखड यांचा पेन्शनसाठी अर्ज

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजस्थान विधानसभेत माजी आमदार म्हणून पेन्शनसाठी अर्ज केला आहे. धनखर हे १९९३ ते १९९८ पर्यंत किशनगड विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे आमदार होते. त्यांनी २०२३ मध्ये भाजपामध्ये प्रवेश केला. दरम्यान जुलै २०१९ पर्यंत ते माजी आमदार म्हणून पेन्शन घेत होते. धनखर यांची पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्यांची ही पेन्शन थांबवण्यात आली होती . दरम्यान



२१ जुलै रोजी पायउतार उपराष्ट्रपती पद सोडल्यानंतर धनखड यांनी माजी आमदार म्हणून पेन्शन पुन्हा सुरू करण्यासाठी राजस्थान विधानसभेच्या सचिवालयात अर्ज केला आहे.माजी खासदार असलेल्या धनखड यांना त्यांचा उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा स्वीकारला गेला त्या तारखेपासून पेन्शन मिळेल. अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार, एकवेळा आमदार राहिलेल्या व्यक्तीला पेन्शन म्हणून ३५,००० रुपये प्रति महिना मिळतात, ही रक्कम अतिरिक्त टर्म आणि वयानुसार हळूहळू वाढत जाते. द इंडियन एक्सप्रेसने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.धनखड यांच्याप्रमाणे वयाची सत्तरी ओलांडलेल्या व्यक्तींना त्यांच्या पेन्शनमध्ये २० टक्के वाढ मिळते. माजी आमदार म्हणून धनखड यांना दरमहा ४२,००० रुपये पेन्शन मिळेले, असे अधिका-यांनी सांगितले. भारताचे माजी उपराष्ट्रपती आणि माजी संसद सदस्य म्हणून त्यांना मिळणा-या पेन्शनव्यतिरिक्त ही रक्कम असणार आहे. दरम्यान धनखड यांनी राजीनामा दिल्यापासून ते त्यांच्या कुटुंबाबरोबर सार्वजनिक जीवनापासून दूर राहिले आहेत. यासाठी त्यांनी त्यांच्या आरोग्याचे कारण दिले आहे.

### जामीन अर्जासाठी कराडचे वकील गैरहजर; सुनावणी १० सप्टेंबरला

***बीड / प्रतिनिधी-*** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात कारागृहात असलेल्या वाल्मीक कराडच्या जामीन अर्जावर आज ३० ऑगस्ट



रोजी निर्णय होणार होता. आरोपींचे वकील गैरहजर होते त्यामुळे पुढील सुनावणी १० सप्टेंबर रोजी होणार आहे.त्यामुळे जामीन अर्ज आणि दोष मुक्तीच्या अर्जावर १० सप्टेंबर रोजी निर्णय होईल.मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणातील आरोपींचे जामीन आणि दोषमुक्ती अर्ज अद्याप निकाली लागलेले नाहीत. आज न्यायालयात झालेल्या सुनावणीत काही आरोपींच्या अर्जांवर निर्णय राखून ठेवण्यात आला. तर काही अर्जांबाबत मूळ फिर्यादीचे म्हणणे न्यायालयासमोर न आल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली. या खटल्यातील महत्त्वाचा आरोपी वाल्मिक कराड याच्या जामिनाबाबत देखील पुढील सुनावणी आता १० सप्टेंबरला होणार आहे. त्यामुळे कराडला जामीन मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणात अनेक जण आरोपी म्हणून अडकले असून, काहींनी दोषमुक्तीची मागणी तर काहींनी जामीनासाठी अर्ज दाखल केला आहे.

### मनोज जरांगेंची भाषा मुजोरपणाची, गुणरत्न सदावर्तेंचा हल्लाबोल

**मुंबई** - मुंबईत गणेशभक्तांची हेळसांड होत आहे. मुंबईत छोटे व्यावसायिक यांना नाहक त्रास देणे, बेकायदेशीर रस्ता रोको हे सगळे मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या नावाखाली सुरू आहे. मनोज जरांगे यांचे हे आंदोलन फक्त आंदोलन नसून पवित्र आझाद मैदानाला लांच्छन लावणारे हे आंदोलन आहे. अत्यंत हिनप्रकारे भाषा वापरली जात आहे. जरांगेंचे टाळकं ठिकाणावर आहे का? जे कुणी मसीहा, गाडफादर आहेत त्यांना सांगायचे आहे, गणेशभक्त तुम्हाला माफ करणार नाहीत. गणपतीला मानणारे, पूजन करणारे तुम्हाला माफ करणार नाहीत. तुम्ही एका गोष्टी अनिष्ट गोष्टीला मदत करत आहेत. व्यासपीठावर



अर्वाच्च भाषा बोलतो, लायकीप्रमाणे तो बोलत आहे अशा शब्दात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यासह शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, शिव्यांची लाखोली जरांगेंच्या स्टेजवरून होत आहे. उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी केवळ दिखावा करून चालत नाही. अत्यंत खालच्या शब्दात जरांगे यांनी धनगर समाजाबाबत अपशब्द वापरले. एका समाजाचा सार्वजनिक अपमान करण्याचा अधिकार त्याला आहे का? दोन समाजात तेढ निर्माण करणारे हे विधान नाही का? लाजिरवाणे शब्द त्यांनी वापरले. जे शब्द जरांगे यांनी उच्चारले ते सांगताही येत नाहीत. लाज वाटायला हवी. माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्यासमोर संविधानाचे ज्ञान नसणारा बोलतोय. निवृत्ती न्यायमूर्तींना कधीही न्यायाधीश म्हणून कोर्टात बोलावले जाउ शकते. त्यांच्यासमोर कसली भाषा वापरली जाते? शरद पवार, उद्धव ठाकरे तुम्ही याचा विरोध करणार की नाही...याचे उत्तर तुम्हाला द्यावे लागेल असं त्यांनी म्हटलं. तसेच आज मुंबईतील मुख्य रस्ते, रेल्वे स्टेशन, रस्त्यांवरील फुटपाथ, विभाजक तोडण्याचे प्रयत्न करणे, हुल्लडबाजी करणे असले प्रकार देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत सुरू आहेत.

# गैरसोयीमुळे मराठा आंदोलकांचे प्रचंड हाल

## ■ आंदोलक उतरले रस्त्यावर ■ जरांगे पाटलांनी केले शांततेचे आवाहन

**मुंबई/ प्रतिनिधी-**मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या आझाद मैदानात सुरू असलेल्या आंदोलनाचा शनिवारी ३० ऑगस्टरोजी दुसरा दिवस आहे. हजारो मराठा आंदोलकांनी आझाद मैदान आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) परिसरात गर्दी केल्याने शहरात प्रचंड वाहतूक कोंडी झाली.

पावसामुळं आंदोलकांची गैरसोय वाढली असून, खाण्यापिण्याच्या सुविधा आणि स्वच्छतागृहांच्या कमतरतेमुळे त्यांचे हाल होत आहेत. त्यामुळे आक्रमक झालेल्या आंदोलकांनी शनिवारी सकाळी रस्त्यावर उतरून वाहतूक रोखून धरली. त्याची गंभीर दखल घेत मनोज जरांगे पाटील यांनी स्वयंसेवक पाठवून वाहतूक कोंडी सोडवण्याचे आवाहन केले.

सकाळी आंदोलक सीएसएमटी परिसरात रस्त्यावर उतरल्याने ईस्टर्न फ्रीवे आणि जे.जे. उड्डाणपूलाजवळ वाहनांच्या लांब रांगा लागल्या. मुंबई पोलिसांनी दंगल नियंत्रण पथक आणि रॅपिड ॲक्शन फोर्स तैनात केली असून, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस आयुक्त स्वातः रस्त्यावर उतरले आहेत. आंदोलकांनी रास्ता रोको केल्याने स्थानिक नागरिकांना आणि गणेशोत्सवासाठी बाहेर पडणा-या भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागला. त्यामुळे मुंबई पोलिसांनी पर्यायी मार्गांचा अवलंब करण्याचेआवाहन केले.

**पावसाचा त्रास, आंदोलकांचे हाल**

आझाद मैदानात पावसामुळे चिखल झाला असून, शौचालयांमध्ये पाण्याचा तुटवडा जाणवत आहे. परिसरातील खाउगल्ली आणि हॉटेल्स बंद असल्याने आंदोलकांचे खाण्यापिण्याचे हाल झाले. काही आंदोलकांनी स्वतःहून जेवण आणले असले, तरी पिण्याच्या पाण्यासाठी त्यांना वणवण करावी लागली. जरांगे यांनी मुंबई पोलिसांना आझाद मैदानाच्या आसपासची मैदाने तातडीने मोकळी करण्याची मागणी केली, जेणेकरून आंदोलकांना पार्किंग आणि विश्रांतीसाठी जागा मिळेल.

**अमित शाह यांनी घेतला आढावा**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देणे समाज हिताचे नसल्याचे महटले आहे. मात्र, जरांगे यांनी मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आम्ही इथेच उपोषण करून मेलो तरी मागे हटणार नाही, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, मुंबई दौ-यावर असलेल्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही मराठा आंदोलनाची माहिती घेतली असून, भाजपा नेते विनोद तावडे यांच्याशी याबाबत चर्चा केली आहे.

### सरकारचा मोठा निर्णय! हैदराबाद गॅझेट लागू करण्यास तत्वतः मंजुरी

#### माजी न्या. शिंदेंचा मनोज जरांगेंना शब्द

**मुंबई/प्रतिनिधीः** महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाचा आरक्षणप्रश्न सोडवण्यासाठी नेमलेल्या उपसमितीच्या आजच्या बैठकीनंतर मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी राज्य सरकारचं शिष्टमंडळ पाठवण्यात आलं होतं. मराठा आरक्षणासाठी गठीत केलेल्या निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीचे सदस्य आणि काही सनदी अधिका-यांनी मराठा आरक्षणाची मागणी घेउन मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांची भेट घेउन चर्चा केली.या चर्चेवेळी माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांनी मनोज जरांगे यांना सांगितलं की राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्यास तत्वत? मंजुरी दिली आहे. त्यावरील मनोज जरांगे यांच्या सूचना घेउन शिंदे समितीचे सदस्य आता मंत्रिमंडळ उपसमितीची भेट घेणार आहे.माजी न्या. संदीप शिंदे यांनी मनोज जरांगे यांच्याबरोबरच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. ते म्हणाले, काही प्रमाणात जरांगे यांचं समाधान झालं आहे. त्यांनी दिलेल्या सूचना मंत्रिमंडळ उपसमितीपुढे आम्ही मांडणार आहोत. काही गोष्टींना सरकारने तत्वत? मान्यता दिली आहे. त्यावरील जरांगे यांचं मत सकारला सांगू. त्यानंतर मंत्रिमंडळ पुढील निर्णय घेईल. सध्या सरकारने हैदराबाद गॅझेटला तत्वत? मान्यता दिली आहे.मराठा कुणबी एकच आहे याबाबत सरकारने अधिसूचना काढावी अशी मनोज जरांगे पाटील यांची मागणी आहे. यासंदर्भातील निर्णय होउ शकतो का? या प्रश्नावर उत्तर देताना संदीप शिंदे म्हणाले, सध्या हैदराबाद संस्थानच्या गॅझेटबाबत निर्णय घेण्यात आला आहे. यावर मी आणखी काही सांगू शकत नाही. मंत्रिमंडळ त्यावर निर्णय घेईल. हैदराबादमधील निजामशाही सरकारने मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात १९१८ साली एक आदेश म्हणजेच गॅझेट जारी केलं होतं. निजामाच्या राज्यात म?ाठा समाज बहुसंख्य होता. मात्र, शिक्षण व नोकरीत त्यांची उपेक्षा होत असल्याने निजामाने मराठा समाजाला हिंदू मराठा या नावाने शिक्षण व नोकरीत आरक्षण दिलं होतं. त्यांच्यासाठी काही जागा राखीव ठेवल्या होत्या. मराठा आरक्षणाच्या आजवरच्या आंदोलनांमध्ये याच गॅझेटचा सातत्याने हवाला दिला जात आहे.

### 50 टक्क्यांची मर्यादा हटवा

**अहिल्यानगर :** विविध समाजघटकांकडून आरक्षणाच्या मागण्या वाढल्या असून, मराठा-ओबीसी संघर्ष उभा ठाकला आहे. आजही आरक्षणाची आवश्यकता आहे. ही वस्तुस्थिती आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली ५० टक्क्यांची मर्यादा अडथळा ठरत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी घटना दुरुस्ती करणे आवश्यक आहे, अशी भूमिका शरद पवार यांनी अहिल्यानगर येथे मांडली.माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अरुण कडू यांच्या अमृतमहोत्सवी (७५ वर्षे) निमित्ताने येथील सहकार सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. शरद पवार म्हणाले की, छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणासाठी मराठा समाजाला आरक्षणाची दारे खुली केली. तेव्हापासून आरक्षणाच्या प्रवासाची सुरुवात झाली. मात्र,



काळाच्या ओघात विविध समाजघटकांकडून आरक्षणाच्या मागण्या वाढल्या.जर तामिळनाडू ७२ टक्के आरक्षण देउ शकत असेल, तर महाराष्ट्रासह इतर राज्यांनाही तो मार्ग उपलब्ध व्हायला हवा. त्यासाठी आवश्यक असल्यास घटनादुरुस्ती करावी लागेल. हा प्रश्न केवळ महाराष्ट्राचाच नाही, तर देशातील इतर राज्यांचाही आहे. त्यामुळे सर्व संबंधित राज्यांशी चर्चा करून संसदेमध्ये ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. यासाठी मी स्वतः काही सहका-यांशी बोलणी केली आहे, असे पवार म्हणाले.शेतकरी व सैन्यात कार्यरत असलेल्या समाजघटकांसमोर हा प्रश्न गंभीरपणे उभा आहे. संसदेत जर याबाबत निर्णय घ्यायचा असेल, तर केंद्र सरकारची स्वच्छ व न्यायाची भूमिका असली पाहिजे. तसे झाल्यास आरक्षणाचा प्रश्न निश्चित सुटेल, असा ठाम विश्वास पवार यांनी व्यक्त केला.

### मराठा आरक्षण आंदोलनाशी शरद पवारांचा संबंध नाही

**अहिल्यानगर/प्रतिनिधी-** मराठा आरक्षण आंदोलनासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस सारखे शरद पवार यांचे नाव घेत आहेत, परंतू या आंदोलनाचा शरद पवार यांचा कोठेही संबंध नाही. यापूर्वीही मराठा आंदोलकांशी त्यांचा संपर्क नाही, तरीही फडणवीस हे शरद पवार यांचे नाव घेउन पळवाट काढू पाहत आहेत, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी आज, शनिवारी नगरमध्ये बोलताना केला.



मराठा आरक्षण मागणीचे आंदोलन चिघळत ठेवून ते मोडून काढण्याचा राज्य सरकारचा डाव दिसतो, अन्यथा मुंबईत आंदोलन येण्यापूर्वीच त्यांच्याशी चर्चा करून मार्ग काढता आला असता. परंतु त्यांना मुंबईत येउ दिल्यानंतर त्यांची रसद तोडून आंदोलकांचे हाल केले जात आहेत, असाही आरोप प्रदेशाध्यक्ष शिंदे यांनी केला.

ऐन गणेशोत्सवाच्या काळात सरकारने हे आंदोलन मुंबईत येउ दिले, अन्यथा आंदोलन सुरू होण्यापूर्वीच सरकारने त्यांच्याशी चर्चा करून मार्ग काढायला हवा होता, असेही शिंदे यांनी सांगितले. यापूर्वीचे देवेंद्र फडणवीस सरकार तसेच त्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी अशी मनोज जरांगे पाटील यांची मागणी आहे. परंतु या आश्वासनांची पूर्तता न करता मुख्यमंत्री फडणवीस मात्र विरोधकांवर आरोप करत आहेत, त्यांचे असे बोलणे चुकीचे आहे. विरोधकांनी या आंदोलनाला कोठेही खतपाणी घातलेले नाही किंवा पाठिंबाही दिलेला नाही. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा आरक्षण सरकार देउ शकते, केंद्र आणि राज्यात दोन्हीकडे त्यांचे सरकार आहे. हवे तर ते आरक्षणाचा कोटा वाढवू शकतात. कोटा वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवू शकतात. त्यासाठी त्यांनी आंदोलकांशी चर्चा करायला हवी, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

### मराठा, ओबीसी आरक्षणावरून महाराष्ट्र तापला

#### *नागपुरात ओबीसी समाजाचे साखळी उपोषण*

**नागपूर/प्रतिनिधीः** मुंबईमध्ये मराठा समाजाने ओबीसीमधून आरक्षण मिळावे म्हणून चक्काजाम केले आहे तर दुसरीकडे आमच्यातील आरक्षण कुणालाही देउ नये, त्यासाठी ओबीसीने उपराजधानी नागपूरमध्ये साखळी उपोषणाला सुरूवात केली आहे. त्यामुळे फडणवीस सरकार काय निर्णय घेणार? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.



ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, यासाठी आजपासून आम्ही आंदोलन करत आहे, अशी माहिती राष्ट्रीय ओबीसी महासंघ, राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी दिली. विनोद तावडे हे आज अमित शाह यांना भेटून ५० टक्के घातलेली मर्यादा शिथिल करून मराठ्यांना आरक्षण देता असेल तर आम्हाला त्याचा विरोध नाही, आम्ही आमच्या लोकसंख्येप्रमाणे आरक्षण मागू.. नाहीतर लवकरात लवकर जातनिहाय जनगणना करावी, असे तायवडे म्हणाले.त्यासोबत तहसीलदार वंशावळ जुळवण्यासाठी प्रयत्न करत आहे. ज्यांचाकडे नोंदी आहेत, त्यांना देण्यास हरकत नाही. आम्ही आजपासून साखळी उपोषण सुरू करत आहे, गरज पडल्यास आम्ही मुंबईला जाण्यासाठी तयारी करू, असेही बबनराव तायवाडे म्हणालेत. आज नागपुरात साखळी उपोषण सुरू होत आहे, टप्प्या टप्प्याने इतर जिल्ह्यात आम्ही आंदोलन करू असेही बबनराव तायवाडे म्हणालेत. जरांगे पाटील यांनी आंदोलन केले आहे, ओबीसी समाजात असंतोष आहे. संविधान चौकात साखळी उपोषणाची सुरवात होत आहे. सरकार ओबीसींचा पाठीशी आहे, घाबरण्याची गरज नाही. नवीन जात यात समाविष्ट होणार नाही. ओबीसी समाजाने आंदोलन पुकारले, असंतोषाचे वातावरण पुकारले, मागील वेळी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना आश्वासन दिले की ओबीसीला धक्का लागणार नाही, असे ओबीसी नेते प्रणय फुके म्हणाले.

# परदेशी स्वस्त कापसामुळे शेतकरी संकटात

## केंद्राच्या धोरणावर शेतकरी नाराज 1 ऑक्टोबरनंतर आयात वाढणार

**नागपूर/प्रतिनिधीः** केंद्र सरकारने १८ ऑगस्ट रोजी कापसावरील ११ टक्के आयात शुल्क ३० सप्टेंबरपर्यंत शून्य करण्याचा निर्णय घेतला होता. अवघ्या १० दिवसांत या निर्णयाला ३१ डिसेंबरपर्यंतची मुदतवाढ दिली आहे. कापड मिल मालकांचा दबाव व अमेरिकेच्या टॅरिफच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या या निर्णयामुळे देशांतर्गत बाजारातील कापसाचे दर प्रचंड दबावात आले असून, कापसाची आयात १ ऑक्टोबरनंतर किमान २० लाख गाठींनी वाढणार आहे. भारताच्या तुलनेत जागतिक बाजारात कापसाचे दर कमी आहेत. त्यामुळे कापड मिल मालक दोन वर्षांपासून कापसावरील आयात शुल्क हटविण्याची मागणी करीत आहेत. त्यातच भारतीय शेतीक्षेत्र आयातीसाठी खुले करण्याच्या दृष्टीने अमेरिकेने भारतावर आधी २५ टक्के टॅरिफ लावला आणि नंतर त्यावर २५ टक्के पेनल्टी लावून हा टॅरिफ ५० टक्के केला. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने कापड मिल मालकांची मागणी पुढे करीत १८ ऑगस्टला कापसावरील आयात ३०



सप्टेंबरपर्यंत शुल्क शून्य केला. या निर्णयाचा अमेरिकेतर काहीच परिणाम न झाल्याने सरकारने कुणाचाही मागणी नसताना याला २८ ऑगस्ट रोजी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली.

**शेतक-यांवर परिणाम कसा?**

७,५०० रुपये प्रतिक्विंटल सध्याचा कापूस दर ६,५०० ते ७,००० रुपये प्रतिक्विंटल संभाव्य दर केंद्र शासनाचा निर्णय ट्रम्पला खूश करणारा आहे. याचा फटका शेतक-यांना सहन करावा लागणार आहे. येणा-या काळात कापसाचे भाव आणखी पडण्याचा धोका असल्याचे कृषितज्ज्ञ विजय जावंधिया यांनी सांगितले.

**अमेरिकन टॅरिफचे आव्हान-** अमेरिकेने २०२५ च्या ऑगस्ट महिन्यात भारतीय वस्त्र निर्यातीवर ५० टक्क्यांपर्यंतचे आयात शुल्क लादले आहे. या निर्णयामुळे भारतीय वस्त्र उद्योगावर मोठा दबाव आला आहे. कारण अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा निर्यात बाजार आहे. या निर्णयामुळे भारतीय वस्त्र उद्योगाच्या स्पर्धात्मकतेत घट झाली आहे. कारण बांगलादेश, व्हिएतनाम आणि चीनसारख्या इतर देशांमध्ये आयात शुल्क कमी आहे. उदाहरणार्थ, बांगलादेश आणि व्हिएतनाममध्ये २० टक्के आयात शुल्क आहे, तर चीनमध्ये ३० टक्के आहे.

**राज्यात ३० लाख कापूस उत्पादक शेतकरी-** देशात सुमारे ६० लाख शेतकरी थेट कापूस लागवडीशी जोडलेले आहेत, तर महाराष्ट्रात ३० लाख शेतकरी कापूस लागवडीशी जोडले गेले आहेत. अप्रत्यक्षपणे ग्रामीण मजूर, पिकउचलणी, जिनिंग-प्रेसिंग यंत्रे, वाहतूक अशा शेकडो क्षेत्रांमधून कोट्यवधी लोकांना रोजगार मिळतो. त्यामुळे कापूस हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया मानला जातो. भारत हा दुस-या क्रमांकाचा कापूस उत्पादक देश आहे. वार्षिक ३ अब्ज ड?लरपेक्षा जास्त कापूस व कापूस-आधारित उत्पादने परदेशात निर्यात केली जातात.

# संपादकीय

प्रबंध संपादकः प्रदीप देशपांडे

## भारतापुढे संधी

विक्षिप्त राजकारणी डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफची अंमलबजावणी सुरू झाल्यामुळे भारतात ज्वेलरी, मत्स्योद्योग,कापड उद्योग, फर्निचर उद्योग आदींवर परिणाम होणार आहे. काही कारखाने लगेच बंद होतील, अशा बातम्या आहेत. टॅरिफ संकट आहेच; परंतु त्याने लगेच घाबरण्याची आवश्यकता नाही. संकट ही संधी मानून मात करता येते. अमेरिकेच्या शुल्कवाढीचे संकटही दूर होईल. त्यासाठी धीर, संयम आवश्यक आहे. अमेरिकेने शुल्कवाढ लागू केल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम मर्यादित असेल, असेही अनेकांना वाटत आहे. भारताने अमेरिकेच्या अटी मान्य न केल्याने भारतातील सर्वात मोठे दुग्ध क्षेत्र सुरक्षित राहील. त्यात दहा कोटी लोकांना थेट रोजगार मिळाला आहे. भारताची अर्थव्यवस्था सुमारे ३३९ लाख कोटी रुपयांची आहे. भारत दर वर्षी जगाला सुमारे ३८,३५,००० कोटी रुपयांच्या वस्तू निर्यात करतो. यापैकी सात लाख ६५,००० कोटी रुपयांच्या वस्तू एकट्या अमेरिकेला निर्यात केल्या जातात. हे प्रमाण जगाच्या एकूण निर्यातीच्या तीस टक्के आहे. अमेरिकेने ५० टने शुल्क लादण्याच्या चर्चेदरम्यान याचा परिणान सर्व उत्पादनांवर होणार नाही, तर काही श्रेणीतील वस्तूंवर होईल, असा अंदाज लावला जात आहे. तज्ज्ञांच्या मते याचा परिणाम सुमारे तीन लाख वीस हजार कोटी रुपयांच्या निर्यातीवर होऊ शकतो. अमेरिकेला होणारी ठराविक उत्पादनांची निर्यात पूर्णपणे थांबल्यास भारताच्या एकूण निर्यातीपैकी ८.५ टक्के निर्यात थांबेल; परंतु हे देशाच्या प्रचंड अर्थव्यवस्थेच्या एक टक्क्यांपेक्षा कमी आहे. अमेरिकेच्या शुल्कवाढीमुळे भारताला होणारे नुकसान हा चिंतेचा विषय नाही. भारताने अमेरिकेच्या दबावापुढे झुकून आपला डेअरी बाजार विदेशी उत्पादनांसाठी उघडला असता, तर कोट्यवधी शेतकरी आणि कर्मचा-यांचे जीवनमान धोक्यात आले असते. या संदर्भात भारताच्या काही निर्यातीवर परिणाम झाला, तरी त्या बदल्यात देशाचा मोठा डेअरी उद्योग सुरक्षित राहील. भारताने अमेरिकेच्या दबावाकडे दुर्लक्ष करून आपल्या हितांना प्राधान्य दिले आहे. भारताने अमेरिकेच्या टेरिफ दबावापुढे झुकण्यास नकार दिला असेल, तर तो कोणत्याही नुकसानापेक्षा देशांतर्गत हितांचा विजय आहे. ट्रम्प यांचे हे पाऊल केवळ दबावाचे राजकारण आहे. शुल्कवाढीमुळे विविध क्षेत्रांवर काय परिणाम होतील, याचे अंदाज वेगवेगळ्या संस्थांनी व्यक्त केले आहेत. 'ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह' च्या ताज्या अहवालानुसार, या निर्णयाचा अमेरिकेतील भारताच्या ६०.२ अब्ज डॉलर निर्यातीवर थेट परिणाम होईल. भारतातून अमेरिकेत एकूण निर्यात ८६.५ अब्ज डॉलर असते. त्यात ४९.६ अब्ज डॉलर घट होऊ शकते. म्हणजेच फक्त एका वर्षात ३६.९१ अब्ज डॉलरचे नुकसान होऊ शकते. अमेरिकेतील व्यापार केवळ १८.६ अब्ज डॉलर्सपर्यंत कमी होऊ शकतो. भारताची निर्यात या पातळीपर्यंत घसरल्यास लाखो लोकांच्या नोकऱ्यांवर परिणाम होऊ शकतो तसेच जागतिक पुरवठा साखळीतील भारताची भूमिकादेखील कमकुवत होऊ शकते. चीन, व्हिएतनाम, मेक्सिको, तुर्कस्तान, पाकिस्तान, नेपाळ, ग्वाटेमाला आणि केनियासारखे देश अमेरिकन बाजारपेठेल भारताची जागा घेऊ शकतात. भविष्यात कर कमी केले, तरी एकदा या देशांनी मजबूत स्थान प्रस्थापित केले, की भारताला बाजारपेठ परत मिळवणे कठीण होईल. अर्थतज्ज्ञांच्या मते हे संकट भारताच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेला धक्का देऊ शकणार नाही. असे असले तरी भारताची अंतर्गत अर्थव्यवस्था आणि व्यापक व्यापार भागीदारी गंभीर नुकसानीपासून वाचवू शकते.आजघडीला भारताकडे मजबूत परकीय चलन साठा, स्थिर बँकिंग व्यवस्था आणि सतत वाढणारा देशांतर्गत वापर असल्याने जीएसटी आणि उत्पादन-आधारित प्रोत्साहन (पीएलआय) योजना, डिजिटलायझेशन आणि पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या गुंतवणुकीमुळे देशांतर्गत बाजारपेठ अधिक लवचिक बनली आहे तसेच भारत आता केवळ अमेरिकेवर अवलंबून नाही. युरोप, ब्रिटन, रशिया, आखाती देश आणि आसियान देशांशी भारताचे व्यापारी संबंध मजबूत होत आहेत. यामुळे भारताला पर्यायी बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळण्यास मदत होईल. येत्या काळात 'मेक इन इंडिया' सेमीकंडक्टर मोहीम आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि हरित ऊर्जा क्षेत्रातील वाढती ताकद भारताला जागतिक पुरवठा साखळीत कायमस्वरूपी आणि विश्वासार्ह भागीदार बनवेल. अमेरिकेचा कितीही दबाव असला, तरी भारत त्याचा सामना करण्यासाठी आपली ताकद वाढवत राहील. भारताने सुरुवातीलाच स्पष्ट केले होते, की तो अमेरिकेच्या दादागिरीसमोर झुकणार नाही. जगातील अनेक देशांवर लादल्या गेलेल्या करांमुळे अमेरिकेच्या तिजोरीमध्ये अब्जावधी डॉलर्स आले आहेत, असे ट्रम्प अभिमानाने सांगत असले, तरी हे पैसे अमेरिकन लोकांच्या खिशातून येत आहेत हे त्यांना समजत नाही. शुल्कवाढीमुळे महाग झालेल्या परदेशी वस्तू अमेरिकन लोक खरेदी करत राहणार असतील, तर ते त्याशिवाय राहू शकत नाहीत, असे मानायला हरकत नाही. त्यामुळे नजीकच्या भविष्यकाळात ट्रम्प यांच्याविरुद्धचा असंतोष वाढत जाईल. आताही अमेरिकेतील विरोधी पक्ष आणि त्यांच्या स्वतःच्या पक्षातील लोक ट्रम्प यांना टॅरिफ वॉरबाबत चर्चा करण्याचा आग्रह धरतात. भारतासारखा मित्र गमावल्याने अमेरिकेला खूप किंमत मोजावी लागेल; परंतु डोनाल्ड ट्रम्प हे नोबेल पारितोषिक मिळवण्याच्या इर्षेने इतके आंधळे झाले आहेत, की त्यांना अमेरिकेचे नुकसानही दिसत नाही. चीन भारतापेक्षा जास्त कच्चे तेल रशियाकडून खरेदी करत आहे; परंतु भारतावर त्याच कारणासाठी आयात शुल्क लावणारी अमेरिका चीनवर कारवाई करण्यास धजावत नाही. चीनने आधीच 'रेअर अर्थ मॅग्नेट'चा पुरवठा थांबवून अमेरिकेला आपली शक्ती दाखवली आहे. ट्रम्प यांना प्रत्यक्षात फक्त सत्तेची भाषा समजते. म्हणूनच आता आपल्याला स्वदेशीकरणाला चालना द्यावी लागेल आणि आपली अर्थव्यवस्था इतकी स्वावलंबी बनवावी लागेल, की केवळ ट्रम्पच नाही तर कोणताही देश आपल्याकडे डोळे वटारून पाहणार नाही. अमेरिकेच्या शुल्कवाढीमुळे आपले अल्पकालीन नुकसान होईल; परंतु आपण त्यातून शिकू आणि स्वावलंबी होऊ शकलो, तर त्यातून कायमस्वरूपी आत्मविश्वास आणि अंतिम हित साधले जाईल. मार्ग थोडा खडतर आहे; पण तो चोखाळण्यातच भारताचे हीत आहे.

# भारत, चीन संबंध बुध्दीबळाचा खेळ

**भारतीय नेतृत्व चिनी काव्याला बळी पडणार की काय, या भावनेने अनेक त्रस्त आहेत. पण हीच काळजी चीनला आहे. भारत-अमेरिका ताणलेले संबंध पूर्ववत होऊ शकतात आणि तसे झाले तर भारत काय करेल, या विचाराने चीन त्रस्त आहे. चीन सातत्याने याच विचारांच्या दडपणाखाली कसा राहील, याची खबरदारी भारताने घ्यायला हवी. शेवटी भारत, चीन, अमेरिका संबंध म्हणजे बुद्धिबळाचा खेळ आहे. वेगवेगळ्या चाली करून आपण आपले राष्ट्रीय हित जपले पाहिजे.**

घनिष्ठ मैत्रीची इच्छा व्यक्त करीत भारताच्या दौऱ्यावर आलेले चीनचे परराष्ट्र मंत्री लगेच अफगा णिस्तान आणि पाकिस्तानच्या दौ?यावर गेले. तिकडे चीन-पाकिस्तान संबंध पोलादासारखे मजबूत होते आणि राहतील असे त्यांनी सांगितले. हिंदी-चिनी भाई-भाईच्या घोषणांच्या मागून भारताशी दगाबाजी करणारा चीन भारतीयांच्या स्मृतीत आहे. त्यात चीनच्या अशा वागण्यामुळे त्याच्या विषयीचा संशय अधिकच वाढतो. अर्थात चीन तसाच राहिला असला तरी काळानुसार भारत बदलला आहे आणि आपले राष्ट्रीय हित राखून आहे.

पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका या देशांतील सत्ताधा-यांना हाताशी धरून भारताला जेरीस आणण्याचे कार्य चीन अव्याहतपणे करीत आहे. नक्षलवाद्यांना, ईशान्य पूर्व भागातील फुटीरतावादी गटांना शस्त्र आणि पैसा पुरवणे, कश्मीर आणि खलिस्तानी दहशतवाद्यांना मदत करणे, अशा अनेक भारतविरोधी कारवायांमध्ये चीनचा सहभाग असतो. अलीकडे नेपाळ आणि मालदीवसारख्या देशांनी घेतलेल्या भारतविरोधी भूमिकेमागेही चीनची आर्थिक ताकद उभी होती.

चीनविरोधी देशांशी संबंध दृढ करण्याच्या भारताच्या प्रयत्नांना खूप उशिरा सुरुवात झाली. जपान, दक्षिण कोरिया, मंगोलिया, फिलिपाईन्स, व्हिएतनाम या देशांबरोबर भारताने राजनैतिक आणि लष्करी संबंध वाढवायला सुरुवात केली आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान आणि भारत यांनी बनवलेली 'क्वाड' नावाची संघटना चीनच्या इंडो-पॅसिफिक भागातील दादागिरीला आळा घालण्यासाठी अस्तित्वात आली. डोकलाम संघर्षामुळे चीनला टक्कर देऊ शकतो, असा आत्मविश्वास इतर देशांना भाराताविषयी वाटू लागला.

चीनविरोधात अमेरिकेची अनुकूल भूमिका असतानाही, भारत अमेरिकेमागे वाहवत गेलेला दिसत नाही. कारण आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीच कोणाचा सर्वकाळ मित्र नसतो, हे आपण अनुभवातून शिकलो आहोत. त्याची प्रचीती अमेरिकन आयात शुल्काच्या रूपात आपल्याला आली आहे. रशियन तेलाचे कारण पुढे करून डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयात शुल्क लावायची घोषणा केली. पाकिस्तान, बांगलादेश या भारताच्या शत्रूशी अधिक जवळीक साधून, कालपर्यंत भारताला मित्र म्हणवणा-या अमेरिकेने एका क्षणात भारताशी शत्रुत्व पत्करले आहे. अमेरिकेने भारताच्या पाठीत खंजीर खुपसला असल्याची जनभावना आहे.१९६२ साली चीननेही हेच केले होते. पण या वेळी अमेरिकेबाबत आपण बेसावध होतो काय? अमेरिका आपल्याला कधीही दगा देऊ शकते, याची जाणीव असल्यानेच भारताने आपला जुना मित्र रशियाची साथ सोडली नाही.

अमेरिकेपासून दूर जाऊ लागलेल्या भारताला आपल्या समूहात ओढण्यासाठी चीन तत्परतेने पुढे आला आहे. 'ग्लोबल टाइम्स' या चीनच्या मुखपत्रातून ड्रगन आणि हत्ती एकत्र नाचू शकतात, भारताच्या पंतप्रधानांचे चीनमध्ये स्वागत आहे वगैरे सकारात्मक मजकूर लगेच छापून आले. चीनची बाजारपेठ भारतीय मालासाठी खुली आहे, असे सांगितले जाऊ लागले. खतं, रेअर अर्थ मेटल आणि विशिष्ट यंत्रसामुग्री भारतासाठी उपलब्ध करून देण्याचे आश्वासनदेखील चीनने दिले आहे. सीमारेषेवरून व्यापार सुरू करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या आणि याबाबत नेपाळने घेतलेल्या आक्षेपाकडे चीनने सध्यातरी कानाडोळा केला आहे. चीनच्या भारतातील राजदूतांनी भारत आणि चीन आशियाई विकासाचे 'डबल इंजिन' आहे, असे संबोधले. अर्थात यामुळे हुरळून जाण्याइतका भारत बालीश नाही. चीन विशिष्ट हेतूने आपल्याशी मैत्री करून इच्छित आहे, हे आपण जाणतोच आणि आपणदेखील आपले हेतू साध्य करण्यासाठीच चीनशी मैत्रीपूर्ण संबंध वाढवू इच्छितो.

ऑगस्ट महिना अखेरीस होणाऱ्या 'शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन (एससीओ)' या संघटनेच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी चीनला जात आहेत.



मोदींची ही चीन भेट सात वर्षांनंतर होत आहे. या बैठकीच्या निमित्ताने चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि नरेंद्र मोदी यांच्या होणा-या भेटीकडे जगाचे लक्ष आहे. या भेटीचे प्रतीकात्मक मूल्य जास्त आहे. अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मनमानी आणि एकांगी राजकारणाला प्रत्युत्तर म्हणून या भेटीकडे पाहिले जात आहे.

तिकडे अफगाणिस्तानात चीन-पाकिस्तान आणि अफगाणिस्तान अशी त्री सदस्यीय बैठक नुकतीच पार पडली. अफगाणि स्तानातील तांबे, सोने, लोखंडाच्या खाणी आणि खनिज तेलाचे मिळू शकणारे साठे चीनला अफगाणिस्तानकडे आकर्षित करत आहेत.'चीन पाकिस्तान इकोनॉमिक कॉरिडोर (सीपीईसी)' या नावाने ओळखल्या जाणा-या प्रकल्पाचा विस्तार अफगाणिस्तानात करावा अशी चीनची इच्छा आहे.

अमेरिका आणि पाकिस्तान हे आणखी दोन घटक भारताच्या राजकारणावर प्रभाव टाकत असल्याने इथल्या कोणत्याच प्रश्नाचे उत्तर सोपे सुटसुटीत मिळणार नाही.

त्यातून मार्ग काढणे हा कूटनीतीचा भाग आहे. त्यासाठी लागणारी दीर्घकाळ पाठपुरावा करण्याची क्षमता आणि वाट पाहण्याची क्षमता, हे गुण भारतात आहेत.

भारताच्या दौ-यावर आलेले चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी भारत दौरा आटोपून लगोलग पाकिस्तानच्या भेटीस गेले. भारताशी मैत्रीचे नाटक करून भारताच्या शत्रूशी हातमिळवणी करणारा चीन पाहून बहुतेकांना दगाबाज चीन आठवला. परत भारतीय नेतृत्व चिनी काव्याला बळी पडणार की काय, या भावनेने अनेक त्रस्त आहेत. पण हीच काळजी चीनला पण आहे. भारत-अमेरिका ताणलेले संबंध पूर्ववत होऊ शकतात आणि तसे झाले तर भारत काय करेल, या विचाराने चिनी त्रस्त आहे. येणाऱ्या काळात चीन सातत्याने याच विचारांच्या दडपणाखाली कसा राहील, याची पूर्ण खबरदारी भारताने घ्यायला हवी. शेवटी भारत, चीन, अमेरिका संबंध म्हणजे बुद्धिबळाचा खेळ आहे.

वेगवेगळ्या चाली करून आपण आपले राष्ट्रीय हित जपले पाहिजे. ते कसे जपले जाते यावर भविष्यातील बरेच काही अवलंबून आहे.

ब्रि. हेमंत महाजन

# टॅरिफ वाढमुळे व्यापारी वर्ग अडचणीत

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी संरक्षणवादी अजेंड्याच्या माध्यमातून चीन, कॅनडा आणि मेक्सिको यांच्यावर टॅरिफ लावून व्यापार युद्धाची सुरुवात केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे जागतिक बाजारपेठांमध्ये मोठा हलकल्लोळ निर्माण झाला आहे. या तीनही देशांनी त्याला प्रत्युत्तर देण्याची घोषणा केल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारयुद्ध सुरु शक्यता निर्माण झाली आहे. कॅनडाने आधीच अमेरिकन आयातीवर टॅरिफ लावण्याची घोषणा केली आहे तर मेक्सिकोदेखील तशीच भूमिका घेण्याच्या तयारीत आहे तर दुसरीकडे मागील टॅरिफ संघर्षामुळे आधीच त्रस्त असलेला चीन आता जोरदार प्रत्युत्तराची तयारी करत आहे. चीन हे प्रकरण जागतिक व्यापार संघटनेकडे जाण्याचा विचार करत आहे. यादरम्यान भारतावर अमेरिका किती टॅरिफ आकारणार याबाबत सर्वांनाच मोठी उत्सुकता होती. डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतीच एक उपरोधिक टिपण्णी करत आपला मित्र भारत पंचवीस टक्के टॅरिफ भरू लागेल, अशी घोषणा केली आहे. तसेच रशियाकडून तेल आयात सुरु ठेवल्याबद्दल भारताला दंडालाही सामोरे जावे लागेल असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.

वास्तविक पाहता भारतासोबत व्यापार करताना अमेरिकेला अधिक फायदा व्हायला पाहिजे, ही डोनाल्ड ट्रम्प यांची मागणी आहे. डोनाल्ड ट्रम्प यांना भारताच्या परिस्थितीचा काहीही पर्वा नाही. खेदाची गोष्ट म्हणजे, ते भारताला मित्र म्हणतात. पण त्यांना भारताची खरेच काळजी आहे का, ही स्पष्ट होणे गरजेचे आहे. आता प्रश्न उरतो तो डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयात आगामी काळात काही बदल होण्याची शक्यता आहे का. अधिक टॅरिफमुळे देशांमधील मैत्रीवर परिणाम होईल का? सध्या असे अनेक अभियान व करार अस्तित्वात आहेत. ज्यांच्या पार्श्वभूमीवर भारत आणि अमेरिका एकत्रित मैत्रीच्या वाटचालीवर आहेत. भारताचे धोरण दीर्घकाळापासून संरक्षणवादी राहिलेले आहे. भारताची लोकसंख्या आणि सामाजिक रचना अमेरिकेपेक्षा खूप वेगळी आहे. इथल्या जनतेला संरक्षणाची गरज आहे. अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा व्यापारिक भागीदार राहिलेला आहे. २०२४ मध्ये दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार १९० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला होता. डोनाल्ड ट्रम्प आणि नरेंद्र मोदी यांनी याला ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते. परंतु आता त्या लक्ष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत भारतीय कंपन्यांनी नवीन बाजारपेठा शोधले पाहिजेत. आणि त्यांचा विस्तार करण्यावर अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे.

प्रा. मधुकर चुटे
नागपूर
९४२०५६६४०४

# मराठा आंदोलन: 'वेळेचे राजकारण' आणि सामान्य जनतेला 'त्रास'

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलन पुकारले आहे. हे आंदोलन आता केवळ आरक्षणाच्या मागणीपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर त्यात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. यात जरांगे यांच्या नेतृत्वापासून ते आंदोलनाच्या वेळेपर्यंत अनेक गोष्टींची चर्चा होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच लक्ष्य का?

मराठा समाजाला पहिल्यांदा नोकरीत आरक्षण देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री काळात मिळाले होते. तसेच, मराठा समाजाचे स्वयंभू नेते म्हणून ओळखले जाणारे शरद पवार स्वतः मुख्यमंत्री असतानाही हे आरक्षण देऊ शकले नाहीत. त्यांच्या नंतरही अनेक मराठा मुख्यमंत्री झाले, पण हा प्रश्न मार्गी लागला नाही. हा इतिहास मराठा समाजाला माहीत असतानाही जरांगे पाटील वारंवार देवेंद्र फडणवीस यांनाच लक्ष्य करत आहेत. मराठा आरक्षणाव्यतिरिक्त मराठा समाजाच्या इतर ज्या मागण्या उदा. सारथी संस्था, वसतिगृहे, शिक्षण कर्ज इत्यादी बहुतांश महायुती सरकारने पूर्ण केल्या आहेत. ही बाब सर्वश्रुत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष करतात. त्याचवेळी उपमुख्यमंत्री एकनाथ



शिंदे आणि अजित पवार यांच्याबद्दल मात्र ते काहीच बोलत नाहीत उलट कौतुकाचे शब्द बाहेर पडतात. एवढेच नव्हे तर महाविकास आघाडी सरकारच्या काळात मराठा आरक्षणाचा मुद्दा न्यायालयात टिकला नाही त्या शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या बाबत तसेच या सरकारचे सर्वेसर्वा शरद पवारांच्या बाबत ब्रा काढत नाही.

**व्यक्तीगत टीकेची पातळी**

कोणत्याही आंदोलनात मागणी, प्रगती आणि पुढील नियोजनावर चर्चा होणे अपेक्षित असते. परंतु, जरांगे पाटील यांच्या आंदोलनात वारंवार देवेंद्र फडणवीस यांच्यावर वैयक्तिक टीका केली जाते. नुकतेच त्यांनी फडणवीसांच्या आईबद्दलही आक्षेपार्ह वक्तव्य केले. समाजाच्या हक्कासाठी लढताना कोणत्याही व्यक्तीच्या कुटुंबाला विनाकारण वादात ओढणे योग्य नाही. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा जयघोष करणाऱ्या जरांगे यांच्या वागण्यात त्यांच्या विचारांची झलक दिसत नाही.

**वेळेचे गणित आणि सामान्य जनतेची गैरसोय**

गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा सण आहे. या काळात मुंबईसह इतर शहरांतून मोठ्या संख्येने लोक आपापल्या गावी, विशेषतः कोकणात जात असतात. अशा वेळी त्यांना त्रास होऊ नये याची काळजी घेणे आवश्यक आहे. परंतु, जरांगे पाटील यांनी जाणीवपूर्वक हीच वेळ निवडली, जेणेकरून मुंबईची परिस्थिती बिकट होईल आणि सरकार त्यांच्या मागण्या मान्य करेल. त्यांच्या या आंदोलनामुळे मुंबई आणि पुण्यातील सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

**पुढील मार्ग आणि सरकारची भूमिका**

मराठा आरक्षणाला समाजाचा पाठिंबा असला तरी, याचे दूरगामी परिणाम सर्व स्तरांवर होणार आहेत. सरकारने मराठा समाजाला १० टक्के अतिरिक्त आरक्षण दिले आहे. या परिस्थितीत, जरांगे पाटील यांनी या परिणामांचा विचार करून, आपल्या मागण्या सरकारसमोर योग्य पद्धतीने मांडून यातून सामंजस्याने मार्ग काढणे आवश्यक आहे. यापूर्वी मराठा समाजाला मिळालेल्या आरक्षणांचा याआधीच्या महाविकास आघाडी सरकारच्या काळात न्यायालयात कसा पराभव झाला आहे, याचा विचार करून सरकारने एक मजबूत आणि टिकणारे कायदेविषयक पाऊल उचलणे महत्त्वाचे आहे.

अविनाश देशपांडे

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# 'डायट'चा सर्वांगीण विकास करणार - पालकमंत्री

## लेखनिक विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्याचा प्रस्ताव

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ – जिल्ह्याची शैक्षणिक आणि सांस्कृतिक धरोहर असलेल्या येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे (डायट)चे शिक्षण क्षेत्रात अमूल्य योगदान आहे. शिक्षण क्षेत्रातील मातृसंस्था असलेल्या 'डायट'चा सर्वांगीण विकास करून संस्थेचे शैक्षणिक महत्त्व कायम राखले जाईल, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी केले. या इमारतीच्या नूतनीकरण व विद्यार्थी गौरव सोहळ्यात ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमास संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे, माध्यमिक शिक्षणाधिकारी रवींद्र काटोलकर, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. वैभव सावरकर, डॉ. स्नेहा राऊत, कार्यकारी अभियंता प्रशांत भिरभाते आदी उपस्थित होते. दहावी, बारावीच्या परीक्षेत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी लेखनिक म्हणून काम करणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह यावेळी विशेष गौरव करण्यात आला. पडद्यामागे राहून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या यशाचे खरे शिल्पकार ठरलेल्या या लेखनिकांच्या निःस्वार्थ सेवेमुळे अनेकांचे भविष्य उज्ज्वल झाले आहे, असे कौतुकोद्गार पालकमंत्री संजय राठोड यांनी यावेळी काढले. क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अतिरिक्त गुणांच्या धर्तीवर दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी लेखनिक म्हणून काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील अतिरिक्त गुण मिळावा, यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश पालकमंत्री राठोड यांनी दिले. लवकरच या संदर्भात शिक्षणमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना संजय राठोड यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याची कॅप भेट देण्यात आल्या. संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे यांच्या पुढाकाराने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचा कायापालट झाला. कोविड काळात या संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे यांनी राबविलेला 'शाळा आई-बाबांची' हा उपक्रम आवर्जून ... संकल्पनेमुळे यवतमाळ जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर झळकले, असे गौरवोद्गार मंत्री राठोड यांनी काढले. संस्थेचे राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठी तातडीने प्रस्ताव सादर करून ही कामे पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी पालकमंत्र्यांनी बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना दिल्या. ... संजय राठोड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# मेरा युवा भारत कार्यालयाद्वारे राष्ट्रीय क्रीडा दिवस साजरा



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : युवा कार्यक्रम विभाग, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकारच्या मेरा युवा भारत कार्यालय व जिल्हा हॉकी असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त मेजर ध्यानचंद चौक येथे विनम्र अभिवादन व राष्ट्रीय क्रीडा दिवस निमित्त हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सर्वप्रथम मेजर ध्यानचंद चौक आर्णी रोड येथे सकाळी हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पुजन पोलिस विभागाचे अधिकारी रमेश धावाडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, क्रीडा अधिकारी महेश पडोळे, आंतरराष्ट्रीय खेळाडू यशवंत इसराणी तसेच हॉकी जिल्हा असोसिएशनच्या अध्यक्ष मनिषा आकरे, मेरा युवा भारतचे अनिल ढेंगे, छत्रपती पुरस्कार विजेते उल्हास नंदुरकर, रितेश भगत, राजेंद्र शिरसाट, दिलीप गौतम, साहेबराव राठोड यांनी मेजर ध्यानचंद यांना विनम्र अभिवादन केले. त्यानंतर शारिरीक शिक्षण संघटनेचे जितेंद्र सातपुते यांनी उपस्थित खेळाडूंना शपथ दिली. त्यानंतर हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त व राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त हॉकी स्पर्धेचे आयोजन विशुद्ध शिक्षण संस्थेच्या उमरसरा येथील कॉलेजच्या मैदानावर करण्यात आले. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून पोलिस अधिकारी रमेश धावाडे तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, क्रीडा अधिकारी महेश पडोळे, मेरा युवा भारतचे अनिल ढेंगे, हॉकीपटू यशवंत इसराणी, मनिषा आकरे यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. हॉकी स्पर्धेमध्ये मुले, मुली यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडू व विजयी चमू ... आणि प्रमाणपत्र देवून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यशस्वीतेसाठी मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी सागर मेश्राम, कार्यक्रम अधिकारी अनिल ढेंगे व मनिष आडे, रवि शेळके तसेच हॉकी जिल्हा असोसिएशनच्या अध्यक्ष मनिषा आकरे यांनी सहकार्य केले.

# लेंडीनाल्याचा पुन्हा प्रकोप, पालीकेने आता तरी जागे व्हावे

## नाल्या काढच्याआनेक घरात घुसले पाणी, लेंडी नाल्याचे तातडीने रुंदीकरण, खोलीकरण करा

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड : काल दि 29 ऑगस्ट रोजी अतिवृष्टीमुळे दि. १५-१६ ऑगस्ट रोजी सारखीच परिस्थिती निर्माण होऊन उमरखेड शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचून नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले. विशेषतः फुलारी ले-आऊट, कोकदवार ले-आऊट, रहीम नगर, फातेमा कॉलनी, मुर्तजा नगर या भागांमध्ये घरामध्ये पाणी घुसून जीवनावश्यक वस्तू, घरेलू साहित्य, धान्य व इतर संपत्तीचे आज ही नुकसान झाले आहे. निसर्गाच्या कृपेने पाऊस लवकरच थांबल्याने मागील वेळ सारखे परिस्थिती निर्माण झाली नाही तसेच जास्त नुकसान झाले नाही. ही परिस्थिती गंभीरच आहे. या वर गांभिर्य पूर्वक विचार करून उपाय योजना करणे अति आवश्यक झाले आहे.

आज २९ ऑगस्ट च्या पावसामुळे पूर्वी पेक्षा थोड्या कमी प्रमाणे भुमापन क्र. 63, 64, 65, 65/1, 66 या सर्वे नंबरवरील मंजूर ले-आऊट मध्ये नाल्याचे पाणी 2 ते 3 फूटपर्यंत जमा झाले होते. शहराच्या पूर्व भागातील ढाणकी रोडवरील लेंडी नाला (जामा मस्जिद ते फुलारी ले-आऊट, लिंगायत मोक्षधाम ते निलपवार ले-आऊट, नांदेड रोडवरील सवेरा कॉलनी, रहीम नगर ते कॅनलपर्यंतचा पट्टा) हा नाला अत्यंत अरुंद, उथळ असून दुतर्फा तटरक्षक भिंतींचा अभाव आहे.

परिणामी नाल्यातील शेजारील वस्तीतील घरांमध्ये पाणी घुसते. आज पुन्हा मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देवून तातडीने तांत्रिक अधिकाऱ्यांच्या माध्यमातून स्थळ सर्वेक्षण करून खोलीकरण व रुंदी करून ही कामे प्राधान्याने हाती घेवून त्वरित करावी, जेणेकरून पुढे पाऊस झाल्यास तिसऱ्या वेळेस नागरिकांचे आर्थिक नुकसान व जीवितास धोका टाळता येईल. तळ रक्षक भिंतीचे काम शासकीय प्रक्रिये नुसार सुरू करावी अथवा मागणीचे निवेदन देवून आंदोलनाचा इशारा देण्यात आला. निवेदन देतांना हाफीज अन्सार हुसैनी (तालुका अध्यक्ष), मोहसीन राज (शहराध्यक्ष), इरफान खान, सैय्यद रजा, ताहेर शेख, डॉ. फारूक अकबर, गजानन भालेराव, तसलीम अहेमद, सय्यद रजा, ताहेर शेख आदि नागरिक उपस्थित होते.

# कोषटवार, दौलतखान विद्यालयात संस्थापक स्मृतीदिना व गुणवंतांचा गुणगौरव

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - पुसदची मातृसंस्था शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित कोषटवार दौलतखान विद्यालय आणि गोधाजीराव मुखरे कनिष्ठ महाविद्यालयात संस्थापक स्मृतिदिनी संस्थेचे उभारणीत मोलाचे योगदान असणाऱ्या दिवंगत संस्थापकांना आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष राजेश कोटलवार होते. तर प्रमुख अतिथी माजी आमदार ॲड.निलयभाऊ नाईक होते.

शाळा समिती सभापती डॉ.आनंद मुखरे, मुख्याध्यापक गजानन वाघकुळे यांची मुख्य उपस्थिती होती. यावेळी ॲड.निलयभाऊ नाईक यांनी संस्थापकांचे कार्य विशद करतांना पुसद परिसरातील शैक्षणिक क्षेत्रातील शाळेचे महत्व अधोरेखित केले. सोबतच विद्यार्थ्यांना उच्च ध्येय प्राप्तीसाठी बहुमोल मार्गदर्शन केले. आज ३० ऑगस्ट स्व. देशभक्त शंकररावजी सरनाईक यांचा स्मृतिदिन. त्यांच्या स्मृती दिनानिमित्त दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयात करण्यात येते. यावेळी दिवंगत संस्थापक पै. दौलतखान पटेल, स्व. कोंडू गोपाल कोषटवार, देशभक्त शंकररावजी सरनाईक, डॉ द. श.उर्फ भाऊसाहेब सरनाईक आणि विदर्भवीर गोधाजीराव उर्फ बाबासाहेब मुखरे यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत ठेंगे यांनी केले. यावेळी दहावी, बारावी तसेच शालेय स्तरावरील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. दरवर्षी दहावीतील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना स्व. सुधाकरराव नाईक गौरव पुरस्कार देण्यात येतो. यावेळी गुणवंत विद्यार्थी, पालक, माजी मुख्याध्यापक सुरेश धनवे, संस्थेचे संचालक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने रील स्पर्धेचे आयोजन

जनमाध्यम प्रतिनिधी


यवतमाळ - यावर्षी गणेशोत्सवाला रील स्पर्धेच्या माध्यमातून देश-विदेशात नवे आयाम मिळणार आहेत. यंदा प्रथमच महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्यावतीने रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागासाठी २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन नाव नोंदणी आणि रील अपलोड करायचे आहेत.

महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होणारी ही स्पर्धा राज्यातील महसूल विभागस्तर, राज्यस्तर आणि महाराष्ट्राबाहेर व भारताबाहेरील खुला गट अशा तीन गटात होईल. रीलसाठी पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर या थीम मध्यवर्ती ठेवून ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील बनविणे अपेक्षित आहे. महसूल विभागीय स्तरावरील विजेत्या स्पर्धकाला प्रथम पारितोषिक म्हणून २५ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक रुपये १५ हजार, तृतीय पारितोषिक १० हजार, उत्तेजनार्थ विजेत्यास ५ हजार अशा स्वरुपात पारितोषिक दिले जाईल. या स्पर्धेतील राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास १ लाख रुपये, द्वितीय पारितोषिक म्हणून ७५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक म्हणून ५० हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून २५ हजार रुपये देण्यात येईल. तर महाराष्ट्र व भारताबाहेरील विजेत्या गटातील स्पर्धकाला प्रथम क्रमांकाचे १ लाख रुपये बक्षीस, द्वितीय क्रमांकासाठी ७५ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपये, उत्तेजनार्थ म्हणून २५ हजार रुपये देण्यात येतील. स्पर्धेची नोंदणीकरिता गुगल फॉर्म तयार करण्यात आला असून filmcitymumbai.org या संकेतस्थळावर तसेच महामंडळाच्या सोशल मीडिया हँडल्सवर उपलब्ध आहे, असे दादासाहेब फाळके चित्रनगरीकडून कळविण्यात आले आहे.

# दिग्रस विभागीय तेली समाज संस्थेची कार्यकारिणी जाहीर, अध्यक्षपदी संजीव चोपडे

जनमाध्यम प्रतिनिधी

दिग्रस - गेल्या 50 वर्षापासुन तेली समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असलेल्या दिग्रस विभागीय तेली समाज संस्था (नोंदणी क्रमांक १.न.महा २८७५/यवतमाळ एफ २८६२) च्या अध्यक्ष स्थानी येथील सेवाभावी कार्याची जाण असलेले संजीव चोपडे यांची सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी सर्वानुमते एकमताने अध्यक्षपदी निवड करण्यात आली.



श्री गणेशोत्सवाचा शुभ संयोग साधून माजी अध्यक्ष श्याम महिंद्रे पाटील, उपाध्यक्ष बंडू अण्णा मात्रे व सचिव शंकर भगत यांच्या पुढाकाराने मोठ्या प्रमाणावर हजर असलेल्या समाज बांधवांच्या उपस्थितीत शुक्रवार, २९ ऑगस्टला नवीन कार्यकारिणीची सर्वानुमते अधिकृत निवड करण्यात आली.

सन १९७५ पासूनच कार्यरत असलेली ही संस्था १९९३ ला नोंदणी करण्यात आली नोंदणी पासून आज पर्यंत ३१ वर्ष माजी नगराध्यक्ष श्याम शंकरराव महिंद्रे (पाटील) अध्यक्ष होते. आधी पासूनच नियमित समाजाचे परिचय व विवाह मेळावे, गुणवंत विद्यार्थ्यांचा व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाज बांधवांचा सत्कार तसेच विविध समाजोपयोगी कार्यक्रम करण्यावर संस्थेने सातत्याने पुढाकार घेतला आहे.

या प्रतिष्ठित संस्थेची धुरा आता संजीव चोपडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. शिक्षण, आरोग्य, राष्ट्रप्रेम, कृषी, पर्यावरण, क्रीडा, कला-संस्कृती अशा विविध सामाजिक क्षेत्रांमध्ये काम करणारे संजीव रामरावजी चोपडे हे तेली समाज संस्थेच्या कार्यकारिणीत सन १९९३ पासूनच सदस्य आहेत, त्यामुळे त्यांच्या प्रती समाजाच्या मोठ्या अपेक्षा आहे.

या नविन कार्यकारिणीत शिवदास ढोंगळे व साहेबराव हटवार हे उपाध्यक्ष, सचिव निलेश तायडे, सहसचिव अनिल वऱ्हाडे, कोषाध्यक्ष गणेश दुर्गे, प्रसिद्धी प्रमुख किशोर मेहेत्रे तर सदस्य म्हणून भारत महिंद्रे, अंकुश मात्रे, शैलेश लाचुरे, विलास क्षीरसागर, गजानन सोनोने, गजानन माहुरे, आशिष काळे, किशोर सदावर्ते, शक्ती ढवले व सचिन सोनटक्के यांची निवड करण्यात आली.

## वेचक

### मेरा युवा भारत कार्यालयाद्वारे प्रमुख योजनावर कार्यशाळा

यवतमाळ - युवा कार्यक्रम विभाग, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकारच्या मेरा युवा भारत कार्यालयाच्यावतीने जिल्ह्यातील ग्रामीण भागातील 15 ते 29 वयोगटातील 50 युवक युवतींकरीता शासनाच्या प्रमुख योजनावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेमध्ये डिजीटल इंडिया या विषयावर जिला सुचना व विज्ञान केंद्रातील अक्षय चावरे तसेच डॉ. सुरेंद्र इरफानकर तसेच डॉ. विशाल ताथी यांनी आयुष्मान भारत, जिल्हा परिषद स्वच्छ भारत मिशनचे प्रफुल शहाडे यांनी स्वच्छ भारत मिशन, स्वप्निल देशमुख यांनी यांनी जल जीवन मिशन, अमित रामकृष्ण ढोणे यांनी स्किल इंडिआ, प्राची ढोणे- फोकमारे यांनी स्टॅण्डअप इंडिआ या योजनाबाबत उपस्थित युवकांना माहिती दिली. वास्तविक जीवनामध्ये स्वतःचा तसेच कुटुंब व इतर नातेवाईक, आप्त मित्रांना या योजनांचा कशा प्रकारे फायदा घेता येईल याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



### महागाव तालुक्यातील विद्यार्थ्यांचा वैद्यकीय शिक्षणाकडे वाढता कल

महागाव - मुडाणा येथील शंतनु वानखेडे या विद्यार्थ्याची एमबीबीएस करीता निवड झाल्याने तो गावातील पहिला विद्यार्थी ठरला आहे. महागाव तालुक्यातील मुडाणा येथील रास्तभाव धान्य दुकानदार बबनराव वानखेडे यांचा नातु शंतनु गजानन वानखेडे यांचा शासकीय आरक्षित जागेमध्ये नगर येथील विखे पाटील मेडिकल कॉलेज यठिकाणी एमबीबीएस वैद्यकीय शिक्षणाकरिता नंबर लागला असुन तो या वैद्यकीय क्षेत्रातील अशा प्रकारचे शिक्षण घेणारा गावातील पहिला विद्यार्थी ठरला आहे. त्याच्या या यशाबद्दल विदर्भ जनआंदोलन समितीचे अध्यक्ष जगदीश नरवाडे, सपोनि सुनील अंभुरे, विजय सुर्यवंशी, वसिम पठाण यांनी शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देवुन त्याचा सत्कार केला या वेळी नरवाडे व वानखेडे परिवारातील सदस्य गंगाबाई बबनराव वानखेडे सौ भाग्यश्री गजानन वानखेडे रिंकू ताई नरवाडे सौ रसिका जगदीश नरवाडे, वैशाली कदम उपस्थित होत्या.

> मुडाणा गावातून एमबीबीएस करणारा शंतनू वानखेडे पहिला विद्यार्थी

### थकीत कर्जदारांसाठी एकरकमी परतावा

यवतमाळ - महाराष्ट्र राज्य वित्त आणि विकास महामंडळाच्या थकीत कर्जदारांसाठी एकरकमी परतावा केल्यास लाभार्थ्यांना थकीत व्याज रकमेत ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. ओटीए, योजना दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत राबविण्यात येत आहे. जास्तीत जास्त थकीत कर्जदारांनी या योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक सुशांत बेझलवार यांनी केले आहे.

# पुसदमधील सहा जणांवर 'एमपीडीए'अंतर्गत पोलिसांची कारवाई

## सुमित पवार तरुणाच्या खुनात होता सहभाग

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - ९ मे २०२५ रोजी रात्री ८:३० वाजता दरम्यान नवलबाबा वार्ड जवळ विद्याधन बुक डेपो समोर उसनवार घेतलेल्या एक हजार रुपयाच्या वादातून दोन गटात सहा सदस्यीय टोळक्याने एका तरुणाचा निघृण खून केला होता. ते सहाही जण गुन्हेगारी प्रवृत्तीचे आणि सराईत गुन्हेगार असल्याने त्यांच्याविरुद्ध एमपीडीएचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. नुकताच त्या प्रस्तावावर संबंधित सहा जणांना एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध करण्याचे आदेश देण्यात आले होते. पुसद पोलिसांच्या प्रस्तावावरून सदर कारवाई करण्यात आली.

शिवाजी वॉर्डात राहणाऱ्या सचिन माधव हराळ (३६), देव दिलीप श्रीरामे (१९), दर्शन दिलीप श्रीरामे (१८), प्रेम दिलीप हाके (१९) व नाईक चौकात राहणाऱ्या चारुतोष राठोड यांच्यासह नवल बाबा वॉर्डात राहणाऱ्या जीत नटवरलाल उंटवाल (१९) यांच्या विरोधात टोळी प्रमुख व म्होरक्या गुन्हे अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. गुन्ह्यातील चारुतोष राठोड व जीत उंटवाल हे दोघेजण तीन महिन्यापासून फरार आहे. तर चाकू हल्ल्यामध्ये सुमित सुरेश पवार (२७) हा ठार झाला होता. तर नितीन तुंडलायत, नयन उर्फ मोनू राहूल तुंडलायत व शुभम पवार हे तिघे जण गंभीर जखमी झाले होते. चाकूहल्ला केल्याप्रकरणी आरोपींविरुद्ध विरोधात मृतकचा मोठा भाऊ शुभम सुरेश पवार (३१) याने शहर पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली असता १० मे रोजी रात्री २.५४ वाजता विविध कलमान्वये गुन्हे दाखल झाले होते. पैशाच्या देवाण-घेवाणाच्या कारणावरून वाद निर्माण झाला होता. त्यानंतर वर्चस्व दाखविण्यासाठी व वचपा काढण्यासाठी चाकूहल्ला चढविला होता. आरोपी सचिन हराळ, देव श्रीरामे, दर्शन श्रीरामे, प्रेम हाके, चारुतोष राठोड व जीत उंटवालने संगनमत करून गुन्हामध्ये सहभाग असल्याचे उघडकीस आले आहे. सदर गुन्ह्यामधील जखमी नितीन तुंडलायत हा सहा आरोपींच्या संघटित टोळीला विरोध करीत असल्याने आरोपींच्या टोळीची पुसद परिसरामध्ये दहशत निर्माण करण्याच्या हेतूने वर्दळीच्या ठिकाणी चाकू घेऊन एकाला ठार मारले होते. तर तिघांना गंभीर जखमी केले होते. त्या हल्ल्याप्रकरणी संघटित टोळी विघातक असल्याने भारतीय न्याय संहितेचे कलम १११ लावण्याबाबत तपास करण्यात आला होता त्यामुळे त्यांना एसटीडीए अंतर्गत पुसद पोलीसांकडून कारवाई करण्यात आली आहे.

# बेचखेड्यात विधवा वृद्धेचे घर जमीनदोस्त

## ग्रामपंचायतीची माणुसकी हरवली!

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - बेचखेडा (ता. यवतमाळ) जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने बेचखेडा गावातील एका निराधार विधवा वृद्ध आईचे आयुष्य उद्ध्वस्त केले. पर्वताबाई उईके यांचे कुडामातीचे घर अतिवृष्टीमुळे कोसळून जमीनदोस्त झाले असून, त्यांना उघड्यावर दिवस काढण्याची वेळ आली होती. आधार देणारे कोणी नसल्याने वृद्ध मातोश्रींच्या डोळ्यातले अश्रू आणि ढिगाऱ्यात रुपांतर झालेलं घर पाहून ग्रामस्थांच्या डोळ्यात पाणी आले.


ही माहिती सामाजिक कार्यकर्ते व संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष सूरज खोब्रागडे यांना कळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तहसीलदार योगेश देशमुख यांच्याशी संपर्क साधून पंचनामा करण्याची मागणी केली. त्यानंतर शासकीय पंचनामा करून तात्पुरत्या स्वरूपात टिनपत्राचे घर बांधून देण्यात आले.

मात्र, ग्रामपंचायत व स्थानिक प्रशासनाने तातडीची मदत करण्याऐवजी मौन धारण केल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या घटनेतून ग्रामपंचायतची संवेदनहीनता अधोरेखित झाली आहे. विशेष म्हणजे गावची सरपंच पंचफुलाबाई लिहितकार तसेच इतर सदस्य महिला असून ग्रामसेवकही महिला आहेत. तरीही एका निराधार विधवा वृद्धेच्या संकटसमयी माणुसकीचा हात पुढे न करण्याने ग्रामपंचायतीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सूरज खोब्रागडे यांनी संताप व्यक्त करताना स्पष्ट शब्दांत म्हटले की "राजकारण हे केवळ पदासाठी नसून जबाबदारीसाठी असते. दुर्बल व निराधारांना आधार होणे हीच खरी नेतृत्वाची कसोटी आहे. जर अशा आईच्या डोळ्यातले अश्रू पाहूनही संवेदनशीलता जागी होत नसेल, तर अशा नेतृत्वाचा उपयोग काय?"

> तहसिलदार यांनी घेतली वेळेत दखल

यामुळे बेचखेडा गावात एका विधवा वृद्ध आईचे घर उद्ध्वस्त होणे ही केवळ निसर्गाची आपत्ती राहिली नाही, तर ग्रामपंचायतीसह माणुसकीच्या दिवाळखोरीचे प्रतिक ठरले आहे.अशी प्रतिक्रिया ग्रामस्थानी यावेळी व्यक्त केली.

# माणुसकीची भिंत पुसद येथे अध्यात्म गुरुकुल गुरुकुंज मोझरी जि. अमरावती प्रचारक यांची सदिच्छा भेट




जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - २९ ऑगस्ट माणुसकीच्या भिंतीचे मागील दहा वर्षापासून सुरु असलेल्या मानवीय कार्याची दखल घेत अध्यात्म गुरुकुल गुरुकुंज मोझरी जी.अमरावती येथील राष्ट्रसंताचे कार्याचे प्रचारक ज्ञानेश्वरदादा रक्षक, जीवन प्रचारक नामदेवराव गव्हाळे महाराज, संचालक रवी दादा मानव व सत्यपाल महाराजांचे शिष्य व माणुसकीची भिंत मार्गदर्शक पंकजपाल महाराज यांनी माणुसकीची भिंत उपजिल्हा रुग्णालय येथे सदिच्छा भेट दिली गाडगे बाबाच्या प्रतिमेचे पूजन करून पुसद परिसरातील व उपजिल्हा रुग्णालयातील भरती असलेले रुग्ण त्यांचे नातेवाईक यांना भाजी पोळी भात जिलेबी चे अन्नदान करण्यात आले माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन च्या माध्यमातून मागील दहा वर्षापासून सुरु असलेल्या कार्याची त्यांनी माहिती घेतली व कार्याचे कौतुक केले. यावेळेस उपस्थित मान्यवरांचे सन्मानचिन्ह, वृक्षरोपटे, व शाल देऊन मान्यवरांचे सत्कार माणुसकीचे भिंत सदस्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळेस उपस्थित मान्यवर माणुसकीची भिंत मार्गदर्शक पंकज पाल महाराज, ज्ञानेश्वर दादा रक्षक, नामदेवराव गव्हाळे महाराज, रवीदादा मानव तसेच माणुसकीच्या भिंतीचे गजानन जाधव, मधुकर पवार, अनंता चतुर, पंजाबराव ढेकळे, अरुण नागुलकर, अविनाश शेटे, नितीन बरडे, धनंजय आढाव, दीपक धाडगे उपस्थित होते.

# रस्त्यावर सापडलेले ६० हजार रु परत करुन शिक्षिकेने दिली प्रामाणिकतेची ओळख

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चोंढी येथील सहाय्यक शिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या सुवर्णाताई चौधरी (मोरे) रा स्वप्न पूर्ती नगर पुसद यांना सापडलेले 60 हजार रु त्यांनी ते मुळ मालकाला परत करून प्रामाणिक तेचा परिचय करून दिला दोन दिवसापूर्वी सुवर्णा ताई मॅडम सकाळी 10 वाजताच्या सुमारास घरून शाळेत निघाल्या व घरापासून काही अंतरावर जात असताना रस्त्यावर रबर मध्ये गुंडाळून असलेल्या 100 व 500 च्या नोटांचे रोख रक्कम 60 हजार रु चे बंडल त्यांना सापडलं मॅडम ने लगेच आजूबाजूला बघितले असता त्यांना कोणी ही काही आढळून आले नाही म्हणून मॅडम ने पैसे घेऊन शाळेत गेल्या व सायंकाळी घरी परतल्यावर पती अजय मोरे सर यांना सर्व वृत्तांत सांगितलं व पती अजय मोरे सर यांनी माहिती काढली असता रोहित जयस्वाल यांचे पैसे हरवले आहे असे समजले व ते पैसे रोहित जयस्वाल यांचे आहेत त्या नंतर मोरे सर यांनी सर्व शहानिश्या करून ते पैसे रोहित जयस्वाल ( व्यापारी )यांना परत केले. विद्यादानाचे कार्य करतांना विद्यार्थ्यांना प्रमाणिकपनाचा धडा न शिकविता तो आचरणात आणणाऱ्या सुवर्णाताई चौधरी यांचा जि प शाळा चोंढी येथे सर्व शिक्षक कर्मचारी वृंदा तर्फे पुस्प गुच्छ देऊन सुवर्णा ताई यांचा सत्कार करण्यात आला व सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा देणे विभागाची जबाबदारी : पालकमंत्री

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - सर्वसामान्य नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा देणे आरोग्य विभागाची जबाबदारी आहे. आरोग्य संस्था केवळ उपचारासाठी नसून प्रतिबंधात्मक उपाययोजना, विविध आरोग्यविषयक उपक्रम, वेळेवर निदानासाठीही महत्वाच्या आहेत. पुढील काळात जिल्ह्यात आरोग्य सुविधा, उपक्रमांना गती दिल्या जाईल, असे पालकमंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

उपजिल्हा रुग्णालय, दारव्हा येथे त्यांनी विविध आरोग्य विषयक बाबींचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुखदेव राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी सुभाष ढोले, उपविभागीय अधिकारी विजय सुर्यवंशी, तहसीलदार रवी काळे, मुख्याधिकारी विठ्ठल केदारे, अकोला येथील आरोग्य विभागाचे सहायक उपसंचालक डॉ.सुशीलकुमार वाघचोरे, दारव्हा उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकिय अधीक्षक डॉ.राजेश मनवर, निवासी आरोग्य अधिकारी रमेश मोहन, पोलिस निरीक्षक शिवप्रकाश मुळे, यशवंत पवार, मनोज सिंगी आदी उपस्थित होते. पालकमंत्री राठोड म्हणाले की, गोरगरीब व गरजूंना वेळेवर उपचार मिळणे गरजेचा आहे. उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी यांनी मुख्यालयात राहणे आवश्यक आहे.

रुग्णालयात मंजूर पदांचा देखील त्यांनी आढावा घेतला. उपजिल्हा रुग्णालयमधील स्वच्छता, रुग्णालयमधील आहार सुविधा, नियुक्त कंत्राटदारांकडून रुग्णालयात रोज दोन्ही वेळा रुग्णांना चहा, नास्ता, जेवण व फळ फ्रूट वितरण, त्याची गुणवत्ता, दैनंदिन वापराच्या कापडांची धुलाई करून रुग्णांना देण्यात येते किंवा नाही याबाबत त्यांनी आढावा घेतला. रुग्णालयामधील सुरक्षा, स्वच्छता, शवविच्छेदनगृह, बायोमेडिकल वेस्ट, औषध वितरण, रुग्णवाहिका, रक्तसाठा आदींची माहिती जाणून घेतली. रुग्णालय साफ आणि निटनेटके असले पाहिजे. रुग्णांना रुग्णालयात चांगल्या सुविधा, उपचार आणि औषधे मिळाली पाहिजे, अशा सूचना त्यांनी केल्या. यावेळी आरोग्य यंत्रणेचे अधिकारी व कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

## जाहिर नामा

मी नामे :- तारीक खान इस्माईल खान वय ३६ वर्षे धंदा-शेती
रा.पो.फुलसावंगी ता.महागांव जि.यवतमाळ
मी मौजा फुलसावंगी येथील
नामे:- १.रोहित प्रभाकर बोकीनपल्लीवार वय ५० वर्षे धंदा- व्यापार
रा.लक्ष्मीनगर दिग्रस पो.ता.दिग्रस जि.यवतमाळ
२. संतोष नारायणराव निकम वय ५० वर्षे धंदा- व्यापार
रा.कॉलेजनगर दिग्रस पो.ता.दिग्रस जि.यवतमाळ

मौजा फुलसावंगी प्र.व ता.महागांव जि.यवतमाळ येथील ग्रा.पं.फुलसावंगी चे येथील गट क्र.६९/३ मधील ग्रामन १३/एन.ए.पी.२४/२१२-२०१४ मौजा फुलसावंगी मौजा फुलसावंगी वि.उपविभागीय अधिकारी साहेब उमरखेड यांचे दि.११/१०/२०१३ चे आदेशानुसार प्लॉट क्र.३०/अ ची ७/१२ नुसार क्षेत्रफळ १.१२.०० ची.मी.खुली जागा वर्ग.
पंचिकडून हा मी नोंदी घ्यावयाचे नोंदी केला आहे.
तरी त्याबाबत काहीही आक्षेप असल्यास ७ दिवसाच्या आत ग्रामपंचायत कार्यालय फुलसावंगी येथे सादर करावे.

## वर्ष २०२५-२०२६ च्या जिल्हा नियोजन आराखड्यामध्ये

# अमरावती महापालिकेसाठी १०० कोटीचा नियतव्ये वाढविण्यात यावा



### आ. सुलभा खोडके यांची पालकमंत्र्यांकडे मागणी

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्हा नियोजन समिती सन २०२५-२६ अंतर्गत वार्षिक नियोजन सर्वसाधारण सभा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय स्थित नियोजन भवन सभागृहात पार पडली. या बैठकीला उपस्थित जिल्हा नियोजन समिती नामनिर्देशित सदस्य तथा अमरावतीच्या आ.सुलभा खोडके यांनी अमरावती महापालिका क्षेत्रात विकासकामांच्या नियोजन संदर्भात डीपीसीमधून मिळवला निधीचा नियतव्ये हा १०० कोटींचा करण्यात यावा, अशी मागणी केलीं. त्याचबरोबर जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन ) परिसरात रुग्णांच्या नातेवाइकांकरिता प्रतिक्षालय बांधकामासाठी अंदाजे ४९५.९५ लक्ष निधीची आवश्यकता असल्याने यासाठी जिल्हा नियोजनात तरतूद करण्याबाबत समितीने निर्णय घेण्याबाबतचा मुद्दा उपस्थित करून पालकमंत्र्यांचे याकडे लक्ष वेधले. जिल्हा वार्षिक नियोजन आराखडा वर्ष २०२५-२६ वर समितीच्या बैठकीत चर्चा होत असतांना आ.खोडके यांनी मागील सभेत मांडलेले मुद्दे इतिवृत्तात समाविष्ट न करण्यात आल्याने नाराजी व्यक्त केली. बैठकीतून अनेक विकासात्मक बाबींसाठी निधीच्या नियोजनाबाबत खल देतांना आ. खोडके यांनी सांगितले की, जिल्हा नियोजन अंतर्गत महापालिकेला आधी १२ कोटी निधी मिळत होता. मागील तीन वर्षात डीपीसीच्या बैठकीत तत्कालीन वित्तमंत्री महोदयांच्याकडे वारंवार मागणी करून मागील तीन वर्षात जिल्हा नियोजनात ३५ कोटी व वर्ष २०२५-२६ च्या नियोजनात अमरावती महापालिके साठी ६२ कोटींची नियतव्ये वाढवून तशी तरतूद करण्यात आली आहे. परंतु अमरावती शहराची लोकसंख्या जवळपास १० लाखांवर गेली आहे. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता विकासकामांचे नियोजन करतांना निधी अपुरा असल्याने मूलभूत सुविधांकरिता निधीची मोठी अडचण जात आहे. म्हणून जिल्हा नियोजनातून महापालिकेसाठी १०० कोटींचा निधीचा आराखडा मंजूर करण्यात यावा.अशी मागणी आ.खोडके यांनी समितीच्या बैठकीत पालकमंत्र्यांसमक्ष मांडली.

त्याचबरोबर विभागीय क्रीडा संकुलाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा वार्षिक नियोजन मध्ये नवीन लेखाशीर्ष (हेड ) निर्माण करून ५ कोटी रुपयांची तरतूद करण्याची मागणी बैठकीतून करण्यात आली.

अमरावती मधील जिल्हा क्रिडा संकुल व विभागीय क्रिडा संकुल येथे क्रीडा सेवा सुविधांसाठी शासनाच्या वतीने निधी मिळते, परंतु देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होत नाही. या मुद्याकडे सुद्धा आमदार महोदयांनी समितीचे लक्ष वेधले. तसेच सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या किरकोळ दुरुस्ती व मेंटेनन्ससाठी सुद्धा निधी वितरित करण्यासाठी डीपीसीतून तरतूद करण्यात यावी, अमरावती मधील शासकीय शैक्षणिक संस्था या ५० ते ६० वर्ष जुन्या असल्याने त्या जीर्ण होत आहे. म्हणून शासकीय तंत्रनिकेतन व शासकीय अभियांत्रिकी महाविद्याल याच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांकारिता जिल्हा नियोजनातून भरीव निधी उपलब्ध व्हावा म्हणून दोन्ही शासकीय शैक्षणिक संस्थांच्या मेंटेनन्सच्या कामाकारिता सुद्धा नवीन हेड निर्माण करून स्वतंत्र निधीची तरतूद करणे आवश्यक असल्याचे आमदार महोदयांनी बैठकीतून सांगितले. अमरावती महापालिकेच्या सर्व शाळेत डिजिटल कक्ष व संगणक कक्ष निर्माण करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी, तसेच महापालिका क्षेत्रात अंगणवाडी बांधकामासाठी सुद्धा जिल्हा नियोजनातून निधी देण्याची मागणी आ.खोडके यांनी केली.

बैठकीला पालकमंत्री बावनकुळे यांच्यासह जिल्हाधिकारी -आशिष येरेकर, महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आ. संजय खोडके, मनपा आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा चांडक, जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे आदींसह सर्व लोकप्रतिनिधी, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तसेच शासकीय विभागांचे विभाप्रमुख आदी उपस्थित होते.

### मुंधडा महाविद्यालयाचा विद्यार्थी राज्यस्तरावर

**चांदूर रेल्वे** -नुकतेच अमरावती येथे झालेल्या विभागीयस्तर क्रीडा स्पर्धेत स्थानिक स्व. मदनगोपाल मुंधडा महाविद्यालयाचा बी.कॉम. तृतीय वर्षाचा विद्यार्थी पुष्पक वरघट हा ८०० मीटर व ५००० मीटर रनिंग स्पर्धेत विजयी होऊन त्याची निवड राज्यस्तरावर झाली आहे. अमरावती ॲथलेटिक असोसिएशनच्या अंतर्गत डॉ. अतुल पाटील यांच्या नेतृत्वात त्याची ही निवड झाली आहे. पुष्पक वरघट याने अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही नावलौकिक केले आहे.

पुष्पकच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत कारमोरे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. संजय गवई, क्रीडा आणि शारीरिक शिक्षा विभाग प्रमुख डॉ. अलका करनवाल व इतर प्राध्यापक, कर्मचारी वृंदांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

तसेच पुढील स्पर्धेकरिता त्याला शुभेच्छा दिल्या.

## न.पा. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या जीवाशी खेळ

### सुरक्षा उपकरणांशिवाय करावी लागतात कामे



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

स्थानिक नगरपालिका स्वच्छता विभाग आणि कंत्राटदार हे गरीब स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्याशी खेळताना दिसून येत आहे. त्यांना वेळोवेळी मास्क, हातमोजे आणि बूट दिले पाहिजेत जेणेकरून ते गंभीर आजारांपासून वाचू शकतील. परंतु चांदूर रेल्वे महानगरपालिका स्वच्छता विभाग आणि कंत्राटदार घंटागाडी, कचरा उचलणारे, ट्रॅक्टर ट्रॉली आणि नाले साफसफाईच्या कामासाठी नियुक्त केलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा देत नाहीत जेणेकरून भविष्यात स्वच्छता कर्मचाऱ्यांचे आरोग्य बिघडू नये.

शहरातील विविध ठिकाणी घंटागाडी, नाले साफसफाईचे काम आणि नाले साफसफाईतून बाहेर पडणारा कचरा उचलणारे ट्रॅक्टर ट्रॉली यासाठी चांदूर रेल्वे महापालिका प्रशासनाने नियुक्त केलेले स्वच्छता कर्मचारी स्वच्छता विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजापणामुळे सुरक्षा उपकरणांशिवाय शहरातील कचरा साफ करत आहेत. स्वच्छता विभाग आणि कंत्राटदाराकडून पुरेशी सुरक्षा उपकरणे उपलब्ध नसल्याने वेळोवेळी स्वच्छता कर्मचाऱ्यांमध्ये गंभीर आजार होण्याची भीती कायम आहे. मग उपासमारीसाठी हे कामगार शहरातील कचरा डोक्यावर वाहून नेताना दिसतात. जेणेकरून शहर वासीयांना स्वच्छता आणि आरोग्य सेवा मिळतील. ज्याच्या बदल्यात कंत्राटदाराकडून त्यांना फक्त ३३० रुपये मंजूर केले जातात. त्यांच्या आरोग्याचा विचार करून कोणत्याही सुविधा दिल्या जात नाहीत.परंतु कार्यालयात बसलेल्या अधिकाऱ्यांना त्यांची काळजी घेण्यासाठीही वेळ नसतो.ज्यामुळे १५ ते २० स्वच्छता कर्मचारी नगर पालिका कंत्राटदाराकडे असले पाहिजेत, त्यापैकी ५ ते ७ कामगार कामावर दिसतात कारण वेळेवर वेतन मिळत नसल्याने स्वच्छता कर्मचारी कामावर येत नाहीत असे कळले आहे.

या विषयावर, नगर स्वच्छता विभागाचे आशिष कुराडे म्हणाले की, सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी कंत्राटदाराला सर्व माहिती देण्यात आली होती आणि त्यासोबतच जीविताच्या संरक्षणासाठी धोरण बनवण्याचे आणि भविष्य निर्वाह निधी म्हणून ईपीएफ भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. काही प्रमाणात समस्या असल्यास, त्या सोडवण्यासाठी पालिकेकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

शहर स्वच्छता मोहीम तीन तासांच्या ट्रेनवर अवलंबून

चांदूर रेल्वे नगरपालिकेत तीन तासांची ट्रेन सुरू झाली. ज्यामध्ये तासाभराच्या ट्रेन चालक मदतनीस म्हणून काम करताना दिसतात. ओला आणि सुका कचरा वेगळा करता यावा म्हणून चालकासोबत एक सहाय्यक असावा, परंतु पालिका प्रशासन आणि कंत्राटदाराच्या संगनमतामुळे ट्रॅक्टर ट्रॉली आणि ड्रेन साफसफाईसह गाडीवर फक्त चालक दिसतो. गाडीतील कर्मचाऱ्यांची संख्या कमी झाल्यामुळे शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसतात. सफाई कर्मचारी आणि शहर स्वच्छता अत्यंत महत्त्वाची आहे.

## गणोरी केंद्राच्या शिक्षण परिषदेत

# शिक्षण परिषद व शाळेतील विविध उपक्रमाची माहीती सादर

**अमरावती/का.प्र.**

शिक्षण विभागाच्या आदेशा नुसार विविध विषयाची माहिती देण्याकरीता केंद्रस्तरीय शिक्षण परिषद घेण्यात येते.यावेळी गणोरी केंद्राची शिक्षण परिषद जि.प. माध्यमिक आदर्श शाळा ब्राम्हणवाडा गोविंदपूर, पं.स. अमरावती येथे घेण्यात आली.



शिक्षण परिषदचे उद्घाटन गणोरी केंद्राच्या केंद्र प्रमुख निता सोमवंशी,केंद्र प्रमुख डाखोळे आणि शाळेचे मुख्याध्यापक रविद्र निंघोट यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करुन करण्यात आले.यावेळी गणोरी केंद्रातर्फे मुख्याध्यापक रविद्र निंघोट व केंद्र प्रमुख डाखोरे यांचा शाल व फुलगुच्छ देऊन करण्यात आला.शाळेतर्फे निता सोमवंशी यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रविद्र निंघोट यांनी शाळेची कायापालट व विविध शाळेतील उपक्रमाची माहीती दिली.सुसज्ज कार्यालय,प्रथोमोचार कक्ष,संगणक कक्ष,डीजीटल वर्ग खोल्या,सुंदर पळस बाग,पिंक रुम, वाचनालय, स्वच्छतागृह,शालेय पोषण आहार कक्ष तसेच सुंदर विविध वृक्षांनी सज्ज असणारा शालेय परीसर याची गणोरी केंद्रातील शिक्षकांनी पाहणी केली.असे विविध उपक्रम गणोरी केंद्रातील शाळेत राबवावीत या करीता या शाळेला भेट देऊन शिक्षण परीषदचे आयोजन केले होते अशी माहीती केंद्र प्रमुख निता सोमवंशी यांनी दिली.यावेळी मागील महिन्याचा आढावा तसेच एम्प्दर्तैप्ज सराव चाचणी प्रश्न पत्रिका विश्लेषण व पुढील नियोजन ५ मार्च शासन निर्णय नुसार निपुण महाराष्ट्र अध्ययन स्तर स्थिती. चर्चा व पुढील नियोजन,पायाभूत चाचणी संबंधी प्रश्न पत्रिका तपासणे गुणदान व तपासलेल्या प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना दाखविणे याबाबत आढावा व अध्ययन निष्पत्ती व प्रश्नप्रकार या संबंधी चर्चा.

मागील महिन्यात केलेल्या मासिक नियोजनावर चर्चा.शाळा यशोगाथा लेखन, यशोगाथांचे दस्तएवजीकरण व सादरीकरण. देवाण - घेवाण.मासिक नियोजनानुसार वर्गात झालेल्या वेगवेगळ्या उपक्रम व यशस्विता आणि अडचणी बाबत शिक्षकांचे सादरीकरण आणि चर्चा.स्थानिक इतर विषय (गरजेनुसार)तसेच

केंद्रस्तरीय स्थानिक इतर विषय (गरजेनुसार) विविध विषयावर केंद्र प्रमुख निता सोमवंशी यांनी केले.तसेच निपुन अंतर्गत पर्यवेक्षकीय यंत्रने मार्फत प्रत्येक शाळेच्या विद्यार्थांची ऑन लाईन चाचणी घेण्यात येणार आहे.संचालन अभिषेक खांडे यांनी तर आभार प्रदर्शन गजानन येलोने यांनी मानले.यावेळी ब्राम्हणवाडा गोविंदपूर शाळेचे हरीभाऊ जावळे,अंजली नाखले,संगिता डाफ,गायत्री वलिवकर या शिक्षकांचे सहकार्य लाभले असे प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय क्रीडा दिन' साजरा करण्यात आला. यानिमित्ताने मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात पार पडली.

खासदार डॉ. अनिल बोंडे आणि आमदार संजय खोडके यांच्या हस्ते क्रिडा दिनाचे उद्घाटन झाले. यावेळी शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. नितीन चव्हाळ आणि जिल्हा शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेचे अध्यक्ष अजय आळशी उपस्थित होते. डॉ. अनिल बोंडे आणि आमदार संजय खोडके यांनी मेजन ध्यानचंद यांच्या जीवनपैलू वर प्रकाश टाकला. तसेच 'फिट इंडिया' पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन केले.राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या तिनशेव्या जयंतीनिमित्त क्रीडा आणि खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी मॅरेथॉन स्पर्धा पार पडली. मॅरेथॉन स्पर्धेत पुरुषांमध्ये प्रथम उजेर खान, द्वितीय प्रतिक गेडाम आणि तृतीय गौरव इंगळे यांनी रोख बक्षीस पटकाविले. महिलांमध्ये प्रथम वैष्णवी वानखडे, द्वितीय पायल मगरदे आणि तृतीय गायत्री बेहरे क्रमांक पटकाविला. त्यांना रोख बक्षीस, पदके आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



यावेळी 'एक घंटा खेल के मैदान मे', 'खेलेगा छात्र तो खेलेगा राष्ट्र', आणि 'खेले भी खिले भी' असे नारे देण्यात आले. सहभागी खेळाडू, नागरिक आणि प्रशिक्षकांनी क्रीडा दिनानिमित्त शपथ घेतली. पोलीस विभागाने वाहतूक आणि पोलीस बंदोबस्त पुरवून सहकार्य केले. संदीप इंगोले आणि अतुल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. त्रिवेणी बाते यांनी आभार मानले.खेलो इंडिया सेंटरच्या वतीने धनुर्विद्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय क्रिडा दिनानिमित्त २९ ते ३१ ऑगस्ट दरम्यान विविध क्रिडा स्पर्धा घेण्यात येणार आहे. यात खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले. कार्यक्रमासाठी जिल्हा क्रिडा अधिकारी गणेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष विघ्ने, वैशाली इंगळे, स्वप्नील चांदेकर, राहुल निवडंगे, प्रफुल्ल डांगे, रितेश अनंतवार, धनंजय भारसाकडे, अकिल शेख, राजपाल इंगळे, अमोल लांडे यांनी पुढाकार

## डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन

**अमरावती/का.प्र.**

हॉकी प्लेयर मेजर ध्यानचंद यांच्या जयंती दिना निमित्त देशभर राष्ट्रीय क्रिडा दिन साजरा करण्यात येतो. त्याअनुषंगाने डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय क्रीडा विभाग व संत गजानन महाराज क्रीडा ॲकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त स्पोर्ट्स क्लब चे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख व भारतीय महिला क्रिकेट खेळाडू भारती फुलमाळी यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाचे क्रिकेट मैदानावर संपन्न झाले. क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने व्हॉलीबॉल व फुटबॉल क्रीडा प्रकाराचे आयोजन सुध्दा करण्यात आले आहे. डॉ.



अनिल देशमुख व भारती फुलमाळी यांनी खेळाडूंना व उपस्थित विद्यार्थ्यांना 'एक तास खेळाच्या मैदानावर' थीम प्रमाणे उद्बोधन केले तसेच खेळाडूंना शुभेच्छा दिल्यात.

क्रीडा स्पर्धेच्या सुरूवातीला अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी भारती फुलमाळी यांचा क्रीडा स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीबद्यल महाविद्यालयाच्या वतीने यथोचित सत्कार केला. महाविद्यालयाची जनरल सेक्रेटरी वैदेही काळे हिने उपस्थितांना शपथ दिली. यावेळी पीडीएमएमसी विरूध्द संत गजानन महाराज ॲकॅडमी असा टी-२० क्रिकेट सामना रंगला त्याची सुरूवात नानेफेक करून झाली. यावेळी वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. वसंत लुंगे, डॉ. अजय जावरकर, डॉ. प्रकाश कुटे, डॉ. विनोद वासनीक, डॉ. स्वप्नील मोहोड, डॉ.निलेश बारब्दे, डॉ. श्रीकांत फुटाणे, शिक्षेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वीयसहायक किशोर इंगळे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले तसेच कार्यक्रमाचे यशस्वीतेकरीता संजय वाटाणे व गावंडे, धर्माळे, वाबळे यांनी परिश्रम घेतले.

## अरूणोदय इंग्लिश स्कूलमध्ये 'वृक्षरूपी गणपती' संकल्पना

**अमरावती/का.प्र.**

व्ही.एम.व्ही. परिसरातील अरुणोदय इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेज ऑफ सायन्स येथे वृक्षगणपतीचे पूजन उत्साहात पार पडले. गणपतीचे पूजन अरूणोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. वसंत लुंगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला अरूणोदय शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. भारती लुंगे, प्राचार्या विशाखा नाफडे, उपप्राचार्या सीमा कुथे, अरुणोदय इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाजनकर, उपमुख्या ध्यापिका निता काळमेघ, कार्या लयीन अधीक्षिका रेखा राऊत उपस्थित होते. वर्ग १० वीच्या विद्यार्थ्यांनी गणपतीच्या विविध अंगाचे व प्रतिकांचे महत्व सांगितले. समाजाला पर्यावरणाचे महत्व या संकल्पनेतून पटवून देण्याचा प्रयत्न करून झाडे लावा व झाडे जगवा जेणे करून वसुंधरेचे आपण जतन करू असे उद्गार याप्रसंगी डॉ. वसंत लुंगे यांनी काढले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंगला देशमुख, उषा नाईक, ज्योत्स्ना इंगोले, हर्षा दाऊतपुरे, शालिनी जवादे, रोकडे, शिल्पा शेरेकर, वैष्णवी ठाकरे,आरती मटाले, झाडे, गावंडे, राधा तायडे, प्रतिक्षा खाडे, अरूणा देवघरे, वाटाणे, वैशाली शेळके, रोहिणी कोल्हे,जयश्री बाकडे, वृषाली जाधव, सिद्धी कोरडे, प्रेरणा मते, अश्विनी नेमाडे, पपीहा शिंदे, कौस्तुभ गावंडे, शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, तसेच शाळेचे विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती-**शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश ३० ऑगस्ट ते १३ सप्टेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी कळविले आहे.

### मंगळवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**अमरावती-** जिल्हास्तरीय लोकशाही दिन दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. परंतु १ सप्टेंबर रोजी ज्येष्ठागौरी पूजन निमित्त सार्वजनिक सुटी असल्यामुळे सप्टेंबर महिन्याचा लोकशाही दिन, मंगळवार २ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिक्षक निलेश खटके यांनी केले आहे.

### स्वाधार योजनेसाठी इच्छुकांनी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती-**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता अकरावी व बारावी तसेच इयत्ता बारावी नंतरच्या व्यवसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेता येईल. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नसल्यास विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधांसाठी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट लाभ जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते.अधिक माहितीसाठी सामाजिक न्याय भवन, सहायक आयुक्त, समाज कल्याण, अमरावती चांदुर रेल्वे रोड, सी. पी. ऑफीसच्या मागे अमरावती तसेच speldswo_amtrediffmail.com व दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६१२६१ यावर संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त आर. व्ही. जाधवर यांनी केले आहे.

# आझाद हिंद मंडळाच्या गणेशोत्सवात आध्यात्मिकतेचा संगम

## साईबाबा देखावा ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

### आयुक्त सौम्या शर्मा चांडक व सीईओ संजिता महापात्रा यांच्या हस्ते उद्घाटन

**अमरावती/का.प्र.**

बुधवारा, अमरावती येथील आझाद हिंद मंडळाच्या ९८व्या सार्वजनिक गणेशोत्सवात साकारण्यात आलेल्या शिर्डी साईबाबा मंदिराच्या देखाव्याचे भव्य उद्घाटन अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

उद्घाटनानंतर मान्यवरांनी श्री गणेशाचे दर्शन घेतले आणि साईबाबांच्या देखाव्याचे विशेष कौतुक केले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांनी आपल्या भाषणात मंडळाच्या उपक्रमांचे मनापासून कौतुक करत म्हणाल्या, इतिहास जपणारे आणि समाज जोडणारे असे उपक्रम मंडळाने सातत्याने राबवले आहेत.

तर अमरावती महनगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक म्हणाल्या, आझाद हिंद मंडळाचा गणेशोत्सव हा अमरावतीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. गेली ९८ वर्षे हे मंडळ सातत्याने सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रात योगदान देत आहे, ही अमरावतीसाठी अभिमानाची बाब आहे. शिर्डी साईबाबा मंदिराचा देखावा पाहून मन अगदी भारावून गेले. शासकीय सेवेत ओ.एस.डी. पदावर निवड झाल्याबद्दल किशोर बोराटणे व साधना बोराटणे यांचा आणि देखावा साकार करणारे कलाकार संतोष कनोजिया यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला माजी महापौर विलास इंगोले, माजी खासदार अनंतराव गुढे, माजी आमदार प्रदीप वडनेरे, माजी सभापती विवेक कलोती, ज्ञानेश्वर हिवसे, राजाभाऊ माजल गावकर, चंदूभाऊ पवार, प्रकाशभाऊ सगेकर, संतोष बद्रे, प्रा. गणेश मालोकर, डॉ. किशोर फुले, दिलीप कालोती, दिलीप दाभाडे, सुरेश रतावा, प्रमोद इंगोले, रफिक भाई चिक्कूवाले, सतीश चौधरी, अजित वडवेकर, नंदकिशोर गुम्बळे, शैलेश अग्रवाल, कैलाश गिरोलकर यांच्यासह असंख्य मान्यवर उपस्थित होते.



मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये – अध्यक्ष दीपक गुडधे, स्वागताध्यक्ष प्रवीण मानेकर, कार्याध्यक्ष रामेश्वर उपाध्याय, उपाध्यक्ष राजाभाऊ अडगूलवार, डॉ. प्रथमेश बोके, मो. जावेद साबीर, सचिव निलेश वानखडे, कोषाध्यक्ष नरेंद्र बेनी, सहसचिव तन्मय पिंजरकर, गणेश अग्निहोत्री, शुभम काशीकर, आकाश मोहोड आदी प्रमुख होते.तसेच मंडळाचे ज्येष्ठ सदस्य भूषण पुसतकर, प्रसाद मोरे, रामाभाऊ चावंडे, दिवाकर चिखलकर, नितीन सराफ, ॲड. विजय संगेकर, मयूर जलतारे, राजेश जायदे, जयंत कलोती, नंदू गुम्बळे, निलेश सराफ, गुड्डू ढोले, संतोष चिखलकर, अजय इंगोले, उदापुरे बंधू, भैया इंगोले, अण्णा करणे, नितीन इंगोले, पांडुरंग रायकवार, राजू हिरपूरकर, सुनील महल्ले, संजय हिरपूरकर, नंदू माकवाने, सुरेश चिखलकर, अशोक बामणगांवकर, ॲड. चंदू डोरले, डॉ. संजय तिरथकर, विशाल फाटे, डॉ. आकाश मोरे, विनोद घोडेगावकर, दीपक इंगोले, किरण उदापुरे, उमेश देशमुख, संजय कदम, नितीन फुसे, मनीष चौधरी, मनीष काजणेकर, अमित काजणे कर, अवी अनासने, संदीप कुटारिया, राजू बोराटणे, सुरेश वैश्य, मदन पुसतकर, नाना उदापुरे, राजा पिंजरकर, सतीश बद्रे, सागर इंगोले, रोशन पुसतकर, अनिकेत नवघरे, किशोर पुसतकर, संजय गुम्बळे, नितीन कोहळे, रवि पाटमासे, सचिन कोहळे, मुन्ना दुलारे, किरण विंचूरकर, प्रेमानंद पुसतकर, अजय पुसतकर, पुसतकर, प्रथमेश बाखडे,हिवसे, आर्यन ढोले, वेदांत डांगे, राहुल कथलकर, योगेश पुंड, सचिन भेरडे, अशोक पोहेकर, चिखलकर, विजू गावंडे, सुनील तिप्पट, संजय पाटील यांची उपस्थिती लक्षणीय होती.प्रास्ताविक डॉ. किशोर फुले संचालन संजय मुचळंबे यांनी केले.



# विदर्भातील अष्टविनायक



विदर्भात जे अष्टविनायक आहेत त्यामध्ये शमी अदासा मंदिर हे नागपूरपासून अंदाजे ४० कि.मी. अंतरावर असलेल्या आडासा गावातील एक प्राचीन गणेश मंदिर आहे. जे श्री विष्णूंच्या वामन अवताराने शमी वृक्षाखाली स्थापित केलेल्या गणेश मूर्तीसाठी प्रसिद्ध आहे. याला शमी विघ्नेश्वर किंवा शमी गणेश मंदिर म्हणून ओळखले जाते. या परिसरात बाल गणेश, शिव, हनुमान, काळभैरव, काली माता आणि नागदेवता यांची मंदिरे आहेत.

श्री गणेशाची पूजा करण्याचा संबंध बळीराजा याच्या इंद्रपदासाठी केलेल्या अश्वमेध यज्ञाशीही जोडलेला आहे.

अदासा हे महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील एक गाव आहे. हे गाव तेथील गणेश मंदिरामुळे नावाजलेले आहे. नागपूर शहरापासून अदासा मंदिर नागपूर ते कळमेश्वर महामार्गावर असून अंदाजे ४० कि. मी. अंतरावर आहे. नागपूर छिंदवाडा लोहमार्गावर पाटणसावंगी या स्थानकापासून १२ कि.मी. अंतरावर आदासा हे क्षेत्र आहे. एका उंच टेकडीवर हे पुरातन गणेश मंदिर आहे. ही मूर्ती नृत्यगणेशाची आहे. ही गणेशमूर्ती उजव्या सोंडेची आहे. महापाप, संकष्ट आणि शत्रू या तीन दानवांनी जगाला त्राही त्राही करून सोडले होते. या दानवांच्या तावडीतून सुटका करून घेण्यासाठी सर्व देवांनी शंकर-पार्वतीरूपी असलेल्या शमीच्या वृक्षाखाली गणेशाची आराधना केली. तेव्हा त्या वृक्षाच्या मुळापासून शमी विघ्नेश प्रकट झाला आणि त्याने त्या तीनही दानवांचा संहार केला. ज्या स्थळी ही कथा घडली त्या ठिकाणी मुद्गल ऋषींनी गणेशमूर्तीची स्थापना केली. तेच हे अदोश क्षेत्र. गणेशाच्या २१ स्थानांपकी हे एक जागृत गणेश स्थान आहे. येथे माघ शुद्ध चतुर्थीला मोठा उत्सव असतो.

मंदिर टेकडीवर वसलेले असल्याने तेथून आजूबाजूचा परिसर नयनरम्य दिसतो. मंदिरात गणेशाची देखणी अशी भव्य स्वयंभू गणेश मूर्ती आहे. अदासा येथील गणेशाचे दर्शन घेण्याकरिता हजारो भाविक येथे रोज येतात. गणपतीच्या मूर्तीला 'शमी विघ्नेश' म्हणतात. ती महाराष्ट्रातील सर्वात उंच गणेशमूर्ती आहे. ही जवळपास ६ मीटर उंच आहे. या मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी वाटते. येथील शंकराच्या मंदिरात असलेली पिंड दक्षिणाभिमुख आहे.

**विकास धुळेकर**

## गौरी गणपती. ..



वाजत गाजत आले
गणराज सुखेविराजे

भाव भक्ती ऐश्वर्याने
गरीब भक्त बने राजे

जेष्ठा-कनिष्ठा-गौरीच्या
आगमने दुंदुभी गाजे

दुग्धशर्कर केशरयोग
ऊत्साह आनंद साजे

विहंगम दृश्य पहाया
आवताण दिधलेविजे

ढोल ताशेही नैसर्गिक
लयबध्द सुरमयी गर्जे

स्नेहाळ प्रेम वर्षावात
मनमुराद सगळे भिजे

अवनीवर तारांगण हे
सुख स्वर्गात नसे दुजे

पक्वान्नांचा घमघमाट
अन्नपूर्णा साक्षात सजे

प्रसाद वाटता परिसरा
उदर तुडुंब भरले माझे

कितीद्याल सहस्त्र करे
उपकृतसंचितांचेओझे

पुण्य किरकोळ माझे
अस्मादिकझालो खुजे

**हेमंत मुसरीफ**

# आई-वडीलांच्या सेवेतच श्री गणेशाचे दर्शन - पंकजपाल राठोड

## शिवाई गणेशोत्सव मंडळाचे आयोजन

**नांदगांव खंडेश्वर/वार्ताहर**

आपले बाळं खुप मोठे व्हावे, त्याला सुख-समृद्धी लाभावी याचे उराशी स्वप्न बाळगणारे आपले हितचिंतक आई-वडील होत. त्यांचे उपकार अनंत आहेत. आपल्या आई-वडीलांच्या सेवेतच श्री गणेशाचे दर्शन आहे, अशी माय-बाप महती आपल्या प्रबोधनवाणीतून पंकजपाल महाराज राठोड यांनी नांदगांव खंडेश्वर येथे विशद केली.

नांदगांव खंडेश्वर येथे शिवाई गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गणेशोत्सव निमित्त सत्यपाल महाराजांचे शिष्य पंकजपाल महाराज राठोड याचा सप्तखंजेरीप्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.



दारु, बिडी, तंबाखू आदी वाईट व्यसने माझ्या खंजेरीत टाका व भारत देशाचे शिल्पकार बना, असे आवाहन यावेळी पंकजपाल राठोड यांनी केले. पंकजपाल यांच्या सप्तखंजेरीसुरात नांदगांव खंडेश्वर परिसर दुमदुमुन गेला होता. यावेळी पंकजपाल महाराजांना कार्यक्रम सादर करण्यास हार्मोनियम वादक पांडुरंग राऊत, तबलावादक संतोष आमटे, साथसंगत विलास राऊत, राम गांवडे यांनी साथ दिली. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रवंदनने झाला.

# श्री गणेश संकटाचे निवारण करणारी देवता-आ.सुलभा खोडके

## चैतन्याच्या आणि आनंदाच्या महाउत्सवात गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण

**अमरावती/का.प्र.**


श्री गणेश ही विद्येची देवता व संकटाचें निवारण करणारी देवता म्हणून प्रसिद्ध आहे.एखाद्या महत्वाच्या कार्याच्या आरंभी ' श्री गणेशाय नमः ' म्हणून गणेशाची स्तुती व आराधना करण्याचा प्रघात आहे. त्याचप्रमाणे अध्ययनाच्या आरंभीही गणेशाचा नामोच्चार करतात. हा देव सकळ विघ्नयांचा हर्ता व मंगलमूर्ती असा मानला जात असल्यामुळे या देवाचे पूजन सर्वांच्या घरी होते. असे प्रतिपादन आ. सुलभा खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले. गाडगे नगर - राठीनगर मार्ग परिसर स्थित विघ्नहर्ता गणेशोत्सव मंडळ येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. सर्वप्रथम आ.सुलभा खोडके व यश खोडके यांच्या हस्ते विघ्नहर्ता श्री. गणपती बाप्पा व संत श्री गजानन महाराज यांच्या प्रतिमेस पूजन - वंदन - नमन व माल्यार्पण करण्यात आले. तदनंतर त्यांच्या हस्ते 'श्रींची ' आरती करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ नागरिक व ज्येष्ठ महिला भगिनींच्या हस्ते आ.सुलभा खोडके यांचे स्वागत व यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी विघ्नहर्ता गणेशोत्सव मंडळाचे सर्व सदस्य व पदाधिकारी तसेच ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी व युवक - युवती मोठया संख्येने उपस्थित होते.



# काटपूर गणेश दर्शन



वादक संतोष आमटे, साथसंगत विलास राऊत, राम गांवडे यांनी साथ दिली. कार्यक्रमाच



वादक संतोष आमटे, साथसंगत विलास राऊत, राम गांवडे यांनी साथ दिली. कार्यक्रमाच

# वलगाव नगरीत १८ फूट उंच विठ्ठल रूपी गणेशाचे आगमन



**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

वलगाव येथील लोकमान्य गणेशोत्सव मंडळ यावर्षी ५६ व्या वर्षात पदार्पण करत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त व सतत सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या लोकमान्य प्रतिष्ठान, वलगाव द्वारा संचालित या मंडळात यावर्षी १८ फूट उंच विठ्ठलाच्या रुपात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली असून संपूर्ण वलगाव नगरी दुमदुमली आहे.

गणेशोत्सवाच्या काळात रक्तदान शिबिर, आरोग्य शिबीर तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्याची परंपरा यंदाही सुरू राहणार आहे. सोहळ्यात लोकमान्य मंडळाचे ज्येष्ठ सभासद मुन्ना वसु,राजेंद्र निर्मळ, ज्ञानेश्वर निर्मळ, अनिल वसु,किशोर तायडे यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमान्य मंडळाचे अध्यक्ष कार्तिक वसु तसेच श्रीजित दिवाण, कृष्णा कडू, कुलदीप किलोर, रजत निर्मळ, प्रसाद तायडे, प्रसाद ठाकरे, तुषार वसु, शंतनु हागोने, आदित्य वसु, हर्ष हागोने, ऋषिकेश म्हाला, गोपाल डहाके, संकेत ठाकरे, अंकुश काकड, रणजित बंड, अक्षय यवले, जय धर्माळे, आलोक उंबरकर, यश शेरेकर, रितेश म्हाला, अमन निर्मळ, उदय वसु, ईशान किलोर, यश किलोर, अथर्व म्हाला, अर्जुन निर्मळ, कनैया तायडे, अर्णव दिवाण, कुणाल शेरेकर, चिंटू मुल्ला, कृष्णा मोरे आदी कार्यकर्त्यांनी आयोजनात सक्रिय सहभाग घेतला.

# दाऊदी बोहरा समाज बांधवांची वृक्षारोपण मोहीम

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

दाऊदी बोहरा समुदायाने भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा केला, ज्यामध्ये देशभक्तीचे रंग आणि पर्यावरणीय कृतीचे हिरवे वचन एकत्र आले. कम्युनिटी सेंटरमध्ये, तिरंगा अभिमानाने फडकवण्यात आल. सर्व बोरा समाज बांधवांनी राष्ट्रगीत सादर केले आणि स्वयंसेवकांनी झाडे लावली , प्रत्येक रोपटे देशाच्या भविष्यासाठी जिवंत श्रद्धांजली आहे.या वर्षीच्या अधिकृत थीमनुसार - भारताच्या सामायिक वारशाचे उत्सव साजरा करणाऱ्या उपक्रमांद्वारे तरुणांमध्ये अभिमान



आणि एकता वाढवणे - समुदाय सदस्यांनी पर्यावरणाचे जतन करण्याची प्रतिज्ञा केली.'आमचे नेते, परमपूज्य सय्यदना मुफद्दल सैफुद्दीन यांच्या वृक्षारोपणा च्या थेट मार्गदर्शनानंतर, आम्हाला समजते की पर्यावरणीय संवेदनशीलता आणि शाश्वतता आपल्या राष्ट्राच्या प्रगती आणि विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे,' असे कार्यक्रमाचे स्थानिक समन्वयक जुझेर बद्री म्हणाले. 'स्वातंत्र्यदिनी झाडे लावून, आपण आपले स्वातंत्र्य साजरे करतो आणि भविष्यातील पिढ्यांसाठी आपल्या प्रिय भूमीचे रक्षण करण्याची जबाबदारी घेतो.'तीन दशकांहून अधिक काळ पर्यावरणीय शाश्वतता मोहिमांचे प्रणेते असलेल्या बुरहानी फाउंडेशनच्या पाठिंब्याने, दाऊदी बोहरा समुदायाच्या जागतिक परोपकारी व्यासपीठ, प्रोजेक्ट राईज अंतर्गत देशव्यापी वृक्षारोपण उपक्रम आयोजित केला जातो.



# मन नदीत पोहण्यासाठी गेलेल्या तिघांपैकी एक युवक गेला वाहून !

## पिंपळखुटा येथील घटना : तहसीलदार व ठाणेदार उपस्थित राहून शोधमोहीम सुरू

■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळखुटा येथील मन नदीत शनिवारी (दि. ३० ऑगस्ट) सकाळी साडेनऊच्या सुमारास तीन युवक पोहण्यासाठी गेले असता, पाण्याच्या जोरदार प्रवाहात तिघांपैकी एक युवक वाहून गेला. या घटनेने गावासह परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

करण वानखडे असे बेपत्ता झालेल्या युवकाचे नाव असून, त्याच्यासोबत गेलेले नागेश वानखडे व गोलू वानखडे हे दोघे थोडक्यात बचावले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून पातुर तालुक्यात मुसळधार पावसामुळे ढगफुटी सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रकल्पाच्या सांडव्यावरून मोठ्या प्रमाणात पाणी सोडले जात असल्याने नदी-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. या पार्श्वभूमीवर तिघे युवक शनिवारी सकाळी पोहण्यासाठी नदीत उतरले, मात्र प्रवाहाचा अंदाज न आल्याने तिघेही वाहून गेले. संघर्ष करून नागेश व गोलू यांनी जीव वाचवला, परंतु करण वानखडे हा युवक पाण्यात बेपत्ता झाला.



घटनेची माहिती मिळताच तहसीलदार राहुल वानखेडे, चान्नी ठाण्याचे ठाणेदार रवींद्र लांडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साबळे, वंदेमातरम बचाव कार्य पथकाचे प्रमुख उमेश आटोटे, मंडळ अधिकारी सतीश ढोरे, तलाठी मिलिंद इचे, दीपक नळकांडे आदी अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली व शोधमोहीम हाती घेतली. मात्र शनिवारी उशिरापर्यंत युवकाचा शोध लागू शकला नाही.

> ‘पिंपळखुटा येथील तीन युवक नदीत पोहण्यासाठी गेले असता, त्यातील एक युवक वाहून गेला. दोन युवकांना जीव वाचवता आला. मात्र वाहून गेलेल्या युवकाचा शोध अद्याप लागलेला नाही. शोध पथकाच्या मदतीने मोहीम सुरू असून पालकांनी आपल्या मुलांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.’
>
> **रवींद्र लांडे, ठाणेदार,** चान्नी पोलीस स्टेशन

**पालकांनी सावधगिरी बाळगावी :** पातुर तालुक्यातील मुसळधार पावसामुळे नदी-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना अशा वेळी नदी-नाल्यात पोहण्यासाठी जाण्यापासून रोखावे, अशी प्रशासनाची सूचना आहे.

# अहमद खान अडगाव खुर्द महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्षपदी आठव्यांदा अविरोध

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील अडगाव खुर्द ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी अहमद खान यांची आठव्यांदा अविरोध निवड करण्यात आली आहे.

दिनांक २९ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित ग्रामसभेत सरपंच सौ. सुनिताताई प्रमोद सोनोने, उपसरपंच अनिताताई महेंद्र गवई, सदस्य अमन गवई, सौ. राधा लायडे, वसिम शाह, सौ. रुपाली वानखडे तसेच ग्रामविकास अधिकारी चरणसिंग डाबेराव यांच्या उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पार पडली.

ग्रामसभेत अहमद खान यांच्या कार्याचे कौतुक करत सर्व सदस्यांनी एकमताने त्यांची निवड केली. या



प्रसंगी बाळू धर्मे, नामदेव बेलूरकर, बबला खान, साहेबराव गवई, गुलाबराव गवई, दयाराम गवई, डॉ. भड, लक्ष्मण पटके, त्र्यंबक सोनोने, पांडुरंग भिसे, यासीन शहा, रावसाहेब साबळे, उमेश अढाऊ, किशन गवई, विश्वनाथ भुते, जबीर शाह, रामा तायडे, सतीश नेरकर, प्रमोद सोनोने, सुरेश वानखडे, लूखमान शेख यांच्यासह गावातील अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.अहमद खान यांची सलग आठव्यांदा निवड होणे हे त्यांच्या कार्यक्षमतेचे आणि लोकांच्या विश्वासाचे द्योतक असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# विस्तार अधिकाऱ्याकडून महिलांना अपशब्द

## संतप्त महिलेची कानशिलात!

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर पंचायत समिती अंतर्गत चरणगाव येथे मूलभूत सुविधांचा अभाव, नाल्यांची दुरवस्था, घाणीचे साम्राज्य आणि विकास कामांमधील अनियमितता याबाबत संतप्त झालेल्या महिला व ग्रामस्थांनी शुक्रवारी (दि. ३० ऑगस्ट) पातुर पंचायत समितीवर मोर्चा काढून जाब विचारला. मात्र समाधानकारक उत्तर न देता विस्तार अधिकारी दिनकर घुगे यांनी महिलांशी अरेरावी व अपशब्दांचा वापर केल्याने वातावरण तापले. या संतापाच्या भरात एका महिलेने अधिकाऱ्यांच्या चक्क कानशिलात लगावली, तर प्रत्युत्तरादाखल अधिकाऱ्यांनी देखील महिलेवर थापड काढल्याची घटना समिती आवारात घडली.

या घटनेनंतर ग्रामस्थ व महिलांनी पंचायत समिती आवारातच ठिय्या आंदोलन छेडले. त्यानंतर मोर्चा जिल्हा परिषदेकडे वळविण्यात आला. जिल्हा परिषदेमध्येही महिलांनी ठिय्या आंदोलन करून प्रशासनाला धारेवर धरले. अखेर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घटनेची चौकशी करून अहवाल मागविण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.



> ‘चरणगावच्या महिलांनी मोर्चा काढला होता. बोलताना शाब्दिक वाद झाला. मला शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. त्यामुळे प्रतिकार म्हणून मी देखील थापड मारली.’
>
> **दिनकर घुगे,** विस्तार अधिकारी, प. स. पातूर
>
> ..................
>
> ‘गावात घाणीचे साम्राज्य असून, विकास कामे कागदोपत्री दाखवून लाखो रुपये हडपले. या प्रश्नांवर जाब विचारला असता, विस्तार अधिकाऱ्यांनी अपशब्द व अरेरावीची भाषा वापरली. त्यामुळे संतापाच्या भरात मी त्याच्या कानशिलात लगावली.’
>
> **वंदना शेळके,** महिला, चरणगाव

**मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे निर्देश :** १५ व्या वित्त आयोगांतर्गत झालेल्या कामांमध्ये अनियमितता, कागदोपत्री दाखवलेली कामे व खर्च याबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी पुढे आल्या आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना सात दिवसांच्या आत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

# सुमिरमा फाउंडेशनचा गणेशोत्सवात ‘निर्माल्य कलश रथ सेवारत

■ प्रतिनिधी | अकोला ■

गणेशोत्सव आणि इतर धार्मिक उत्सवांमध्ये श्री ला अर्पण केले जाणारे फुले, हार, दुर्वा, बेलपत्र यांसारखे निर्माल्य थेट नदीत वा इतरत्र टाकल्याने होणारे प्रदूषण व आजार टाळण्यासाठी सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने यंदाही गणेशोत्सवात ‘निर्माल्य कलश रथ’ उपक्रम साकार केला आहे. या मोहिमेचा प्रारंभ शनिवार पासून करण्यात आला.सुमिरमा फाउंडेशनचे संस्थापक रमाकांत खेतान,फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ पूजा खेतान यांनी या कलश रथाचे पूजन करून ही मोहीम प्रारंभ केली.प्रस्तुत रथ महानगरातील अनेक परिसरात संचार करून उत्सवातील टाकाऊ हार, फुले, दुर्वा, बेलपत्र व अन्य निर्माल्य संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात येणार आहे. यामुळे नद्या व पाण्याचे



प्रदूषण टाळून भक्तांची श्रद्धा व परंपरा योग्य प्रकारे जोपासल्या जाणार आहे. श्री भक्त व गणेशोत्सव मंडळांनी या रचनात्मक व पर्यावरण संवर्धन साठी आयोजित उपक्रमाचा लाभ घेऊन आपल्या जवळील निर्माल्य या निर्माल्य रथात संकलित करण्याचे आवाहन डॉ पूजा खेतान यांनी केले.निर्माल्य संकलन साठी भक्तांनी सुमिरमा फाउंडेशन, मो .९०९६६५५६०० यावर संपर्क करण्याचे आवाहन फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले.

# सावरगाव येथे महिलेच्या १४ दिवसांच्या उपोषणाची सांगता



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील अतिदुर्गम सावरगाव येथे रस्त्यासाठी १४ दिवसांपासून आमरण उपोषणाला बसलेल्या मंजुळा जानकीराम डाखोरे यांनी अखेर २८ ऑगस्ट रोजी उपोषण मागे घेतले.

महिलेच्या घरासमोरील शासकीय जागेवर ग्रामपंचायतीने घरकुल मंजूर करून बांधकाम सुरू केले होते. या बांधकामामुळे रस्ता बंद झाल्याने मंजुळा डाखोरे यांनी ग्रामपंचायतीसह संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी केल्या.

मात्र तक्रारींकडे दुर्लक्ष झाल्याने त्या २१ आणि २२ जुलै रोजी अन्नत्याग उपोषणाला बसल्या होत्या. त्यावेळी सरपंच बसंतीबाई राठी, त्यांचे पती राधेश्याम राठी व मुलगा अजय राठी यांनी रस्ता मोकळा करून देण्याचे आश्वासन दिले. परंतु

### ग्रामपंचायतीला अपयश; गटविकास अधिकाऱ्यांचा पुढाकार

आश्वासन पूर्ण न झाल्याने संतप्त होऊन त्यांनी १५ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरू केले.

ग्रामपंचायतीकडून कोणतीही तोडगा न निघाल्याने महिलेचे १४ दिवस उपोषण सुरूच राहिले. शेवटी पातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संगीता इंगळे, विस्तार अधिकारी पजई, घुगे, सचिव समाधान साळोकार, उपसरपंच संतोष चंदनशे, ग्रामपंचायत सदस्य जानू राठोड तसेच सामाजिक कार्यकर्ते विजयकुमार ताले, राजरत्न कांबळे, अनिल चहाकर यांनी पुढाकार घेऊन रस्ता मोकळा करून देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे २८ ऑगस्ट रोजी मंजुळा डाखोरे यांनी आपले उपोषण मागे घेतले.

# गणेशोत्सवात मध्यरात्रीपर्यंत लाऊडस्पीकरला परवानगी द्या!

## जिल्हाधिकाऱ्यांकडे शिंदेसेनेची मागणी



■ प्रतिनिधी | अकोला ■

गणेशोत्सवात गणेश मंडळांचा उत्साह आणि सांस्कृतिक गौरव वाढविण्यासाठी मध्यरात्रीपर्यंत लाऊडस्पीकर वाजविण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी शिंदेसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्याकडे निवेदनातून करण्यात आली आहे.

राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी गणेशोत्सवात मध्यरात्रीपर्यंत लाऊडस्पीकर वाजविण्यास परवानगी दिली आहे. तसेच ’जिल्हाधिकाऱ्यांनी गणेश मंडळांशी चर्चा करून कोणत्या दिवसांना ही सवलत लागू करावी हे ठरवावे’, असे निर्देशही दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, शहरातील गणेश मंडळांचा उत्साह आणि सांस्कृतिक गौरव वाढविण्यासाठी मध्यरात्रीपर्यंत लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी देण्यात यावी, अशी मागणी शिंदेसेनेने जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्याकडे निवेदनातून केली. सर्व मंडळे नियमांचे पालन करतील व कोणताही अनुचित प्रकार होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. हे निवेदन शहरप्रमुख रमेश गायकवाड यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले. यावेळी शहर संघटक सागर पुर्णे, उपशहरप्रमुख राजेश दांडेकर, भूषण इंदौरिया, प्रदीप काशीद, शिवम पुरोहित, आकाश दलाल, उमेश लांडगे, चेतन जैन, रोहन चंदन, शंकर शर्मा, वैभव बोचाटे, आकाश पाठक, महादेव धायडे, आकाश गावंडे, श्याम वाघिरे, राजेश दुबे, विजय प्रधान, अजय परडे, अभिनव शुक्ला, भानुदास गोंधळेकर, महेश करुळे, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाची उत्तुंग भरारी; महाविद्यालयाची विद्यार्थी क्षमता आता शंभर

**अकोला :** होमिओपॅथीचा प्रसार व प्रचार करण्या साठी होमिओपॅथी विश्वात शैक्षणिक क्रांती घडविणाऱ्या होमिओपॅथीक एज्युकेशन सोसायटी अकोला द्वारे संचालित राज्यातील सर्वात जुन्या होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालया पैकी एक असणाऱ्या स्थानीय अकोट रोडवरील होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाची ५० असणारी विद्यार्थी क्षमता आता या शैक्षणिक सत्र पासून १०० झाली असून तशी मान्यता मिळाली असल्याची माहिती महाविद्यालया च्या वतीने शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी



होमिओपॅथीक एज्युकेशन सोसायटीचे आधुनिक डॉ शिवदास बुटे, सचिव डॉ जयप्रकाश जयस्वाल, संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ तिलकराज सरनायक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजयकुमार तिवारी उपस्थित होते.अकोट रोड वरील या होमिओपॅथी महाविद्यालयाची स्थापना १९५४ मध्ये होऊन महाविद्यालयाने शेकडो होमिओपॅथीचे वैद्यकीय तज्ञ घडवून विद्यार्थ्यांचे करिअर गतिमान केले आहे.आज या महाविद्यालयाचे विद्यार्थी समाजात आपली वैद्यकीय सेवा करून या पॅथीचा प्रचार व प्रसार करीत आहेत.महाविद्यालयात अनेक प्राध्यापक दीर्घ अनुभवी व वैद्यकीय विषयात पारंगत असून त्यांचा शैक्षणिक अनुभव हा ३० वर्षाच्या वर आहे. मागील ३० वर्षांपासून अनेक प्राध्यापक महाविद्यालयात शिकवत असून अनेक दिग्गज होमिओपॅथ घडविण्याचे काम या माध्यमातून महाविद्यालयाने केले आहे.

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५२१/२०२५ — प्रोसेस नं.१३३८९/२०२५
चौ.ता. १६/०९/२०२५ — दिनांक : ०८/०८/२०२५

**अर्जदार :** १. दादाराव श्रावण अंबरते रा. उगवा ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. लक्ष्मण गंगाराम गोतमारे २. शांताबाई लक्ष्मण गोतमारे
**पत्ता :-** रा.दोघेही रा. फ्लॅट नं. १०४, रॉयल रिजेन्सी, महाजनी प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मण गंगाराम गोतमारे यांचे दि. २९/१०/१९७० रोजी मौजे उगवा ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे. तसेच मयत शांताबाई लक्ष्मण गोतमारे यांचे दि. २३/०८/१९७८ रोजी मौजे उगवा. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १६/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकास या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे अशोक नामदेव नवघरे, रा. प्लॉट क्र. २१, हाउस नं. डी ८/१५३५, मेंगे नगर, कौलखेड, अकोला ता.जि अकोला यांनी प्लॉट मालक नामे श्रीराम श्रीकृष्ण भोंगरे, रा. खडकी बु., अकोला, ता. जि. अकोला यांच्यासोबत त्यांच्या मालकी व ताब्यातील खालील वर्णनाची मालमत्ता/प्लॉट विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे व लवकरच खरेदीखत नोंदविणार आहे. त्याचे वर्णन मौजे खडकी बु, प्र. ता. जि. र.डी. र. स.डी. अकोला म.न.पा. अकोला (पुर्वीची ग्रा.पं. खडकी बु.) येथील सर्वे नं. १८ / ३ चे जमिनीत वि. एस. डी. ओ. साहेब अकोला यांच्या फाईलवरील रे.के.नं. एन. ए. पी. ३४ / खडकी बु./७४/ २००१-०२, नि. ता. १८/०९/२००२ अन्वये मंजुर लेआउट नकाशातील प्लॉट नं. ३२ (बत्तीस) चा प्लॉट याचे एकुण क्षेत्रफळ २६०.०० चौ.मि. पैकी उत्तर दक्षिण वाटणीने पश्चिमेकडील भागाचा

खालील मोजमापाचा प्लॉट त्याचे मोजमाप - पुर्व पश्चिम -१०.०० मिटर, उत्तर-दक्षिण १३.०० मि. याचे एकुण क्षेत्रफळ १३० चौ.मि. (१३९८.८० चौ.फु.) यामधील १८.५८ चौ.मि. चे बांधकामासह ज्यास चर्तुसिमा- पुर्वेस यातील उर्वरीत प्लॉट, पश्चिमेस ज्यास वेगळे लेआउट, उत्तरेस लेआउट प्लॉट क्र. २४, २५, दक्षिणेस लेआउट रोड. वरील वर्णनाचीमालमत्ता आमचे पक्षकार यांनी लवकरच खरेदीखत करण्याचे ठरविले आहे.

तरी वरील मालमत्तेवर कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, सावकारी व्यवहार अथवा कोणत्याही प्रकारचा अधिकार अथवा कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास लेखी कागदोपत्री . पुराव्यासह खालील पत्त्यावर ७ दिवसाच्या आत संपर्क साधवा अन्यथा कोणाचीही कोणतीही तक्रार नाही असे समजुन आमचे पक्षकार खरेदीखत नोंदवुन घेतील व त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची उजर चालणार नाही. सबब ही जाहीर नोटीस.

अकोला
दि. ३०/०८/२०२५

**ॲड. जी. एच. परनाटे**
औरंगपुरेचा वाडा, देशमुख पेठ, अकोला, ता. जि. अकोला मो. ९८२२१८८५१८
पक्षकारातर्फे अधिवक्ता, अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६२६/२०२५ — प्रोसेस नं.१४३७७/२०२५
चौ.ता. १३/१०/२०२५ — दिनांक : २६/०८/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती शालिनी योगेश वाठुरकर २. भुषण योगेश वाठुरकर ३. कृष्णा योगेश वाठुरकर सर्व रा. वाठुरकर लेआउट, पवनपुत्र अपार्टमेंटजवळ, कौलखेड रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : योगेश चंद्रशेखर वाठूरकर
**पत्ता :-** रा. वाठूरकर लेआउट, पवनपुत्र अपार्टमेंटजवळ, कौलखेड रोड, अकोला.ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की. मयत योगेश चंद्रशेखर वाठुरकर यांचे दि. १०/०६/२०२५ रोजी घाटी हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १३ / १० / २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २६/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६३४/२०२५ — प्रोसेस नं.१४५३९/२०२५
चौ.ता. १३/१०/२०२५ — दिनांक : २९/०८/२०२५

**अर्जदार :** १. राजकन्या शेखर खुमकर, २. अबोली शेखर खुमकर, ३. शोभा काशिनाथ खुमकर उर्फ शोभा बळिराम जानुनकर सर्व रा. लेन नं. ३, गायत्री मंदिर जवळ, गायत्री नगर, मोठी उमरी, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शेखर काशिनाथ खुमकर
**पत्ता :-** रा. लेन नं.३, गायत्री मंदिर जवळ, गायत्री नगर, मोठी उमरी, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शेखर काशिनाथ खुमकर यांचे दि. ०७/०७/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५०७/२०२५ — प्रोसेस नं.१४१७१/२०२५
चौ.ता. ०३/१०/२०२५ — दिनांक : २०/०८/२०२५

**अर्जदार :** १. नितीन उत्तमराव मेतकर २. अनिल उत्तमराव मेतकर रा. चिखलगाव, ता. जि. अकोला ३. अनिता देविदास टवरे रा. साई नगर, शेगांव, ता. जि. बुलढाणा ४. सुनिल उत्तमराव मेतकर रा. न्यू खेतान नगर, कौलखेड, अकोला. ५. मिना तुळशीराम घुले रा. सहयाद्री कॉलनी, पिंपळे गुरव, पुणे. ६. विद्या बाबुराव ठाकरे रा. झाडेगाव, ता. जळगांव जामोद, जि. बुलढाणा. ७. शिला रमेश मेतकर ८. निशांत रमेश मेतकर ९. कुणाल रमेश मेतकर १०. शाम रमेश मेतकर रा. चिखलगाव, ता. जि. अकोला. ११. रमाताई देविदास मेतकर १२. प्रमोद देविदास मेतकर रा. चिखलगांव, ता. जि. अकोला. १३. सुनिता विठ्ठल पिसे रा. काटेमानीवली, कल्याण, ठाणे. १४. विजया किशोर ढोले रा. गांधीनगर, खडकी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : उत्तम किसन मेतकर
**पत्ता :-** रा. चिखलगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत उत्तम किसन मेतकर यांचे दि. २४/०२/१९८० रोजी चिखलगांव, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना ह्या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार अभिलाश हेमंत दिवेकर यांनी सौ. यशोदाबाई सुखदेव खंडारे, रा. मु. पो. पारस, ता. बाळापुर जि. अकोला यांच्याशी त्यांच्या मालकीचे व ताब्यातील खालील वर्णनाचे शेत विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे. स्थावरचे वर्णन खालीलप्रमाणे : मौजे पारस भाग-१, प्र. ता. जि. र. डी. र. स. डी. प.स. बाळापुर, चे कक्षेतील गट क्र. १३१९, ज्याचे एकुण क्षेत्रफळ ० हे. ८१ आर. ज्यास चतु:सिमा- पुर्वेस - प्रल्हाद जानोरकर चे शेत पश्चिमेस सुभाष भागात चे शेत उत्तरेस सु. स. खंडारे चे शेत व दक्षिणेस– प्रल्हाद लांडे चे शेत येणेप्रमाणे वरील वर्णनाची मिळकत त्यात येणाऱ्या सर्व तदंगभुत वस्तुसह, झाडाझुडपांसह, दगडमातीसह, वहिवाटीच्या संपुर्ण हक्कासह व सर्व अधिकारासह आमचे पक्षकार यांनी विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे. वरील स्थावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, ताबा, इसार व इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द

झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत आमच्याकडे लेखी कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत आली नाही तर आमचे पक्षकार वरील वर्णनाच्या मिळकतीचे खरेदीखत नोंदवून घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणताही व कसल्याही प्रकारचा उजर किंवा वाद चालणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

अकोला
दि. ३०/०८/२०२५

**पक्षकाराकरिता अधिवक्ता**
**(ॲड. अजय वा. गोडे)**
मो. ९४२०७१२०८८, ९१७५९३८२४२

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २७६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियान कार्यशाळेत

# आष्टी पंचायत समितीचा सहभाग

**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियानांतर्गत पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत आष्टी पंचायत समितीने सक्रीय सहभाग नोंदवला. याकार्यशाळेचे अध्यक्षस्थानी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे होते तर प्रमुख मार्गदर्शक ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे संचालक मल्लीनाथ कलशेट्टी, यशदाचे प्रविण प्रशिक्षक शिंदे, हीवरे बाजार ग्रामपंचायतचे माजी सरपंच पद्मश्री पोपटराव पवार, भंडारा जिल्ह्यातील डव्हा ग्रामपंचायतच्या सरपंच ज्ञगेश्वरी चौधरी मंचावर उपस्थित होते.

कार्यशाळेत राज्यातील विविध जिल्ह्यांच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, तसेच राज्यातील विविध पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी तसेच निवडक ग्रामपंचायत अधिकारी आणि निवडक सरपंच उपस्थित होते. आष्टी पंचायत समितीच्या वतीने प्रभारी गटविकास अधिकारी प्रदीप चव्हाण, पेठ अहमदपुर



ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी प्रितम लोहे आणि लहान आर्वी ग्रामपंचायतचे सरपंच सुनिल साबळे उपस्थित होते. यावेळी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कसे राबवायचे यावर सविस्तर मार्गदर्शन केले. तर यशदाचे मल्लीनाथ कलशेट्टी यांनी जलसंधारण, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि स्वच्छता यावर अनुभव कथन केले. कार्यशाळेत 'हरितग्राम' आणि 'स्मार्ट ग्राम' आणि जलसंधारण यावर पोपटराव पवार यांनी मार्गदर्शन केले.

ग्रामविकास मंत्री जयप्रकाश गोरे यांनी आपल्या भाषणात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वी करण्यासाठी तळगाळातील प्रशासन आणि नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.

त्यांनी हे अभियान जिल्हा आणि तालुका तसेच ग्रामस्तरावर यशस्वी होण्यासाठी राज्यातील उपस्थित सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सर्व गटविकास अधिकारी यांच्यावर जबाबदारी दिली.

कार्यशाळेच्या निमित्ताने पंचायत राज संस्थांमधील सक्षमता, पारदर्शकता आणि नवीन उपक्रमांची देवाणघेवाण घडून आली.

आष्टी पंचायत समितीच्या कार्यशाळेतील सहभागामुळे हे अभियान आष्टी तालुक्यात राबविण्यासाठी प्रभावी मार्गदर्शन लाभले असे मत प्रभारी गटविकास अधिकारी प्रदीप चव्हाण यांनी व्यक्त केले.

# देवळीत राष्ट्रीय क्रीडा दिवस उत्साहात

**देवळी/जनमाध्यम**

पद्मभूषण, मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त सृजन इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवातीला संस्थेच्या अध्यक्षा डॉ. श्रद्धा पंकज चोरे व सचिव डॉ. प्रशांत चव्हाण यांनी मेजर ध्यानचंद तसेच आमचे प्रेरणास्थान स्व. पंकज चोरे सर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका प्रिया वैद्य, हायस्कूल प्रमुख कीर्ती कामडी, मनीषा कात्रे, क्रीडा शिक्षक बनसोड, सरला कापसे, कल्याणी वंजारी, वैष्णवी गावंडे, सुनीता वाडकर, अजय मोटघरे, भगत सर तसेच शिक्षकवृंद व विध्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांची रॅली काढून उत्साहात करण्यात आली.



# दोन एकरातील तूर पिकांचे डुकरांकडून नुकसान

## शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची मागणी

**सेलू/जनमाध्यम**

अगोदरच शेतकरी जास्त प्रमाणात पडत असलेल्या पावसामुळे चिंतेत असून त्यात जंगली वन्य प्राण्यांचा देखील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे टाकळी किटे येथील शेतकरी सुरेश किटे यांचे वघाळा शिवारामध्ये शेत आहे .

त्यांनी त्यांच्या दोन एकर शेतामध्ये तूर पिकाची लागवड केली असून पीक चांगल्या प्रकारे जोमात होते परंतु त्यांचे दोन एकर मधील तुरीचे पीक मोठ्या प्रमाणात रानडुकराने खराब केले व



जागोजागी मोठ मोठाले खड्डे पाडून पिकाची पूर्णपणे नासाडी केली त्यामुळे शेतकरी सुरेश किटे यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले या घटनेची माहिती वनविभागाचे वनरक्षक अधिकारी डाकोरे यांना देण्यात आली असून शेतकऱ्याने नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

# सेलूत मुस्लिम कुटुंबियांनी सपत्नीक केली गणरायाची आरती

## माहेर संस्थेत दरवर्षी साजरा होतो गणेश उत्सव

**सेलू/जनमाध्यम**

निराश्रीत निराधारांना आश्रय देणाऱ्या सेलूतील माहेर संस्थेत दरवर्षी गणरायाची स्थापना करून गणेश उत्सव साजरा केला जातो.

यात सहभागी होत सेलूतील कलीम शेख या मुस्लीम कुटुबांनी सपत्नीक गणरायाची आरती करून सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला.

सेलूतील माहेर संस्थेने अनेकांना आधार देत त्यांचा सांभाळ केला असून काहिंना त्यांचे घराचा पत्ता घेत कुटुंबियाचे स्वाधीन केले निराश्रीत निराधारांसाठी एक आशेचा



किरण ठरलेल्या या माहेर संस्थेच्या माध्यमातून येथे दरवर्षी विविध धार्मिक सामाजिक उपक्रम राबविले जाते येथे दरवर्षी गणपतीची स्थापना करून गणेश उत्सव साजरा करण्यात येतो येथील सगळे एक विशिष्ट पोषाख धारत करीत वाजत गाजत गणरायाची मूर्ती आणून त्याची स्थापना करण्यात आली यावेळी त्यांचे चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता, यात येथील या मुस्लिम कुटुबियांनी सहभागी होत गणरायाची आरती करून सर्वांना प्रसादाचे वाटप केले.

त्यांचे या कार्यामुळे देवापुढे सगळे सारखे हा संदेश मिळाला तसेही सेलू भागात हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक पाहायला मिळते अनेक उपक्रमात या युवकांचा सहभाग असतो त्यांचे या कार्याचे येथे स्वागत होत आहे.

# स्वयंम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

शासकीय वसतीगृहासाठी पात्र असलेल्या तथापी गुणवत्तेनुसार व वसतीगृहाच्या क्षमतेअभावी वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु करण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी १८ सप्टेंबर पर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.योजनेचा लाभ घेण्यासाठी इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील १२ वी नंतरच्या पदवी व पदव्युत्तर असलेले व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले विद्यार्थी पात्र राहील. विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या तालुक्याच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवासी नसावा. विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार पेक्षा जास्त नसावे.

ऑनलाईन प्रवेश अर्ज प्रक्रिया १ सप्टेंबर पासुन सुरु होणार असून अंतिम दि.१८ सप्टेंबर आहे. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी २४ ते ३० ऑक्टोंबर या कालावधीत होणार असून पहिली निवड यादी ३१ ऑक्टोंबर रोजी प्रसिध्दी करण्यात येणार आहे. पहिल्या निवड यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत १० नोव्हेंबर आहे. रिक्त जागेवर दुस-या प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार १३ नोव्हेंबर रोजी निवड यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. दुस-या निवड दुसऱ्या निवड यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत २१ नोव्हेंबर आहे, असे इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहाय्यक संचालकांनी कळविले आहे.

**नावात बदल**

माझे मार्कलिस्ट वरील पूर्वी **AKHILESH DEEPAK BAWANKAR** असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील **AKHILESH DIP AKRAO BAWANKAR** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

-:पत्ता :-
विठ्ठल मंदिर जवळ आंजी मोठी
वर्धा ४४२००१

# देवळी येथील जनता हायस्कूलमध्ये पालक शिक्षक सभा

**देवळी/जनमाध्यम**

जनता हायस्कूल देवळी येथे पालक शिक्षक शैक्षणिक सभा घेण्यात आली यावेळी सभेचे अध्यक्ष संजय बिजवार, शाळा व्यवस्थापन समिती पालक अध्यक्ष गणेश शेंडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून भैय्याजी बोंडखे शिक्षक तज्ञ शाळा व्यवस्थापन समिती, प्राचार्य धर्मेश झाडे, उपमुख्यधापक सुरेद्र उमाटे, पर्यवेक्षक भाऊराव जाधव आदिंची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी भैय्याजी बोंडखे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी शिक्षकांचा तसेच आई वडिलांचे मार्गदर्शन जीवनात आवश्यक आहे. तसेच बालकाच्या जीवनात सुरुवाती पासुनच पालकाचे योगदान जसे महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे शाळेत आल्या नंतर शिक्षक काय शिकवतो शिस्त लावतो तेव्हा विद्यार्थ्यांनी सर्व बाबीकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे. घरी आल्यावर पालकांनी शाळेतील सर्व चौकशी करणे अभ्यासक्रमांत गुहपाठ काय करायचा. आहे. या विषयी चौकशी करणे तसेच गणेश शेंडे यांनी सांगितले की मुलाना मोबाईलचे व्यसन लागले असुन प्रत्येक घरी लहान मुले मोबाईल पाहतात त्यामुळे त्यांच्या डोळ्यावर सुद्धा परीणाम होत आहे. तसेच खेळ सुद्धा विद्यार्थी विसरत चालले आहे, त्यामुळे आई वडिलांची जबाबदारी वाढली असुन आपल्या पाल्याकडे लक्ष द्यावे लागणार आहे. तसेच धर्मेश झाडे यांनी सांगितले की सोशल मिडिया मुळे काही मुल घडत आहे तर काही मुल त्यांच्या आधीन जाऊन आपले उज्वल भविष्य खराब करतांना दिसत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक,प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.४१,४२, श्रीकांत नगर, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा ४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक -प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त)-अभिराम देशपांडे

(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष -१३ अंक २७४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालयः- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन -९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com
abhiramdeshpande@gmail.com

# हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन साजरा

**हिंगणघाट/जनमाध्यम**

महाराष्ट्र शासनाचा क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वर्धा यांच्या विद्यमाने संजय गांधी स्मृती विद्या मंदिर हिंगणघाट येथे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून मोठ्या उत्साह साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना राजा सिंग, ज्येष्ठ शिक्षक न्याजुद्दीन सिद्दिकी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या कार्यक्रमांमध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका व न्याजुद्दीन सिद्दिकी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी खेळाकडे लक्ष केंद्रित करून आपल्या देशाचे आपल्या तालुक्याचे व जिल्ह्याचे नाव उज्वल करावे असे सांगितले.

या कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील क्रीडा शिक्षक बी . एल. खांडरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आपल्या देशाला हॉकी या खेळामध्ये ऑलम्पिक स्पर्धेमध्ये १९२८, १९३२, १९३६ मध्ये मेजर ध्यानचंद यांनी हॉकीमध्ये विजय प्राप्त करून आपल्या देशाचे नाव उज्वल केले. अशा महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचा गौरव केला. हा कार्यक्रम जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम, तालुका क्रीडा अधिकारी संदीप खोब्रागडे, क्रीडा अधिकारी अनिल निमगडे, क्रीडा मार्गदर्शक भोजराज चौधरी, तालुका क्रीडा अधिकारी जमीर सर, क्रीडा मार्गदर्शक वानखेडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये खेळाडूंना फळ वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील क्रीडा शिक्षक बी. एल. खांडरे यांनी केले . प्रमुख पाहुण्यांचे आभार विलास सूर्यवंशी यांनी मानले.

# परदेशात प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्जासाठी १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यातील अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांना परदेशामध्ये विशेष अध्ययन करण्यासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्ती करीता अर्ज स्विकारण्यासाठी दि.१ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी,अल्पसंख्यांक समुदायातील परदेशात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी https://fs.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर विहित नमुन्यातील परिपूर्ण भरलेला अर्ज, वाचनीय व सुस्पष्ट कागदपत्रे ऑनलाईन सादर करुन त्याची सुस्पष्ट प्रिंट, ऑफलाईन नमुन्यातील अर्जासोबत समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पूणे या कार्यालयास दि.१ सप्टेंबर पर्यंत सायंकाळी ६.१५ वाजतपर्यंत सादर करावी. सन २०२५-२६ साठी यापूर्वी अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांना परत अर्ज करण्याची आवश्यकता नाही. अधिक माहितीसाठी शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावरील ताज्या घडामोडी या लिंकवर भेट द्यावी, असे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी कळविले आहे.

# राष्ट्रसंतांना भारतरत्न मिळण्याबाबत पाठपुरावा करणार-खा.अमर काळे

**वर्धा/जनमाध्यम**

वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे कार्य तसेच त्यांनी भारतात शांतता, सुव्यवस्था राखणे, समाज प्रबोधन करुन समाजाला अंधश्रध्देपासून परावृत्त करणे, स्वातंत्र्याच्या लढ्यात सहभाग घेऊन समाजाला स्वातंत्र्याच्या लढयात सहभागी होण्यास प्रवृत्त करुन स्वत: पुढाकार घेणे, जनजागृत या अशा अनेक समाज हिताच्या देश हिताच्या कार्याची दखल घेऊन सरकारने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना भारतरत्न पुरस्कार द्यावा व या भागाचा खासदार म्हणून हा पुरस्कार मिळवून देण्याकरीता मी सतत प्रयत्नशिल असेल असे उदगार खा. अमर काळे यांनी नांदगाव (खंडेश्वर) येथील निळकंठ जेवडे गुरुजी आजीवन प्रचारक गुरुकुंज आश्रम मोझरी यांचे सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा कार्यक्रमात काढले.

पुढे बोलतांना जेवढे गुरुजी हे शिक्षक असल्याने त्यांनी आपल्या आयुष्यात राष्ट्रसंताच्या विचाराची प्रेरणा घेऊन आयुष्यभर राष्ट्रसंताच्या विचाराचे प्रबोधन समाजावर करण्याचे काम केले.

ते व्यवसायाने सुध्दा शिक्षक होते. शिक्षकाची जबाबदारी समाजात शिक्षक हा महत्त्वाचा घटक असून शिक्षक हा समाजच घडवत नाही तर समाजात तयार होणारी प्रत्येक पिढी ही सुसंस्कृत, सद्विचारी, कर्तबगार पिढी घडविण्याचे काम करते. एखादा डॉक्टर कडून थोडी फार चुक झाली तर रुग्णाला थोडाफार त्रास होईल, इंजिनिअर चुकला तर कामाची दुरुस्ती करता येईल पण शिक्षक शिकवितांना चुकले तर देशाची संपूर्ण पिढी चुकते व यात संपुर्ण देशाचे नुकसान होते. त्यामुळे



शिक्षकाचे समाजातील स्थान हे अत्यंत महत्वाचे असून शिक्षकानी सुध्दा आपल्या शिक्षकी पेशाला धरुन तेवढयाच जबाबदारीने वागणे महत्वाचे ठरते.

आज शिक्षकांमध्ये शिक्षकांच्या कर्तव्याबद्दल किंवा त्यांचे देशाच्या पिढी घडविण्यात जे महत्त्वाचे योगदान असते त्या योगदानाबद्दल पाहिजे त्या प्रमाणात समर्पण भाव दिसून येत नाही. नोकरी करतांना मी समाज घडवतो किंवा पिढी घडविणार त्यामुळे आपली जबाबदारी समाज घडविण्यात महत्वाची आहे याचा फारसा विचार होत नसून केवळ शिक्षक म्हणून नोकरी करणे किंवा नोकरी करणारी शाळा ही जाण्यायेण्याच्या सोयीची असावी, आपले कुटूंब शहरात असावे याकडेच जास्त कल असतो. शिक्षकी पेशाविषयी आजच्या शिक्षकांमध्ये समर्पण भावाचा अभाव हा समाजाच्या दृष्टीने घातक आहे. शिक्षक जर आपल्या कर्तव्याविषयी जागरुक असेल व देत असलेल्या शिक्षणातून एक सुसंस्कृत आणि मजबूत समाज घडण्याला वेळ लागणार नाही हे शिक्षकानी नेहमी जाणून असावे.

खासदार अमर काळे यांनी जेवढे गुरुजी यांचा सहस्त्रचंद्र दर्शन सोहळयाच्या निमित्ताने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचे प्रचारक म्हणून आयोजित कार्यक्रमात त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला गुरुदेव सेवामंडळ, गुरुकुंज आश्रमाचे लक्ष्मणराव गमे, जनार्दनपंत बोथे गुरुजी,दामोधरपंत पाटील, ह.भ.प.प्रकाश महाराज वाघ, ह.भ.प. लक्ष्मणदास काळे, आचार्य श्री हरिभाऊजी विरुळकर, श्री गुलाबरावजी खवसे महाराज, सुशांत दांडगे, आशिष बिजवल, डॉ, राजाभाऊ गोथे , शिवाजी नांदगावकर, अंगदराव इथापुरे, अमोल धावसे , डॉ. संजय जेवढे व सर्व जेवढे कुटूंबिय व त्यांचे आप्तस्वकीय नातलग व गावकरी मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते.

# देवळी येथे शांतता कमिटीची बैठक

**देवळी**-गणपती उत्सव व येणाऱ्या ईद-ए-मिलाद संबंधाने येथील पोलीस स्टेशनमध्ये शांतता समितीचे सदस्य, पोलीस पाटील, गणेशोत्सव मंडळाचे आयोजक व डीजे चालक-मालक यांची बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय पोलीस अधिकारी वंदना कारखेले तर पोलीस निरीक्षक अमोल मंडाळकर यांची उपस्थिती होती. सदर बैठकीला पोलीस स्टेशनअंतर्गत एकूण ६५ शांतता समिती सदस्य, पोलीस पाटील, गणपती उत्सवाचे आयोजक तसेच डीजे चालक-मालक उपस्थित झाले होते. नुकताच देवळी-पुलगाव विभागाचा कार्यभार सांभाळणाऱ्या उपविभागीय पोलीस अधिकारी वंदना कारखेले यांचे देवळी शांतता कमिटीच्या सदस्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी माजी नगराध्यक्ष जब्बार तंवर, हजरत दिन वली ट्रस्टचे अध्यक्ष मोहम्मद शफी, अशपाक राजा सलीम कुरेशी तसेच इतर नागरिक उपस्थित होते.

# भिडी येथे एकदिवसीय कार्यशाळा

**भिडी**-महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्था, सेवाग्राम अंतर्गत ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र भिडी येथे कीटकजन्य (डेंग्यू) आजार निर्मूलन प्रकल्पांतर्गत एकदीवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी केंद्रांतर्गत आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका या आरोग्यदायी प्रशिक्षणात सहभागी झाल्या होत्या. प्रशिक्षणाचे मुद्दे, प्रकल्पाची प्रस्तावना, डेंग्यू आजाराबाबत गैरसमज व तथ्य, लोक संघटना व गंभीर संवाद आदींवर संवाद साधण्यात आला. एकदिवसीय कार्यशाळा प्रकल्प प्रमुख डॉ. अमेय धात्रक यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप च्या गणपती राजा ला निरोप

## हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत श्रींची मिरवणूक





**अमरावती/प्रतिनिधीः-** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे गणपती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अंतर्नाद क्लब, फोटोग्राफी क्लब, सोशल मीडिया क्लब तसेच विविध महाविद्यालय द्वारा अथर्व शीर्ष पठण स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, गायन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, डेकोरेशन स्पर्धा, टेक्निकल स्पर्धा अश्या रंगारंगी कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले.

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मधील अभियांत्रिकी, एमबीए, एमसीए, फार्मसी, बीएएमएस, एग्रीकल्चर, आर्किटेक्चर, नर्सिंग, बीएड महाविद्यालयाच्या प्राध्यापक विद्यार्थ्यांनी नित्यनियमाने पूजा आरती करत श्रींची मनोभावे सेवा केली.

टाळ मृदुंग, लेझिम, ढोलपथक व डीजे च्या तालावर नाचत पी.आर. पोटे पाटील ग्रुप च्या राजाला हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या चा जयघोष करत विसर्जन करण्यात आले.

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे सचिव श्रेयश पोटे पाटील यांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली. या विसर्जन सोहळयाला सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, डीन, विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खल्लार पो. स्टे. हद्दीत २२ गावात एक गाव एक गणपती

**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील २५ गावात सार्वजनिक गणपती बसविण्यात आले असून यातील २२ गावात एक गाव एक गणपती तर ३ गावात एक गाव दोन गणपती बसविण्यात आले आहेत.खल्लार, बेंबळा बु, कमालपूर, बेलोरा, वडूरा, आराळा, कसबेगव्हान, लाखनवाडी, कमालपूर तरोडा, कोतेगाव, खुर्माबाद, चिपर्डा, नालवाडा, डोंबाळा, चिंचोली शिंगणे, नाचोना, नरदोडा, मार्कडा, कोळंबी, कोकर्डा, कान्होली, शेंडगाव, उपराई या गावात सार्वजनिक गणपती बसविण्यात आले. २२ गावात एक गाव गणपती स्थापन करण्यात आलेत तर आराळा, कसबेगव्हान, कमालपूर या ठिकाणी एक गाव दोन गणपती बसविण्यात आले आहेत.


## डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अॅन्ड रिसर्च, अमरावती. (पॉलिटेक्नीक)

**AICTE/DTE/MSBTE संलग्नित**
**दुरध्वनी क्रमांकः- ९९२२६६०६६१, ८७६७४४९८६८**
Website:- www.drgitr.ac.in email: email: diplomacoordinator@drgitr.ac.in

### प्रवेश सुचना शैक्षणिक वर्ष २०२५-२६

प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रीयेत चार फे-यानंतर संस्थेमध्ये रिक्त राहीलेल्या जागांकरीता (Against CAP) प्रवेशाकरीता प्रवेश अर्ज मागविण्यात येत आहे. तरी विद्यार्थ्यांनी www.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन आपल्या DTE लॉगिनमधून ऑनलाईन अर्ज सादर करावा.

**प्रथम वर्ष / थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम (संस्था क्रमांक ११२३)**

| अ.क्र. | अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम | अभ्यासक्रम सांकेतांक | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | सिव्हील इंजिनियरींग | ११२३१९९१० | प्रथम वर्ष एस. एस. सी. ३५% गुणांसह उत्तीर्ण थेट द्वितीय वर्ष १२ वी विज्ञान (PCM)/ITI (२वर्ष) |
| २ | मेकॅनिकल इंजिनियरींग | ११२३६१२१० | |
| ३ | इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्यु, इंजिनियरींग | १९२३३७२१० | |
| ४ | कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनीयरींग | १९२३२४२१० | |

| अ. क्र. | प्रथम वर्ष प्रवेश वेळापत्रक | थेट द्वितीय वर्ष प्रवेश वेळापत्रक |
|---|---|---|
| १ | संस्थेत अर्ज वितरण व स्विकृती दिनांक ३१/०८/२०२५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० ज्या विद्यार्थ्यांना संस्थेमध्ये अर्ज करणे शक्य नाही ते विद्यार्थी www.dte.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर Against CAP प्रवेशासाठी विद्यार्थी लॉगिन मधुन अर्ज सादर करू शकतात. | संस्थेत अर्ज वितरण व स्विकृती दिनांक ३१/०८/२०२५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.००ज्या विद्यार्थ्यांना संस्थेमध्ये अर्ज करणे शक्य नाही ते विद्यार्थी www.dte.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर Against CAP प्रवेशासाठी विद्यार्थी लॉगिन मधुन अर्ज सादर करू शकतात. |
| २ | तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर करणे ०१/०९/२०२५ सकाळी ११.०० वाजता. | तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर करणे ०१/०९/२०२५ सकाळी ११.०० वाजता. |
| ३ | तात्पुरत्या गुणवत्ता यादीतील त्रुटी दूर करणे दि. ०१/०९/२०२५ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत. | तात्पुरत्या गुणवत्ता यादीतील त्रुटी दूर करणे दि. ०१/०९/२०२५ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत. |
| ४ | अंतिम गुणवत्ता यादी दि. ०२/०९/२०२५ ला सकाळी ११.०० वाजता जाहीर करण्यात येईल. | अंतिम गुणवत्ता यादी दि. ०२/०९/२०२५ ला सकाळी ११.०० वाजता जाहीर करण्यात येईल. |
| ५ | Against CAP अॅडमिशन ०२/०९/२०२५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत. | Against CAP अॅडमिशन ०२/०९/२०२५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत. |
| ६ | प्रवेश फेरी दि. ०३/०९/२०२५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत. | प्रवेश फेरी दि. ०३/०९/२०२५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत. |

**सदर Against CAP फेरीनंतर रिक्त राहीलेल्या जागांकरीता दिनांक ०४/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. परत Against CAP प्रवेश फेरी घेण्यात येईल.**

**अधिक माहीतीकरीता वेळोवेळी महाविद्यालयाच्या Website: www.drgitr.ac.in वर भेट द्यावी. संपर्क क्रमांकः- ९९२२६६०६६१/८७६७४४९८६८**
**पत्ता :- डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅन्ड रिसर्च, अमरावती. (पॉलिटेक्नीक) विद्यापीठ मार्डी रोड, अमरावती.**

**Admission Incharge(Diploma)**
**DRGIT & R, Amravati**

**Diploma Co-ordinator**
**Dr. Rajendra Gode Institute of Technology and Research Amravati.**


# स्वस्थ भारत प्रकल्पाअंतर्गत फिरत्या आरोग्य केंद्राचे लोकार्पण

## -मेळघाटात राबविणार ५० मोफत आरोग्य शिबिरे

**तिवसा/प्रतिनिधीः-** मेळघाट सारख्या दुर्गम भागात नागरिकांना तत्परतेने आरोग्य सुविधा मिळावी, या उद्देशाने भेल चे स्वतंत्र संचालक रमेश मावसकर संकल्पनेतून भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (ँथिं) तर्फे राबविण्यात येणाऱ्या 'स्वस्थ भारत प्रकल्प' अंतर्गत फिरत्या आरोग्य केंद्राचे लोकार्पण जिल्हाधिकारी परिसरात करण्यात आले.यावेळी अश्वमेध संस्थेचे अध्यक्ष यशवंत पांडे यांनी रमेश मावसकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.या आरोग्य केंद्राच्या माध्यमातून मेळघाट परिसरात ५० मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना आरोग्य शिबिराद्वारे त्यांची तपासणी करून आरोग्य सेवा सुलभ व्हावी आरोग्य विषयक जनजागृती व्हावी हा या उपक्रमाचा उद्देश आहे.



या लोकार्पण सोहळ्याला खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रताप अडसड, आमदार राजेश वानखेडे, आमदार प्रवीण तायडे, आमदार उमेश यावलकर, दिनेश सूर्यवंशी, प्रभुदास भिलावेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख तसेच इतर मान्यवर व अधिकारी उपस्थित होते.

यावेळी ँथिं चे संचालक रमेश मावसकर, समाजसेविका रेखा मावसकर, तालुका अध्यक्ष समीर हावरे, शहर अध्यक्ष मनीष मेन, एकल अभियान आचल परतवाडा चे अध्यक्ष किशोर हेकडे व त्यांचे संच प्रमुख, अश्वमेध संस्थेचे डॉ. यशवंत पांडे, स्वस्थ भारत प्रकल्पाचे समन्वयक विक्की पांडे व अनुराग उके तसेच डॉक्टरांची संपूर्ण चमू उपस्थित होती. तसेच कार्यक्रमला निवासी उप जिल्हाधिकारी अनिल भटकर यांचे सहकार्य लाभले

## महादेव जोरवर, तहसिलदार पुसद यांचे न्यायालय, पुसद

रा.मा.क्रं. ०१/टी.एन.सी.५९(३)/२०२५ २०२६
मौजा बान्सी ता पुसद जि यवतमाळ

**जाहीर प्रगटन फॉर्म नं. १२ (नियम २३)**
**मुंबई कुळ कायदा विदर्भ विभाग- १९५८ चे कलम ४८ अंतर्गत**
**सार्वजनिक सुचना-**

मुंबई कुळ कायदा विदर्भ विभाग १९५८ चे कलम ४६ व ५० अन्वये, कुळ असलेल्या जमीनीची मालकी जी त्यांना या कुळ कायद्याचे तरतुदी अनुसार खरेदी करण्याचा अधिकार आहे ती अशा कुळांना हस्तांतरीत केली जाते. आणि जेथे न्यायाधिकरणाने कलम ४८ च्या उप कलम २ व्दारे कुळाच्या संदर्भात चौकशी करणे निधीत करणे आवश्यक आहे असे कुळ-

विदर्भ कुळ कायद्याचे कलम ४६ व ५० प्रमाणे कुळाच्या वैयक्तीक बहितीत असलेली जमीन त्याला मालकी हक्काने हस्तांतरीत केली जाईल आणि कलम ४७ प्रमाणे खालील नमुद व्यक्तीचे नावे कुळाची खरेदीची किंमत निश्चीत केली जाईल.

१) संरक्षीत पटेदार उत्तंम भोजू आडे (मयत) यांचे वारस अर्जदार १. पंजाब उत्तंम आडे, २. बेबीबाई सुदाम राठोड ३. पंडीत उत्तंम आडे, ४.अनील उत्तंम आडे मयत तर्फे वारस अ) शंकुतला अनिल आडे ब) विवेक अनिल आडे, क) चंदन अनिल आडे रा. बान्सी ता पुसद जि. यवतमाळ

अ) वर नमुद सर्व अर्जदार यांचे ताबा व बहितीत मौजा बान्सी ता. पुसद जि. यवतमाळ येथिल जुना स.न. ९३ / १ नविन गट नंबर २३१ क्षेत्र ४.५७ हे. आर.

वेधील खालील नमुद परिशिष्ठ मधील शेतजमीन विदर्भ कुळ कायद्याचे कलम ४६, ४९ व ५० प्रमाणे वैज्ञानीक मालकी हकाने हस्तांतरीत केली जाईल.

ब) या बाबत गैरअर्जदार ऐकनाथ बेलप्पा वाणी रा. पुसद

क) परिशिष्ठतील शेतजमीनी मध्ये अधिकार हक्क असलेली ईतर कोणत्याही व्यक्तीस

या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, वर नमुद सर्व गैरअर्जदार अथवा त्यांचे तर्फे ईतर कोणतेही व्यक्ती यांना परिशिष्टातील मालमत्तेत अधिकार अथवा हक्क आहेत, असे सर्व व्यक्तींनी दि. ०९/०९/२०२५ रोजी न्यायाधिकरण/ तहसिल कार्यालय, पुसद यांचे समोर हजर राहण्याचे आव्हाण केले आहे. आणि न्यायाधिकरणाचे पुर्व परवानगी शिवाय कोणतीही व्यक्ती नियोजीत तारखेला तहसिल कार्यालय पुसद समोर हजर राहण्यास अपयशी ठरल्यास त्याला या प्रकरणात चौकशी बाबत काहीही आक्षेप नाही असे मानले जाईल व त्याचे अनुपस्थीतीत कार्यवाही पुर्ण केली जाईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीसद नगर परिषद पुसद तसेच तहसिल कार्यालय, पुसद व उपविभागीय कार्यालय, पुसद यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्याकरीता अग्रेषीत.

**परिशिष्टं**

| मौजा | स.न. | क्षेत्रफळ | सनावणीसाठी हजर राहण्याचे ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|---|
| बान्सी ता. पुसद १ | येथिल जुना स.न.९३/ नविन गट नंबर - २३१ | क्षेत्र ४.५७ हे. आर. | तहसिलदार पुसद यांचे न्यायालय पुसद | ११.०० वा |

**ठिकाण** - पुसद
**दिनांक** - ११.०४.०२५

**(महादेव जोरवर)**
**तहसिलदार, पुसद**

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे श्री. समीर सतीश भावे यांचे वतीने सादर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

' **मिळकतीचे वर्णन :** बेनोडा, SMR TOWER चौथ्या मजल्यावरील फ्ल्याट क्रं. ४०२, शेत सर्वे क्रं. ३३, प्लॉट क्रं.५, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे श्री. समीर सतीश भावे यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी HOME FIRST FINANCE COMPANY INDIA LTD. BR. AMRAVATI येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ बक्षीस पत्र दि. २२/०९/२०१७ रोजीचे दस्त क्र. ४११७ सदर मूळ दस्त गहाळ झालेले आहे.** तसेच सदर दस्त कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहान, पतसंस्था / राष्ट्रीयकृत / सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती.

शिक्का

आपला
अॅड.रवीद्र रु. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती
मो.नं. ९८२३६९८७४५

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.श्री.पी.के.धोंडगे ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - १८३३/२०२५**
**श्रीमती नंदा विरुध्द गैरअर्जदार नितिन**
**पुढील तारीख ०१.१०.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1) **Nanda Bhalchandra Thakare ,** Age 66 yrs., Occu.- Household R/o. Shubham Apartment-5,Jaitala ring Road Maratha Lawns, Bhausaheb Survey Nagar, Nagpur, Tq. & Dist. Nagpur

-- विरुध्द --

गैरअर्जदार : 1) **Nitin Shrikrishnarao Patil ,** Age 61 yrs., Occu.- Private Job R/o. Near Netaji Krida Kendra, Vijay Colony, Rukhmini Nagar Amravati, Tq. & Dist. Amravati

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत श्रीकृष्ण त्र्यंबकराव पाटील** हे **दि.१२.०७.२००९** रोजी नागपूर, ता.जि.नागपूर येथे व मयत कमलाबाई श्रीकृष्णराव पाटील हया ०३.०२.१९८३ रोजी नागपूर ता.जि.नागपूर येथे मयत झाले. **अर्जदार नंदा विरुध्द गैरअर्जदार नितीन** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती नंदा विरुध्द गैरअर्जदार नितीन** यांनी रा.वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २९.०८.२०२४** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.एस.बी.कळदाते,२ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - १९०८/२०२५**
**अब्दुल विरंक निरंक**
**पुढील तारीख ०८.१०.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. **अब्दुल हक अब्दुल अजिज**, वय ५७ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी
२. **अब्दुल अतिक अब्दुल अजिज चाउस,** वय ५५ वर्षे, धंदा - ऑटो ड्रायव्हर
३. **झिया उल हक अब्दुल अजिज,**वय ४७ वर्षे, धंदा - ऑटो ड्रायव्हर
४. **मोहिबुल हक अब्दुल अजिज चाउस,**वय ४१ वर्षे, धंदा - वकिल
सर्व रा. मोमिनपुरा, नविन टाउन, बडनेरा, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अब्दुल अजिज अब्दुल कादर चाउस व नूरजहा बी अब्दुल अजित चाउस हे अनुक्रमे दि.०४/०६/२०१९ व ०५.०१.२०२५ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार अब्दुल हक अब्दुल अजिज व इतर यांनी** वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अब्दुल हक अब्दुल अजिज व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २९.०८.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

## जाहीर नोटीस
### विद्यमान ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

एम.जे.सी नं.१५४३/२०२५ ने.ता.०९/०९/२०२५

अर्जदार - **1. Sau. Diksha Sarang Hirode**
Age 36 yrs, Occu-Housewife
R/o. Flat no. 139, Building no.5 near Shell Petrol Pump, Soba Puram, Pune City P.O., Warje, District Pune

विरुध्द

गैरअर्जदार - **1. Akash Bhaskarrao Munde**
Age 38 yrs, Occu-
**2. Asha Bhaskarrao Munde**
both 1 & 2 R/o. Near Rajiv Gandhi School Nursing Saraswati Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३८३ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत भास्करराव नामदेवराव मुंडे यांचे निधन दिनांक ३१/१०/२०२३ रोजी अमरावती येथे झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर उत्तराधिकारी आहेत व इतर कोणीही मय्यतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आंत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकिला मार्फत वि दिवाणी न्यायाधिश क.स्तर अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.श्री.ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - १८४२/२०२५
शुभांगी अधिक तीन विरुध्द निरंक
पुढील तारीख २३.०९.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. शुभांगी संतोष अस्वार, **वय ४५ वर्षे, धंदा - गृहिणी**
२. पूर्वा संतोष अस्वार, **वय १५ वर्षे, धंदा - शिक्षण**
३. श्रावणी संतोष अस्वार,**वय १३ वर्षे, धंदा - शिक्षण**
**अर्जदार क्र.२ व ३ तर्फे अ.पा.क. आई**
**अर्जदार क्र.१ तिघेही रा. हनुमान मंदिर जवळ, जुनी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती**
४. अनुसया रामदास अस्वार, **वय ८० वर्षे, धंदा - गृहिणी**
**रा. शनिवार वाडा, मोठी मंडी, ता.अकोट,जि.अकोला**

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत संतोष रामदास अस्वार हे दि.२०/०६/२०२५ रोजी आकोट, ता.आकोट, जि.अकोला येथे मयत झाले. अर्जदार शुभांगी अधिक तीन विरुध्द निरंक यांनी **वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** [illegible] **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **शुभांगी अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २०.०८.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.श्रीमती एन.सी.सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - १६८५/२०२५
श्रीमती मंगला अधिक दोन विरुध्द निरंक
पुढील तारीख ११.०९.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. श्रीमती मंगला गजानन कोल्हे, **वय ६९ वर्षे, धंदा - घरकाम मो.- ९९३०१०७१६४**
२. आनंद गजानन कोल्हे, **वय ४८ वर्षे, धंदा - नोकरी,मो.- ९८३३६१८९४२**
**नं.१ व २ कायम रा. बसवेश्वर चौक, सातखिराडी रोड, अमरावती, ता.जि.अमरावती**
**ह.रा.पारसीक नगर, खारेगांव, राज पार्क समोर, कळबा, ठाणे**
३. सौ.दिपा राहुल होनराव, **वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम,मो.नं.- ९८८१३१२६२६**
**रा.नं.२०, हमेरोल्ड रेसिडेन्सी, सखाराम किर मार्ग, माहिम, शिवसेना भवन जवळ, व्हीटीसी, मुंबई**

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत गजानन शंकरआप्पा कोल्हे, हे दि.१९/०५/२०२५ रोजी ठाणे, ता.जि.ठाणे येथे मयत झाले. अर्जदार मंगला अधिक दोन विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** [illegible] **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्रीमती मंगला अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ११.०८.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.एस.बी.कळदाते, २ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - १७२३/२०२५
कमला विरुध्द निरंक
पुढील तारीख २२.०९.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. कमला चिंतामण सांभारकर, **वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम**
२. सुजाता अनिल भिवसने, **वय ४१ वर्षे, धंदा - नोकरी,**
३. सचिन चिंतामन सांभारकर, **वय ३९ वर्षे, धंदा - नोकरी**
४. प्रविण चिंतामन सांभारकर, **वय ३७ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी**
**सर्व रा.संजय गांधी नगर नं.२, रुक्मीणी नगर, अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत चिंतामण धनुजी सांभारकर हे दि. १८/१२/२०२२ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार कमला चिंतामन सांभारकर व इतर यांनी **वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** [illegible] **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **कमला चिंतामन सांभारकर व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २९.०८.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.श्री.पी.के.धोंडगे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - १६८४/२०२५
श्रीमती सुनिता विरुध्द निरंक
पुढील तारीख ०३.०९.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :- १.सुनिता गजाननराव नांदूरकर
**वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम**
**रा. हनुमान नगर, अमरावती**
**ता.जि.अमरावती- ४४४६०१, मो.- ७७७५०४२८१६**

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत कमला साहेबराव डवरे हया दि.२०/०९/२०२१ रोजी अमरावती,ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार सुनिता विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** [illegible] **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्रीमती सुनिता विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०८.०८.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.एस.बी.कळदाते, २ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - १८५६/२०२५
संगिता विरुध्द निरंक
पुढील तारीख २६.०९.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. संगिता बबनराव भटकर, **वय ५५ वर्षे, धंदा - नोकरी**
**रा.सी/ओ बबनराव भटकर, हाउस नं. २६२५, अकोली रोड, चंदन नगर, साईनगर, अमरावती**
२. रावसाहेब रामकिष्ण ठाकरे, **वय ५० वर्षे, धंदा - नोकरी,**
**रा.दत्ता पुरा पारडी बबनराव भटकर, अमरावती**
३. सौ.दिपा राहुल होनराव, **वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम,मो.नं.- ९८८१३१२६२६**
**रा.नं.२०, हमेरोल्ड रेसिडेन्सी, सखाराम किर मार्ग, माहिम, शिवसेना भवन जवळ, व्हीटीसी, मुंबई**

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- [illegible]

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत नानीबाई महादेवराव दाने, हे दि.२७/११/२०१४ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार संगिता बबनराव भटकर व इतर यांनी **वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** [illegible] **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **संगिता बबनराव भटकर व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २९.०८.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

## ( C.J.J.D.) मा.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

कि.आर.एम.जे.सी.अर्ज क्र.२३४/२०२५ ने.ता.२५.०९.२०२५

मनोरमा // वि //निरंक

१. मनोरमा सुरेश पतंगराय
२. मिलीद सुरेश पतंगराय
३. नितिन सुरेश पतंगराय
**अ.क्र.१ ते ३ रा.अडगाव बुजरंग, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**
४. सविता ज्ञानेश्वरप्पा घोलू,
**रा.सरसी,गा ब्राम्हणवाडा, गोविंदपुर,ता.जि.अमरावती**
५. अलका ज्ञानेश्वर एजापुरे, **रा.सातारगाव, ता.अमरावती, जि.अमरावती**
६. प्रतिभा अश्विन काटेकर, **रा.नवीन आष्टी, ता.आष्टी, जि.वर्धा**

// वि // निरंक

**ज्याअर्थी** सुरेशआप्पा यसाआप्पा पतंगराय यांचा मृत्यू दि.१८.०६.२०२० रोजी अडगाव बु.,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला असून ते तेथीलच मुळ रहिवासी होते. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशिर वारस आहेत. **करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.**

**त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी** १०.३० **वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.**

आज दिनांक १८ ऑगस्ट मे २०२५ **रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र. बी-५०,सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय,रेल्वे पुलाजवळ राजकमल चौक अमरावती ४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३५७**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@ymail.com

# शेत मालावरील आयात शुल्क कपातीचा शेतकऱ्यांकडून निषेध

**कुऱ्हा/ वार्ताहर**

सरकारने विदेशातून शेतमाल आयात करण्याच्या प्रकीयेत आयात शुल्क शुन्य पर्यंत कमी केला आहे.तसेच कापूस, सोयाबीन तेल,तूर वरील आयात शुल्कात शुन्यापर्यन्त कमी करून व्यापारी समुदायास खुष करीत शेतकऱ्यांचे दुःखात भर घातली आहे.देशातील शेती मालाच्या किमती कमी करण्याचे कुटील खेळाचा जाहीर निषेध करून भविष्यात येणारे कठीण अवस्थेबाबत महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या नेतृत्वात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी,भारत सरकारास तहसीलदार तिवसा यांचे मार्फत निवेदन देण्यात आले.

सरकार (एम एस पी) मार्फत शेतीमालाचे किमान हमीभाव निश्चित करते,परंतु तो मिळेल याची उपाययोजना मात्र करीत नसल्यामुळे,हमीभाव पेक्षा ५००ते१००० रककमी दराने विक्री करावी लागते. या सोबतच या वर्षी जुलै ,ऑगस्ट महीण्यात झालेल्या अती ढगफुटी सदुष्य पावसामुळे संत्रा मोसंबी,लिंबू,तूर इत्यादी पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे.त्यात मुख्य नगदी पीक म्हणून सोयाबीन पिकांकडे शेतकरी वळला असतांना ऑगस्ट मधेच तिवसा तालुव-यात सोयाबीन पीक एकाएकी पिवळे पडून हजारो एकर जमीन वरील प्रामुख्याने नर्मदा गोल्ड, ग्रीन गोल्ड,उत्तम,रवी, दिव्यरत्न , इगल , बंन्सल , ओसवाल , सिध्दार्थ इत्यादी सोयाबीन बिज उत्पादन कंपनीचे ९३०५ ह्या वानाचे वर मोठी लागण झाली आहे,याची शासनाने प्रत्यक्ष पाहणी करून मदत देण्याची




आग्रही मागणी करीत आहे.

पीक विमा मधील नियमाची शेतकऱ्यांना माहीती होण्या करीता गावाचे दर्शनीभाग, ग्रामपंचायत, शासकीय कार्यालये,रेल्वे व बसस्थानक ठळक पणे माहीती फलक प्रदर्शित करावे. २) सर्व शेतीमाला करीताआधारभुत किमतीचा कायदा करावा.३) शेती मालावरील आयात शुल्कात केलेली कपात बंद करून त्यात वाढ करावी.४) ई..पीक पाहणी शासनाने करावी.५)अती पावसामुळे संत्रा,मोसंबी,निंबु याची झालेली?फळ गळ,कापुस, सोयाबीन,तूर इत्यादी पिकाचे झालेल्या नुकसानीसाठी आर्थिक सहकार्य करावे.

निवेदन देण्या साठी खालील शेतकरी सहभागी झाले.चंद्रकांत वडस्कर,प्रकाश सोनोने,मनोहर वाढोणकर, राजाभाऊ बाभुळकर, जितेंद्र कोरडे संजय गोरडे, रामकुष्ण वाटकर,दिलीप गोहत्रे अंबादास जुवारे , हर्षल साबळे, विक्रांत होले, सागर पुनसे, शंकरराव उमप ,केशव डाखोरे ,आदित्य बकाल, आशिष खारोडे, शामराव मानकर ,अनिल मुंदाने ,सरफराज पठाण, दशरथ बडवाईक, राजेंद्र साबळे, श्रीकृष्ण लांजेवार ,विजय डेहणकर, ज्ञानेश्वर राऊत,कमलाकर आखरे , शंकरराव उमप, युवराज ठाकुर, अवधूत शिरपुरे, गिरीधर राऊत, गजानन वसुले,प्रकाश पळसकर यांचे-सह नुकसान ग्रस्त शेतकरी प्रामुख्याने उपस्थित होते.

# म. ज्योतिबा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन

**अमरावती/ का.प्र.**

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्या लयाच्या शारीरिक शिक्षण विभागाद्वारे नुकताच महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्या लयाच्या प्राचार्य डॉ. मीनल ठाकरे भोंडे, प्रमुख अतिथी दिलीप पाटील, माजी उपायुक्त, विक्रीकर विभाग, प्रा. शशिकांत येवतकर, कार्यकारणी सदस्य, अस्मिता शिक्षण मंडळ अमरावती, विशेष उपस्थिती प्रा. डॉ. मुकुल भोंडे, सचिव, अस्मिता शिक्षण मंडळ अमरावती, या कार्यक्रमाचे आयोजक प्रा. डॉ. श्रीधर धाकुलकर,संचालक, शारीरिक शिक्षण विभाग हे व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना दिलीप पाटील यांनी मॅरेथॉन ची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून सांगून मानवी जीवनात शारीरिक स्वास्थ्याचे महत्व अधोरेखित केले.अलीकडच्या काळात संपत्ती कमवण्याच्या अति नादात शारीरिक स्वास्थ्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होते व एकदा गमावलेले स्वास्थ्य संपतीनेही कमविता येत नाही. म्हणून प्रथम प्राधान्य आरोग्याला देण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. प्रा. शशिकांत येवतकर यांनी आपल्या मनोगतातून पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांनी प्रत्येकच खेळ हा महत्त्वाचा असून खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्व गुण वाढीस लागत असून हा उत्साह केवळ क्रीडा दिनापुरता मर्यादित न ठेवता त्यात सातत्य ठेवावे. संगीत क्षेत्रात ज्याप्रमाणे सातत्यासाठी रियाज महत्वाचा असतो त्याचप्रमाणे खेळांमध्येही जर सातत्य असेल तर महत्वाचे ठरते. प्रमुख पाहुणे उपायुक्त दिलीप पाटील यांच्यापासून



विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

क्रीडा दिनानिमित्त महाविद्यालयात विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या या स्पर्धांमध्ये विजेता ठरलेल्या प्रणव बेंदरकर नेतृत्वातील गटाला मान्यवरांच्या हस्ते पदके देऊन गौरवण्यात आले. नुकताच आट्यापाट्या खेळात शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित श्री सर्वेश मेन याचा मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.सर्वेश मेन हा गेल्या दहा ते पंधरा वर्षापासून शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक प्रा. डॉ. धाकुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आट्यापाट्याचे प्रशिक्षण घेत आहेत.त्याला प्राप्त झालेल्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारामध्ये तीन लाख रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र महाराष्ट्र शासनाद्वारे देऊन त्याला गौरविण्यात आले होते. महाविद्यालयातील अनिकेत चोरे आणि यश ननावरे यांची २०२४ - २५ या सत्रात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अनुक्रमे सॉफ्टबॉल व बेसबॉल या चमुत निवड होऊन त्यांनी अनुक्रमे विक्रम सिम्हापुरी यूनिवर्सिटी नेल्लोर आंध्र प्रदेश व श्री जगदीश प्रसाद झबारमल युनिव्हर्सिटी झुनझुन , राजस्थान येथे अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केल्याबद्दल प्रा.डॉ. श्रीधर धाकुलकर यांच्या वतीने स्व. डॉ. रामरावजी धाकुलकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ रोख पारितोषिक देऊन त्यांना गौरविण्यात आले. महाविद्यालयात रॅगिंग विरोधी जनजागृती सप्ताह अन्तर्गत ज्या विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने विविध उपक्रमाद्वारे सहभाग घेतला त्यांचे कौतुक मान्यवरांच्या हस्ते याप्रसंगी करण्यात आले.

ज्यामध्ये नंदिनी रवाले, आकाश गौड ,उर्वशी अंभोरे, श्रवण नागपुरे आणि कृष्णाई बोबडे यांना भेटवस्तू देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. प्रास्ताविकातून कार्यक्रमाची पार्श्वभूमी प्रा. डॉ. श्रीधर धाकुलकर संचालन प्रा. डॉ. बबीता येवले, राज्यशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. जगन्नाथ इंगोले यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व खेळाडू विद्यार्थी उपस्थित होते.

## वलगाव ते मार्की रस्त्याची दुर्दशा कायम

**टाकरखेडा संभू-**अमरावती मार्गे परतवाडा–धारणी या महत्त्वाच्या महामार्गावर वलगाव ते मार्की फाटा दरम्यान प्रचंड मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवाशांचे हाल सुरू आहेत. चार ते पाच फूट खोल खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना धोका निर्माण झाला असून पावसाच्या पाण्यामुळे खड्डे न दिसल्याने वारंवार अपघात होत आहेत.पूर्णानगरचे उपसरपंच उमेश महिंगे यांनी याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाला वारंवार पत्रव्यवहार करून लक्ष वेधले. १५ ऑगस्ट रोजी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर विभागाने लेखी आश्वासन देऊन काही प्रमाणात खड्डे बुजवले. परंतु काही दिवसांतच काम थांबले असून मशीनरी व मजूर रस्त्यावरून गायब झाले आहेत.

# छावा नाट्याची शौर्य गाथा युवकांसाठी प्रेरणादायी- पालकमंत्री

## शिवरायांचा छावा समूह नाट्याचे थाटात उद्घाटन

**अमरावती/ का.प्र.**

छत्रपती संभाजी राजे याच्या जीवन कार्य कर्तृत्वावर आधारित शिवरायांचा छावा हे समूह नाट्य युवकांसाठी शौर्य गाथा असल्याचे प्रतिपादन राज्याचे महसूल तथा पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. ते श्री. अष्टविनायक गणपती महोत्सव समिती द्वारा आयोजित शिवरायांचा छावा या समूह

नाट्याच्या स्थानिक संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन मध्ये आयोजित उदघाटन प्रसंगी उपस्थित होते.सदर बहूचर्चीत छावा नाटकाचे उदघाटन राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. चंद्रशेखर बावनकुळे यांचे हस्ते थाटात पार पडले. याप्रसंगी, प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रवीण तायडे,आ. राजेश वानखडे,आमदार प्रभुदास



भिलावेकर,खासदार डॉ. अनिल बोडे, रविराज देशमुख,डॉ. नितीन धांडे, प्रकाश साबळे, सुदर्शन गांग, तुषार भारतीय, युवा गजल सम्राट अभिजित पडोले, नितीन गुढदे आदी मान्यवर उदघाटन प्रसंगी व्यास पिठावर उपस्थित होते.महाराज शंभु छत्रपती प्रोडक्शन पुणे निर्मित शिवरायांचा छावा या नाटकाचे लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते शिवशंभुशाहीर श्रीमंत महेंद्रराजे महाडिक यांचा सत्कार पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थित मान्यवरांच्या समवेत केला. अमरावतीकर रसिकांचा पहिल्या प्रयोगाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.५ सप्टेंबर पर्यंत दररोज सायंकाळी ६ वा. श्री. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात छावा नाट्य समूह नागरिकांनी परिवार सह पहावे असेही आवाहन पालकमंत्री ना. बावनकुळे यांनी उदघाटन प्रसंगी केले.

छावा या इतिहास कालीन उत्कृष्ट नाट्य समूहाचे अंबा नगरीत आयोजन केल्याबद्दल आयोजन समितीचे अध्यक्ष नानासाहेब बोके,उपाध्यक्ष दिलीप निंभोरकर, प्रकाश घाटे,हरीश मोहोड, जे. बी. सदार, सुरेखा लुंगारे, जगदीश गोवर्धन, प्रशांत विघे,आशिष देशमुख, नितीन टाले, कांचन उल्हे, वैशाली विधने,

# धामणगाव तालुक्यात सततच्या पावसामुळे पिकांचे नुकसान

## तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**कुऱ्हा/ वार्ताहर**

धामणगाव तालुक्यामध्ये सततच्या पावसामुळे शेती पीकाचे अतोनात नुकसान झाले.सोयाबीन,तूर,कपाशी संत्रा, मोसंबी विविध पिकाची नुकसान झालेले आहे. अति पावसामुळे नाले बंधारे फुटून शेतकऱ्यांचे बांधे फुटले.विहिरी खसल्या जमिनी खरडून गेल्या. त्यामुळे शेतकऱ्यांची खूप नुकसान झालेले आहे याची भर कधी न निघणारी आहे यासाठी तहसीलदार साहेबामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

संत्रा मोसंबी फळे पिवळे होऊन गळत आहेत.त्यामुळे फळबागेची सुद्धा पंचनामे करावे,फळबागेला हेक्टरी १ लाख रुपयाची मदत देण्यात यावी,विरुळ रोघे शिवार ते अंजनसिंगी शिवारा पर्यंत विदर्भ नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करून शेतकऱ्यांच्या होणारा नेहमीचा पुरामुळे नु-



कसान टाळण्यासाठी संबंधित यंत्रणेला अवगत करावे, तसेच विरुळ रोंघे येथे उन्हाळ्यामध्ये चुकीच्या पद्धतीने कोल्हापुरी बांधारा बांधल्या मुळे हजार हेक्टर शेती खरडून गेली आहे, त्याचे तात्काळ पंचनामे करून भरीव मदत शेतकऱ्यांना देण्यात यावी, संबंधित यंत्रणेवर कारवाई करावी असे निवेदनात म्हटले आहे.यावेळी तालुक्यातील असंख्य शेतकरी उपस्थित होते.तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष पंकज वानखडे, तालुका काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष विठ्ठल सपाटे, खरेदी विक्रीचे संचालक मुकेश राठी, राजा भोगे, संजय शेंडे,शहर युवा काँग्रेस कमिटी अध्यक्ष आशिष शिंदे, समीर पाटील, नंदू चौधरी, प्रकाश मते, ओम प्रकाश हरवानी, अमोल कडू, बंडू सपाटे, अनिल राजनकर, घनश्याम शेलोकार, पंकज ठाकरे, अक्षय दुर्गे, विजय थोटे, दिवाकर ठाकरे, योगेश सोनवणे, दादारावजी तुपट, प्रकाश गुल्हाने, मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

००००

# धामणगाव रेल्वे येथे इको फ्रेंडली गणेश उत्सव

**धामणगाव रेल्वे /वार्ताहर**

माझी वसुंधरा अभियान ६.० स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व शासनाने दिलेल्या वेळोवेळीच्या निर्देशांनुसार मुख्याधिकारी पुनम कळबे याच्या मार्गदर्शना खाली नगर परिषद धामणगाव रेल्वे अंतर्गत या वर्षी इको फ्रेंडली गणेश उत्सव साजरा करण्यात येत आहे. त्या करिता नगर परिषद मार्फत विविध स्पर्धेचे आयोजन नगर परिषद मार्फत करण्यात आलेले आहे. या करिता विविध आकर्षक बक्षीसे सुद्धा न. प. मार्फत ठेवण्यात आलेले आहे.या मागील उद्देश एकमेव हाच आहे कि गणेश उत्सव हा पर्यावरण पूरक व प्लास्टिक मुक्त व्हावा.मंडळाने आपल्या इको फ्रेंडली गणेश




मंडळा तर्फे जास्तीत जास्त वृक्षारोपण कसे करता येईल व पर्यावरनाला कशी मदत करता येईल याकडे नागरिकांनी वळायला पाहिजे या करिता वृक्ष नगर परिषद मार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**इको फ्रेंडली गणेश उत्सव स्पर्धा**

यामध्ये पर्यावरण पूरक संदेश देणारे सजावट,शाडू मातीपासून तयार केलेली मूर्ती, पूजेचे निर्मल्य नदी पात्रात न टाकता निर्माल्य कळश मध्ये टाकणे, कचरा विलगीकरण,वृक्षारोपण करणे कमीत कमी २० वृक्षारोपण व माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत कमीत कमी १० ई-शपथ घेणे तसेच बाप्पा चे विसर्जन शक्य तो घरीच करणे पर्यायी व्यवस्था म्हणुन कृत्रिम तलावात विसर्जन करणे या सर्व विषयाच्या आधारे गुणांकन नगर परिषद ठरवणार आहे या सर्व केलेल्या बाबीचा व्हिडीओ किंवा फोटो

## पर्यावरण पूरक व प्लास्टिक मुक्तीचा देत आहे संदेश

८६६८५४९९५९ या क्रमांकावर पाठवायचे आहे.नागरिकांनी या मध्ये सहभाग नोंदवावा असे आवहान नगर परिषदेने केलेले आहे.

**इको फ्रेंडली गणेश विसर्जन स्पर्धा**

दत्तापूर येथील हिंगलाज माता मंदिरा जवळ कृत्रिम तलाव तयार करण्यात आलेला आहे तसेच धामणगाव परिसरात राठी नगर येथील साई मंदिरा जवळ कृत्रिम तलाव तयार करण्यात आले आहे. त्यामध्ये पर्यावरण पूरक बप्पा चे विसर्जन करण्याचे आवहान नगर परिषदेने केलेले आहे.

या करिता लकी ड्रा स्पर्धा सुद्धा आयोजित केलेली आहे.सदर कुंडामध्ये विसर्जन करणाऱ्या प्रत्येक परिवाराला नगर परिषदे तर्फे प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे तसेच लकी ड्रा मध्ये प्रत्येकी ३ आकर्षक बक्षीस सुद्धा ठेवण्यात आलेले आहे.

**शहरात फिरणार अमृत निर्माल्य कलश**

आपण दररोज हार फुल घेऊन बापा चे मनोभावाने पूजा करितों पूजे करिता लागणारे निर्माल्य चे रूपांतर कचरेत होऊ नये न ते पाण्यामध्ये विसर्जित करून जल प्रदूर्षण होऊ नये करीता धामणगाव शहरात निर्माल्य कलश फिरणार आहे.यामध्ये आपल्याकडे असलेले निर्माल्य टाकावे व पर्यावरणाला मदत करावी असे आवाहन सुद्धा न.प. तर्फे करण्यात आलेले आहे.

यापासून अगरबत्ती बनवण्याचा निर्धार नगर परिषदेचा आहे.

# संक्षिप्त

## ‘विश्वबंधुत्व’ दिनानिमित्त विद्यापीठात कवी केशवसुत काव्यस्पर्धा

**अमरावती** -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे येत्या ११ सप्टेंबर २०२५ रोजी ‘विश्वबंधुत्व’दिनाच्या औचित्याने ‘कवी केशवसुत काव्यस्पर्धा’ आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये काव्यलेखन आणि सादरीकरणाची आवड वाढविणे, त्यांना आपली प्रतिभा सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि मराठी भाषेच्या समृद्ध काव्यपरंपरेशी त्यांचा संवाद घडवून आणणे, हे होय.या स्पर्धेत विजेते ठरलेल्या स्पर्धकांसाठी आकर्षक रोख बक्षिसांची तरतूद करण्यात आली असून प्रथम क्रमांकासाठी तीन हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी दोन हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी दीड हजार रुपयांचे पारितोषिक व स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे. याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना विद्यापीठाकडून प्रमाणपत्र दिले जाणार आहे.कवी केशवसुत काव्यस्पर्धा गुरुवार, ११ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात पार पडणार आहे. स्पर्धेविषयी अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. माधव पुटवाड ९४२३७५०६०२ व अभिजित इंगळे ८४२१९५८२७९ यांना संपर्क करता येईल.

## वाचनालयात शिवराम राजगुरू जयंती

**तिवसा-**येथील श्री राजर्षी शाहु महाराज सा. वाचनालयामध्ये महान क्रांतिकारक,हुतात्मा शिवराम राजगुरू यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी अंकुश देशमुख व दिपक धानोरकर यांच्या हस्ते यांचे प्रतिमेचे पुजन करून हारार्पण करण्यात आले.कार्यक्रमाला उपस्थित असलेले सौरभ इंगळे, सचिन काळे,अक्षय देशमुख,,प्रगती ठाकरे, पायल ढेवले, अंकुश केवदे,प्रिया डहाके, रुपाली राऊत, रोशन डगवार, विशाल गडलिंग, तेजस्वी ठाकरे यांनी प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन केले.

## ‘एकात्म मानववाद ’विषयावर व्याख्यान




**खल्लार-** छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय,आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निर्देशनानुसार पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्मक मानववाद विचार विशद करणाऱ्या व्याख्यानांना ६० वर्षे पूर्ण होत आहे. या हिरक महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाविद्यालयांमध्ये एकात्मक मानववाद व्याख्यान पार पडले.

व्याख्यानाचे अध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ.रविंद्र इचे यांनी याप्रसंगी सांगितले की, युवा वर्गाच्या सक्षम व प्रभावी सहभागावर सामर्थ्यशाली राष्ट्राची निर्मिती अवलंबून असते युवा वर्गास त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देणे व त्यांना राष्ट्र निर्माण कार्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे.सर्व पिढ्या आणि काळासाठी एक रोड मॅप आहे हे तत्व प्रथम पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडली एक प्रकारचे सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय तत्वज्ञान आहे जे भारतीय दृष्टिकोन वापरून जागतिक समस्या उपाय देते असे प्रतिपादन केले. व्याख्यानाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. भारत कल्याणकर यांनी सांगितले की, आपल्या संपूर्ण व्यवस्थेचे केंद्र मानवाचे केंद्र असले पाहिजे त्यांचा आत्मा मानववाद या तत्त्वज्ञानानुसार भौतिक साधने हे मानवी आनंदाचे एकमेव साधन नाही केवळ भौतिकवाद मानवाच्या सर्व समस्या सोडवू शकत नाही अध्यात्म आणि भौतिकवाद यांचा मेळ घालण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले. व्याख्यानाचे आयोजन सूत्रसंचालन प्रास्ताविक, आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.आशिष काळे यांनी केले या व्याख्यानाला डॉ.प्रविण सदार डॉ. हरिष काळे, डॉ.सुवर्णा जवंजाळ शिक्षकेतर कर्मचारी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शालेय जिल्हास्तरीय बुद्धिबळ व कॅरम स्पर्धेत विद्यार्थ्यांचे सुयश

**अमरावती**-जिल्हा क्रीडा संकुल अमरावती विभागातर्फे घेण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत इयत्ता वर्ग सहावीचे विद्यार्थी अक्षदा गजेंद्र पारतवार व आदित्य रवींद्र उचितकर तसेच कॅरम स्पर्धेत वर्ग आठवीची विद्यार्थिनी तनवी धामणकर या



सर्वांनी घवघवीत यश संपादन केले. स्पर्धेत झालेल्या सहा फेरीपैकी पाच फेरीमध्ये त्यांनी अग्रेसर राहून यश संपादन केले.पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल चे प्राचार्य सचिन दुर्गे व उपप्राचार्या सोनल निस्ताने व सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## जीर्ण रेल्वे उड्डाणपुलाच्या सौंदर्यीकरणासाठी
# तब्बल अडीच कोटींची उधळपट्टी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील राजकमल आणि जयस्तंभ चौक ते रेल्वे स्थानक, हमालपुरा मार्गाला जोडणारा महत्त्वाचा रेल्वे उड्डाणपुल सध्या गंभीर संकटात आहे. स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये पुलाची जीर्ण स्थिती समोर आल्यावर तडकाफडकी वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे या मार्गावरून दररोज ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठा फेरा घालावा लागत असून इर्विन चौक ते राजापेठ मार्गावरही वारंवार भीषण वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. यानंतर नागरिकांमध्ये संताप वाढला आहे, कारण पुलाची स्थिती गंभीर असताना सार्वजनिक बांधकाम विभागाने उड्डाणपुलाचे फक्त सौंदर्यीकरण करण्यावर अंदाजे २ ते २.५ कोटी रुपये खर्च केले. शहर काँग्रेसने या निधीच्या उपयोगावर प्रश्न उपस्थित केले आहेत.

**जनआंदोलन उभारणार-** शहर (पान २ वर)

### तर मग सौंदर्यीकरण का? : काँग्रेसचा सवाल-

जीर्ण उड्डाणपुलावर सौंदर्यीकरणासाठी निधी खर्च करण्यामागील उद्देश काय होता?, निधी कोणत्या स्त्रोतातून प्राप्त झाला?, निविदा प्रक्रिया कशी राबवण्यात आली?, कंत्राट कोणत्या कंत्राटदाराला देण्यात आले?, प्रकल्पाची एकूण अंदाजित रक्कम किती होती?, सौंदर्यीकरणाचे काम पूर्ण झाले आहे का, आणि त्यामध्ये कोणती कामे समाविष्ट आहेत? उड्डाणपूल जीर्ण असताना सौंदर्यीकरण का करण्यात आले? असे प्रश्न काँग्रेसने उपस्थित केले आहे.

# मुख्य मार्गावर जाम, पर्यायी मार्गाची आवश्यकता
## इर्विन चौक ते राजकमल रस्त्यावर वाहनांची गर्दी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील इर्विन चौक ते राजकमल मार्गावर सकाळपासूनच वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. यामागील मुख्य कारण म्हणजे राजकमल–रेल्वे उड्डाणपुल बंद असणे. या मार्गावर दररोज रुग्णवाहिकांची वर्दळ असते; पण शनिवारी काही रुग्णवाहिका तासन्तास अडकल्या आणि रुग्णांच्या जीवाला थेट धोका निर्माण झाला.

उड्डाणपुल बंद असल्याने संपूर्ण वाहतूक मुख्य रस्त्यावरूनच चालते. त्यामुळे दोनचाकी आणि चारचाकी वाहनचालकांना मार्ग काढताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वाहनांचा प्रचंड ताफा आणि रस्त्यावरील गर्दीमुळे नागरिकांचे वेळेवर गंतव्यस्थानी पोहोचणे कठीण झाले आहे.

**नागरिकांचा संताप, पर्यायी मार्ग द्या-** 'उड्डाणपुल दुरुस्तीसाठी बंद ठेवणे योग्य आहे, पण पर्यायी मार्गाची सोय (पान २ वर)

# गिट्टीच्या ढिगाऱ्यामुळे अक्षय इंगळेचा मृत्यू
## दोषी अधिकारी व कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी



**अकोला/प्रतिनिधीः-** अकोला–अकोट महामार्गावरील महावितरण उपकेंद्र, चोहोट्टा बाजार कार्यालयासमोर झालेल्या दुर्दैवी अपघातात चोहोट्टा बाजार येथील रहिवासी अक्षय गजानन इंगळे (वय २३) या तरुणाचा मृत्यू झाला. हा अपघात गुरुवारी रात्री आठ वाजता घडला. कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे सदर अपघात घडला असल्याचा आरोप होत असून याप्रकरणी कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी जोर धरत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, अकोला - अकोट महामार्गावरील चोहोट्टा बाजार या उपकेंद्राच्या अंतर्गत रस्त्याचे काम महावितरणाच्या स्थापत्य विभागाच्या निगराणीखाली सुरू आहे. सदर (पान २ वर)

### कार्यकारी अभियंता अनभिज्ञ ?

या संपूर्ण प्रकाराबाबत महावितरण स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता शशांक पोंगसे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की त्यांना या अपघाताबाबत काहीही माहिती नाही. तर या प्रकरणात कंत्राटदार आणि वाहनचालक या दोन्ही बाजूंची पडताळणी केल्याशिवाय भाष्य करणे कठीण आहे असे ते म्हणाले.

गुरुवारी रात्रीच्या सुमारास सदर अपघात घडला असून यामधील जखमीचा मृत्यू झाला आहे. शव विच्छेदन अहवाल आल्यावर तसेच नातेवाईकांचे जबाब नोंदवून पुढील कारवाई करण्यात येईल.

-सुरेंद्र ठाकरे,
पोलिस निरीक्षक, दहीहंडा पोलिस स्टेशन

# रुग्णांच्या जेवणात अळया व सोंडे
## दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयातील भोंगळ कारभार

### कारवाई होणार का?



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ भरती असलेल्या रुग्णांना प्रशासनामार्फत मोफत जेवण दिले जाते. मात्र शनिवार (दि.३०) दुपारी अनेक रुग्णांच्या भाजीमध्ये चक्क अळया व सोंडे निघाल्याने प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. तसेच भरती रुग्णांना निकृष्ट जेवण देता का ? असा संतप्त प्रश्न रुग्णांच्या नातेवाईकांनी केला आहे.

दर्यापूर येथिल उपजिल्हा रुग्णालयात (पान २ वर)

भाजीत अळ्या व सोंडे निघाल्यामुळे थेट वैद्यकीय अधिक्षकांच्या दालनात जाऊन डब्यातील अळ्या, सोंडे असलेली भाजी दाखवली. त्यानंतर जेवण पुरविणाऱ्या महीलेने मला दम देत अरेरावी केली आहे. मात्र रुग्णालय प्रशासनाने तातडीने दखल न घेता उडावाउडवीचे उत्तरे देत नुसता वेळकाढू पणा केला.

**-मिना वाकपांजर,** रुग्ण नातेवाईक महीला

भाजीत अळ्या निघाल्याचे एका महीलेने निर्दशनास आणून दिले आहे. पंचनामा करून जेवण पुरविणारा कंत्राटदार अमित गोंडचोर यांना तातडने नोटीस देण्यात येईल. तसेच पुढील कारवाईसाठी वरिष्ठांना अहवाल सादर करणार. **-डॉ. गुणवंत जढाळ, वैद्यकीय अधिक्षक** उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर

# हॉटेल सुरूची बारवर दरोडा टाकणारे जेरबंद
### गुन्हे शाखेची कामगिरी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील हॉटेल सुरूची बार अँड रेस्टॉरंटवर झालेल्या दरोड्याच्या प्रकरणी अमरावती गुन्हे शाखेने धडाकेबाज कारवाई करत आरोपींना जेरबंद केले आहे.

माहितीनुसार, २९ ऑगस्ट रोजी रात्री आरोपी आशीष मकेश्वर, सिद्धार्थ वानखडे, तेजस देशमुख, सागर खिराडे आणि त्यांच्या चार साथीदारांनी बारचे गेट तोडून आत प्रवेश केला. त्यांनी बार मॅनेजरवर मारहाण करून जीवघेणी धमकी दिली, टेबल-खुर्च्या व इतर साहित्याची तोडफोड केली तसेच गल्ल्यातील ४-५ हजार रुपये हिसकावले. घटनेची तात्काळ दखल घेत गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवला गेला. पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेने स्वतंत्र पथके तयार केली आणि गुप्त माहितीच्या आधारे रहाटगाव परिसरात छापा मारला. याठिकाणी सागर खिराडे, निखील चक्रे आणि सिद्धार्थ वानखडे यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याने त्यांना पुढील तपासासाठी गाडगेनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. दरम्यान, उर्वरित आरोपी आशीष मकेश्वर व प्रतिक वानखडे यांनाही गाडगेनगर पोलीसांनी अटक केली. सर्व आरोपींना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, हे आरोपी आधीपासून गुन्हेगारी (पान २ वर)


## झेडपीत नोकरीचे स्वप्न दाखवून
# युवकाची ८ लाखांनी फसवणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा परिषदेतील कनिष्ठ अभियंता पद मिळवून देण्याचे खोटे आश्वासन देऊन साईनगर येथील एका युवकाची तब्बल ८ लाखांची फसवणूक झाली आहे.




साईनगर येथील विकास विक्रांत पोवते (वय २९) यांच्या तक्रारीवरून ही घटना समोर आली. राजापेठ पोलिस ठाण्यात आरोपी शोएब अली शब्बीर अली (वय २९, रा. चांदूर बाजार) याच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ४२० (फसवणूक) आणि ४०६ (विश्वासघात) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादीच्या माहितीप्रमाणे, आरोपीने विकास यांना जिल्हा परिषदेत (पान २ वर)

# घरफोडीतील आरोपी जेरबंद
### -राजापेठ पोलिसांची कारवाई



अमरावती/प्रतिनिधीः- शहरात दहशत माजवणारा घरफोडी व चोरीचा कुख्यात आरोपी सुजीत सहदेवराव भोंगारे (रा. गायत्री नगर, सरोज कॉलनी) हा अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. राजापेठ पोलिसांनी वॉरंट पथकाच्या धाडसी कारवाईत त्याला ताब्यात घेत न्यायालयात हजर केले.

माहितीनुसार, सुजीत भोंगारे आणि त्याचे साथिदार सन २०२० पासून अमरावती शहरात घरफोड्या व चोरीच्या अनेक घटनांमध्ये सामील होते. त्यांनी मोठमोठ्या घरांत घुसून एलईडी टीव्ही व इतर मौल्यवान वस्तू चोरल्या आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले. आरोपीवर शहरातील विविध ठिकाणच्या पोलिस ठाण्यांत २० हून अधिक चोरी आणि घरफोडीचे गुन्हे नोंदवले आहेत. कोठडीत असताना जामिनावर सुटल्यावर सुजीत भोंगारे पसार झाला होता. न्यायालयाने त्याच्यावर पकड व प्रोक्लमेशन वॉरंट जारी केले होते, काही प्रकरणांत तो फरारही घोषित झाला होता. पोलिसांना माहिती मिळाल्या प्रमाणे, आरोपीने अलीकडेच आपले घर विकून कुटुंबासह पुणे व नाशिक परिसरात वास्तव्य सुरू केले होते, परंतु त्याचा अचूक ठावठिकाणा लागत नव्हता. २९ ऑगस्ट रोजी भोंगारे आपल्या विकलेल्या घराच्या व्यवहारासाठी निबंधक कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालयासमोर दिसल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली. तत्काळ वॉरंट पथक रवाना करण्यात आले आणि तेथेच आरोपीला ताब्यात घेऊन राजापेठ पोलिस ठाण्यात आणण्यात (पान २ वर)

# देवदर्शनानंतर मंगळसूत्र वाचवण्याचा धाडसी प्रयत्न
### गाडगेनगर हद्दीतील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** देवदर्शन करून घरी परतत असलेल्या विवाहित महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचण्याचा प्रयत्न दोन अज्ञात चोरांनी केला, मात्र महिलेनं धाडस दाखवत मंगळसूत्र घट्ट पकडून ठेवले, त्यामुळे लुटीचा प्रयत्न अपयशी ठरला. गाडगेनगर परिसरात गुरुवारी दि. २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडवली.

फिर्यादी महिलेने सांगितले की, देवदर्शन करून परतताना गाडगेनगरातील शिवसाई मंदिराजवळ अचानक दोन इसम दुचाकीवर येऊन थांबले. त्यांच्या मध्ये एकाच्या डोक्यावर हेल्मेट, तर दुसऱ्याने चेहरा स्कार्फने झाकला होता. त्यांनी (पान २ वर)

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील डॉक्टरांचा संप
## ११ किडनी ट्रान्सप्लांटसह ३०० शस्त्रक्रिया ठप्प



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गोरगरीब रुग्णांसाठी जीवनदायी ठरलेल्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात २५ स्पेशालिस्ट डॉक्टर गेल्या आठवड्यापासून संपावर असून, ११ किडनी ट्रान्सप्लांटसह ३००–४०० महत्त्वाच्या शस्त्रक्रिया ठप्प पडल्या आहेत. डॉक्टरांचे कोट्यवधींचे मानधन मागील वर्षभरापासून थकीत असून, शासनाकडून मानधन वाढीची मागणीही प्रलंबित आहे.

माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी या गंभीर परिस्थितीवर संताप व्यक्त केला. 'गोरगरीबांना उच्च दर्जाची आरोग्यसेवा मिळावी यासाठी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारले. मात्र आज डॉक्टरांचे मानधन न मिळाल्यामुळे ते संपावर आहेत आणि रुग्ण शस्त्रक्रियेअभावी धोक्यात आहेत. लोकप्रतिनिधी नवीन प्रकल्प सुरू करण्यावर लक्ष ठेवतात, पण पूर्वी उभारलेल्या सुविधाही नीट चालवू शकत नाहीत. हे त्यांच्या अकार्यक्षमतेचे थेट उदाहरण आहे,' असे डॉ. देशमुख यांनी म्हटले. त्यांनी शासनाकडे तातडीने हस्तक्षेप करून थकीत मानधन देण्याची आणि मानधन वाढीच्या मागण्या पूर्ण करून शस्त्रक्रियेची कामे सुरू करण्याची मागणी केली.

जीवनदायी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची स्थापना: २००८ मध्ये झाली. उपलब्ध सुविधा: किडनी, कार्डिओलॉजी, न्युरोलॉजी, पेडियाट्रिक्स, प्लास्टिक सर्जरी या आहेत.

पूर्वी गोरगरीब रुग्णांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयाला जावे लागायचे; मृत्यूचा धोका अधिक होता.

नागरिकांना जीवघेण्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. दररोज शेकडो रुग्ण या रूग्णालयात उपचार घेतात. मात्र शस्त्रक्रिया: किडनी ट्रान्सप्लांट, कार्डिओलॉजी, न्युरोलॉजी, पेडियाट्रिक्स (पान २ वर)

# कुख्यात आरोपी तडीपार
### -शिरखेड पोलिसांची कारवाई




अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती जिल्ह्यात सण-उत्सव काळात शांतता राखण्यासाठी जिल्हा पोलिसांनी कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्याच अनुषंगाने शिरखेड पोलिसांनी गुन्हेगारी प्रवृत्तीचा इसम अभिजीत उर्फ अभिनय राजकुमार वानखडे (वय २९, रा. कवठाळ, ता. मोर्शी) यास जिल्ह्यातून तडीपार केले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, वानखडे हा शारीरिक गुन्ह्यांमध्ये वारंवार अडकलेला असून त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत. पूर्वी त्याच्यावर करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईंचा काहीही परिणाम न झाल्याने त्याची गुन्हेगारी प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत होती. त्यामुळे शिरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लुले यांनी महाराष्ट्र (पान २ वर)

# ट्रकच्या धडकेत दुचाकी चालक ठार



### -वाढोणा पिंपळखुटा मार्गावरील घटना

वर्धा जनमाध्यम - आर्वी येथील डाक विभागातील कर्मचारी दुचाकीने ड्युटीवर (पान २ वर)

# सोनेगावच्या जुगार अड्ड्यावर धाड, ५ जणांना अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदुर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोनगाव येथे चालणाऱ्या अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून पाच आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून ११ हजार ८३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती कि सोनेगाव येथे सार्वजनिक ठिकाणी काही लोक जुगार खेळत आहे. यावरून पोलिसांनी तेथे छापा मारून आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १ हजार ८३० रूपये रोख व एक विवो कंपनीचा मोबाईल १० हजार असा एकूण ११ हजार ८३० रुपयांचा मुद्देमाल जप्त (पान २ वर)



## नदीच्या पुरात वाहून गेल्या माय-लेकी
# मुलगी बचावली, आईचा शोध सुरू



**अकोला/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे कमळगंगा नदीला पूर आला आहे. शेतातून घरी परत येत असताना दोघी माय-लेकी पुरात वाहून गेल्या. सुदैवाने १८ वर्षीय मुलगी बचावली. पण तिची आई अद्यापही बेपत्ता आहे. रेखा रमेश मते (वय ४३) व साक्षी रमेश मते (वय १८) असे वाहून गेलेल्या (पान २ वर)




सारांश
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
❏ रविवार, ३१ ऑगस्ट २०२५ ❏ E-paper - www.janmadhyam.com

# कायदा-सुव्यवस्थेत सुधारणा?

**कायदा आणि व्यवस्थेच्या स्वरूपाचा विचार करताना संभाव्य व विद्यमान बदलांना केंद्रस्थानी ठेवावे लागेल. समाजासमोरची आव्हाने कोणती? समाजात काय बदल होत आहे? पुढे काय बदल होणार? हे प्रश्न आहेत.**



आपण कायदा आणि सुव्यवस्थेचा विचार करतो, तेव्हा त्यास एखाद्या समाजाशी जोडतो; परंतु इथे देशाचा मुद्दा मांडत आहोत. जो समाज बदलाची भूमिका ठेवतो, तोच कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम करतो. परिवर्तनशील समाजाचे काही नियम आहेत, परंतु यात आधुनिक काळात व्यापक बदल झाला आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा मांडताना आपल्याला भविष्यातील बदलावर देखील लक्ष ठेवावे लागणार आहे. आपल्यासारख्या लोकांचे लक्ष्य 'ऑर्डर एकॉर्डिंग टू लॉ' म्हणजेच कायद्याला अनुसरून व्यवस्थेची स्थापना करण्याचे आहे. भारतात कायद्याला पूरक व्यवस्था असणे महत्त्वाचे ठरेल.

**समाजात वेगाने बदल**

आधुनिक काळात समाजात प्रचंड बदल झाला आहे. पहिला म्हणजे वेगाने होणारे शहरीकरण. शहरीकरणात वावरणारी पोलीसप्रणाली वेगळ्या पद्धतीने काम करते. यासंदर्भात कमिशन सिस्टिम आदी गोष्टी लागू झालेल्या आहेत आणि आणखीही काही बाबी आहेत. उत्तर प्रदेशातील शहरे पाहिले तर शहरीकरणाचे भेसूर प्रमाण लक्षात येईल. लखनौ आणि मेरठचा आकार पाहा. इकडे महाराष्ट्रात पुणे, नागपूरचा विस्तार पाहा. वेगाने वाढणारे शहरीकरण हे मोठे आव्हान आहे.

दुसरे म्हणजे गुन्हेगारी विश?वात तंत्रज्ञानाचा वाढता वापर. गुन्हेगारी विश?वाचे चित्र गंभीर आणि आव्हानात्मक आहे. यासंदर्भात आपण इतकेच म्हणू शकतो की पोलिसांना आता तंत्रज्ञानाच्या पातळीवर गुन्हेगारापेक्षा एक पाऊल पुढे राहावे लागणार आहे. आपल्याकडील गुन्हेगारीचा पॅटर्न पाहिला तर पूर्वीच्या प्राणी, वस्तू चोरण्यापासून ते आताचा सायबर हल्ला असा बदलत गेला आहे. एकेकाळी प्राण्याची चोरी हा गंभीर गुन्हा मानला जात असे. मात्र आज सायबर गुन्हे, फसवणूक अधिक होत आहे.

तिसरा मुद्दा विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी संबंधित आहे. संवाद न करताही किंवा समोरासमोर नसतानाही किंवा संपर्कात असलेल्या लोकांना फसवल्याच्या घटना घडत आहेत. पूर्वी गुन्हा करताना आरोपी एकत्र यायचे आणि कारस्थान रचायचे. आज त्याची गरज भासत नाही. सायबर गुन्हेगार आपल्या खात्यातून पैसे काढतात आणि ते एकप्रकारे ऑनलाइन दरोडा घालतात. अमली पदार्थांची तस्करी पाहा. वेगवेगळ्या मार्गाने हा व्यवसाय फोफावत आहे. यासाठी ऑनलाइनवर डार्कनेट असून इंटरनेट फार्मसी सक्रिय आहे.

चौथा बदल म्हणजे भांडवली बाजारातील वाढ. सिक्युरिटीज, शेअर, बाँड्सशिवाय इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्सशी संबंधित मुद्दे देखील आव्हान उभे करत आहेत. पाचवा घटक राज्यांची आर्थिक असमानता. हे देखील मोठे आव्हान आहे. रोजगारासाठी दुर्गम आणि ग्रामीण भागातील नागरिक मुंबई, बंगळुरू, दिल्लीसारख्या मोठ्या शहरात जातात.

अशावेळी परप्रांतीय किंवा परराज्यातील मुद्दे प्रकर्षाने समोर येतात. आणखी एक मुद्दा म्हणजे अंतर्गत सुरक्षा. तो देखील आव्हान निर्माण करत आहे.

न्यायव्यवस्थेच्या सुधारणांवर भर

कोणत्याही समाजात शांतता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी एकट्या पोलिसांची नाही. पोलीस हे फौजदारी न्यायव्यवस्थेतील एक घटक आहेत. फौजदारी न्यायव्यवस्थेत पाच घटक आहेत. विधिमंडळ, पोलीस, निवाडा, न्यायपालिका आणि सुधारणा सेवा, यास आपण तुरूंग म्हणतो. फौजदारी न्याय व्यवस्थेसंदर्भात जगात एक विचार असून तो म्हणजे कोणत्याही स्थितीला एकटे पोलीसच जबाबदार नाहीत. परंतु

**ओ. पी. एस. मलिक,**
माजी आयपीएस
अधिकारी

आपल्याकडे पोलिसांनाच जबाबदार मानले जाते. साधारणपणे जनतेच्या मते, कायदा आणि सुव्यवस्था, गुन्हेगार आणि पोलीस यांच्यात एक स्पर्धा आहे. कधी पोलीस खाली तर कधी गुन्हेगार. समाजातील विचारांत प्रगल्भता आणण्यासाठी फौजदारी न्याय प्रणालीत सुधारणा करावी लागणार आहे.

केंद्राने एक पोलीस अधिनियम करायला हवा. सर्व राज्यांनी त्याचा स्वीकार करत त्यात बदल करून घ्यावा. आता काही राज्यांनी पोलीस कायदा केला तर काहींनी काहीच नाही. सेंट्रल पोलीस ॲक्टमध्ये देखील बदल झालेला नाही. हा मुद्दा पोलीस व्यवस्था सुधारणेचा आहे. परंतु पोलीस व्यवस्थेत बदल घडवून आणून काही फायदा होणार नाही. कारण फौजदारी न्यायव्यवस्थेतील पाच घटकांवर काम करावे लागेल. बदल घडवून आणताना तुरूंग व्यवस्था, न्यायिक व्यवस्था आणि पोलीस या सर्वांना सोबत घ्यावे लागेल.

**शास्त्रीय पद्धतीचा वापर**

बदलाच्या प्रक्रियेत शास्त्रीय पद्धतीचा वापर हा एक महत्त्वाचा विषय झाला आहे. न्यायवैद्यक प्रयोगशाळा, डीएनए, फिगरप्रिंटिंग आदींचा उल्लेख यात करता येईल. लोकांना प्रशिक्षित केले जात आहे. यासाठी पथक स्थापन करण्यात आले आहे. पुढे अधिक भर द्यावा लागेल. आताचे गुन्ह्याचे रूप पाहिले तर या गोष्टींना अधिक महत्त्व आले आहे. सीसीटीव्ही कॅमेराच्या मदतीने कितीतरी गोष्टींचा भांडाफोड होतो. म्हणून वेळोवेळी त्याची मदत घ्यावी लागेल आणि भासणारच.म्हणून त्यावर वेगाने काम करावे लागेल. आपल्याला कायद्याचे राज्य आणायचे असेल तर शास्त्रीय बाजूंना अधिक महत्त्व द्यावे लागेल.

भारतात पोलीस आणि ईडीसारख्या तपास यंत्रणा असताना त्यांच्यासमोर एक प्रश्न असतो की, कोणाचे ऐकावे. शांततेत नोकरी करण्यासाठी आणि चांगल्या पोस्टिंगसाठी अधिकाऱ्यांना नेत्यांवर अवलंबून राहावे लागते. त्यांची जबाबदारी कायदा निश्चित करतो. एकप्रकारे द्विधा मनस्थिती निर्माण करणारी स्थिती आहे. त्यास इंग्रजीत 'स्प्लिट पर्सनालिटी' असे म्हणतात. देशभरातील पोलीस हे काहीवेळा सत्ताधारी पक्षाचे 'सेल' म्हणून काम करतात. म्हणून ते निष्पक्षपणे काम करू शकत नाही. अर्थात, पोलिसांचा यात खूप सहभाग नाही. पण त्यांच्यावर दबाव खूप आहे. पोलीस निष्पक्ष असावे असे जर मानत असू तर त्यांना स्वायत्तता द्यायला हवी. पण खरी गोम म्हणजे आपला ना पोलिसांवर विश्वास, ना दंडसंहितेवर ना साक्षीपुराव्यावर.

ब्रिटनमध्ये पोलिसासमोर जबाब नोंदवताना दोघांच्या स्वाक्षऱ्या असतात. संपूर्ण जगभरात अशीच पद्धत आहे. आपल्याकडे त्यास मान्यता नाही. एकीकडे पोलिसांना दिलेल्या जबाबावरच खटला चालतो. दुसरे म्हणजे पोलिसांवर विश्वास नाही, असे आपण म्हणतो. पुराव्याबाबतही आपला विश्वास डळमळीत असतो. त्यामुळे विश्वासार्ह पोलीस व्यवस्थेची उभारणी करावी लागेल. इथे जनतेचा नाही तर कायदा सुव्यवस्थेच्या विश्वासाचा मुद्दा आहे. 'स्प्लिट पर्सनालिटी' मधून पोलिसांना बाहेर काढायचे असेल, तर त्यांना स्वायत्तता द्यावी लागेल. पोलीस हे कोणाला जबाबदार आहेत, ते निश्चित करावे लागेल. राजकीय नेत्याप्रती की कायद्याप्रती की फौजदारी व्यवस्थेप्रती. यावर निश्चितच विचार करावा लागेल.

# प्रथम तुला वंदितो....

संपूर्ण जनतेच्या ममत्त्वाचा, दैवत्वाचा, अस्मितेचा, श्रद्धाळू असा हा एकमेव गणेश. गणरायाचे आगमन म्हणजे सर्वांसाठी आनंदाची पर्वणीच असते. जोरदार सरींची बरसात झेलून सुखावलेले समस्त जीव आता उत्सव पर्वामध्ये चिंब भिजण्यासाठी सज्ज झाले आहेत. विघ्न दूर करून सुखाची चाहूल देणाऱ्या बाप्पाचे आज आगमन झाले. ऐलमा, पैलमा गणेश देवा, माझा खेळ मांडू दे करीन तुझी सेवा... अवतीभवतीचा आनंद व उत्साहाच्या हिरव्यागार वातावरणात भाविकांनी गणेशाचे स्वागत केले.

*प्रत्येकाच्या घरोघरी उत्सवाची सज्जता सुरू असल्यामुळे भारलेले वातावरण अनुभवायला मिळत असते. वास्तविक गणेश हा विद्येचा देव आणि ज्ञानाचा अधिपती. सण आणि उत्सव साजरे करताना आपण संस्कृती परंपरेचा प्रवाह पुढे नेत असतोच. आपल्या समाज सुधारकांनी मात्र उत्सव आणि परंपरा यांचा विचार राष्ट्रासाठी कसा केला याचे उत्तम उदाहरण म्हणजे सार्वजनिक गणेशोत्सव. सार्वजनिक गणेशोत्सवाचा उल्लेख जेव्हा जेव्हा होतो तेव्हा लोकमान्य टिळकांचे स्मरण होणे स्वाभाविक आहे.*



प्रत्येकाच्या घरोघरी उत्सवाची सज्जता सुरू असल्यामुळे भारलेले वातावरण अनुभवायला मिळत असते. वास्तविक गणेश हा विद्येचा देव आणि ज्ञानाचा अधिपती. सण आणि उत्सव साजरे करताना आपण संस्कृती परंपरेचा प्रवाह पुढे नेत असतोच. आपल्या समाज सुधारकांनी मात्र उत्सव आणि परंपरा यांचा विचार राष्ट्रासाठी कसा केला याचे उत्तम उदाहरण म्हणजे सार्वजनिक गणेशोत्सव. सार्वजनिक गणेशोत्सवाचा उल्लेख जेव्हा जेव्हा होतो तेव्हा लोकमान्य टिळकांचे स्मरण होणे स्वाभाविक आहे.

गणेशोत्सवाची सुरुवात झाली ती भारतीयांना एकत्र आणण्यासाठी, विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी. १८९३ साली स्थापन केलेला सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा अनोखा प्रयत्न. जो पुढे जाऊन यशस्वी झाला. एका मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापासून सुरुवात होऊन घराघरांत, मंडपात गणराज विराजमान झाले आहेत. जीवनात अनोखे रंग भरणारा, स्नेह, प्रेम वाढवणारा हा उत्सव आहे. आजच्या घडीचे संघटन, शक्तीचे प्रतीक दर्शविते. हे सर्व करत असताना या आनंदमय वातावरणात सर्व समाजाने एकत्र यावे त्यांच्यात बंधुभाव वाढीस लागावा, एकमेकांप्रती प्रेम, आपुलकी निर्माण व्हावी या उदात्त हेतूने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करण्यात आली.

चातुर्मासात श्रावणसरींनी आलेला पाऊस आपल्याबरोबर हिंदू सणांना घेऊन येतो. हिंदू धर्मातील ईश्वराची रूपे वेगळी असली तरी शेवटी सर्वांचा ईश्वर एकच आहे. हे निस्सीम सत्य विसरता कामा नये. चौदा विद्या, चौसष्ट कलेचा अधिपती असलेल्या श्रींचे आगमन सर्वांसाठी आनंदरुपी अमृत सोहळा आहे. बाप्पा आला रे आला... किती जिव्हाळ्याचा आतून येणारा आवाज. गोंडस, गोजिरवाणा, लोभस, लडिवाळ, सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन वाजत गाजत मोठ्या उत्साहात घरोघरी, गल्लोगल्ली,

**रसिका मेंगळे**

शहरात तसेच गावात झाले आहे. घरामध्ये गणपती बाप्पा जेव्हा विराजमान होतात तेव्हा घराचे मंदिर आपोआपच होऊन जाते. या पवित्र वातावरणात कधी दहा दिवस संपतात तेच समजत नाही. यामध्ये गौरी आगमन, गौरी पूजन व गौरी गणपती विसर्जन हे सण उत्सव आनंदात साजरे केले जातात. आपल्याकडे सर्व असतातच यासाठीच की मरगळलेल्या मनाला पुन्हा चैतन्य ऊर्जा मिळावी ही ऊर्जा मिळताना मनामध्ये पवित्र भाव असावा. अनेक पिढ्यान पिढ्यांपासून बाप्पाची अतिशय मनोभावे पूजा केली जाते. लहान मुलांपासून ते वडीलधाऱ्यापर्यंत श्री गणेशाचे आगमन झाल्यावर प्रत्येकजण बाप्पाची सेवा करण्यात दंग होऊन जातो. कारण गणेश दैवत हे बुद्धीची देवता आहे. तसेच तो विघ्नहर्ता ही आहे. प्रथम पूजेचा शुभारंभाचा मान श्री गणेशाकडे जातो. अशा गणाचा अधिपती असलेल्या श्री गणेशाचे स्थान आपल्या आयुष्यात अनन्यसाधारण आहे. बाप्पाचा आवडता प्रसाद मोदक. बाप्पाच्या नैवेद्याचा आधीच जिभेवर उड्या मारायला लागतो. या दिवसात एक वेगळेच वातावरण न्याहाळायला मिळत असते. बाप्पा विराजमान झाल्यावर विविध सुगंधी अगरबत्त्यांचा दरवळणारा सुवास, शेणाने सारवलेले अंगण, मातीच्या भिंतींना केलेली पानाफुलांची रंगरंगोटी, दाराला लावलेले तोरण, रांगोळीने सजलेले अंगण मन प्रसन्न करते. बाप्पाच्या आगमनामुळे रक्ताची नाती जवळ येतात, उत्साह, आनंदाचे वातावरण निर्माण होते.

वक्रतुंड महाकाय, सूर्यकोटि समप्रभ। निर्विघ्न कुरुमे देव, सर्वकार्येषु सर्वदा! गोलाकार सोंडेचा, विशाल शरीराचा, सूर्या समान तेजस्वी अशा विघ्नहर्ताची आमच्यावर कृपा असावी. आपल्या या वैदिक संस्कृतीमध्ये एक दयाळू देवता श्री गणेश विघ्नहर्ता बुद्धिवंत, सामर्थ्यवंत, शक्तीवन्त, रूपवंत देवता आहे. गणेश या संस्कृत शब्दाप्रमाणे अर्थ गण म्हणजे समूह तर ईश म्हणजे परमेश्वर.

गणपती म्हणजे प्राणिमात्रांच्या समूहाचे रक्षण करणारा रक्षक. गणेश हा महादेव आणि पार्वतीचा पुत्र आहे. याबद्दलची गोष्ट प्रत्येकाला माहीतच आहे. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून वेद व्यासांनी डोळे मिटवून भागवत कथा सलग दहा दिवस गणपतीला ऐकवली. जी गणपतीने आपल्या दाताने लिहिली. दहा दिवसानंतर जेव्हा व्यासांनी डोळे उघडले तेव्हा त्यांनी पाहिले की, गणेश एका जागी सतत बसून लिहिल्यामुळे अतिशय उष्णता शरीरात निर्माण झाली. त्यामुळे जवळील पाण्याच्या कुंडात वेद व्यासांनी त्यांना थंड केले. त्यामुळेच भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणरायाची स्थापना केली जाते आणि शितल करण्यासाठी अनंत चतुर्दशीला विसर्जन केले जाते.

गणेश उत्सव हा बाल आणि तरुणांसाठी एक आनंदोत्सवच असतो. अशा वातावरणात कल्पनाशक्तीला वाव मिळतो. कौशल्याच्या सादरीकरणाची संधी मिळते. नवनवीन मित्र-मैत्रिणी गवसतात, एकत्र काम केल्यामुळे सुसंवादाला चालना मिळते. सगळे एका पातळीवर येऊन काम करत असल्यामुळे जवळीकता वाढते. एकप्रकारे या अनौपचारिक वातावरणात मैत्री फुलते. दोस्ती घट्ट होते. एकंदरीत संपूर्ण समाज या महोत्सवात विरघळून जातो, रममान होतो.

श्री गणेश विद्येची देवता आहे. तसेच ती कलेची ही देवता आहे. त्यामुळे कलाकार मंडळी ही गणेश उत्सवामध्ये आपली कला सादर करण्यासाठी रंगून गेलेले असतात. गणपतीसमोर ठेवलेले लाडू, मोदक असे गोड पदार्थ लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडतात. त्यामुळे गणेशोत्सवामध्ये बाळ गोपाळही रमून जातात. काहींच्या घरी दीड दिवसाचे गणपती तर काहींच्या घरी सात दिवसांचे गणपती असतात. पंचमी दिवशी दीड दिवसाचे गणपती जातात. त्यादिवशी ऋषीपंचमी साजरी केली जाते. याच दिवसात गौरीचे आगमन होते. गौरी पूजन आणि विसर्जनाचा सोहळा पार पडतो. काही गणपतीचे विसर्जन गौरी सोबतच होते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी सर्वच गणपतीचे विसर्जन होते.

गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या. गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला.

# शोध तरुण मनांचा...

मराठी भाषेचा विकास आणि आव्हाने हा विषय सध्या सतत चर्चेत आहे. मला नेहमी असे वाटते की, येणाऱ्या काळात मराठीच्या विकासाच्या दिशा शोधण्याचे काम तरुणाईकडूनच होईल. तरुण मन सातत्याने नव्याचा शोध घेणारे असते.या काळात तनामनात एक वेगळीच ऊर्जा सळसळत असते. त्यामुळे हातून नवी कामे उभी राहतात. शिक्षणतज्ज्ञ रमेश पानसे यांचे काम मी जेव्हा पाहते तेव्हा तरुणवयात त्यांनी त्यांच्या कामाचा पाया कसा घातला हे पाहून मन थक्क होते. प्राध्यापक ही सुस्थिर सुरक्षित नोकरी मानली जाते. त्यात अर्थशास्त्राचा प्राध्यापक म्हणजे अगदी सुरक्षित!

त्या वयात अनुताई वाघ यांचे आदिवासी मुलांच्या शिक्षणातील काम सरांनी समजून घेतले आणि एसएनडीटी विद्यापीठातील नोकरी सोडून सरांनी स्वतःला आदिवासी मुलांच्या शिक्षणाच्या कामात अक्षरशः झोकून दिले. ग्राममंगलचा इतिहास यातूनच घडला. आज भल्या भल्या इंग्रजी शाळा ग्राममंगलकडून बालशिक्षणाचे धडे गिरवत आहेत.

नुकतीच मी अनघा पेंडसे या




तरुण मुलीला भेटले. तिच्याशी मी पंधरा वीस मिनिटे जे काही बोलले त्यात मराठी विषयीचे प्रेम ओतप्रोत भरलेले होते. मात्र हे प्रेम आंधळे नव्हते, तर ते मराठीच्या विकासाची तंत्रज्ञानाची सांगड कशी घालता येईल याचा विचार करणारे होते.

अलीकडे एआय तंत्रज्ञानाची सांगड मराठीशी कशी घालता येईल यावर अनघा काम करते आहे. एकीकडे शब्दांकन, दुसरीकडे ब्लॉग, पुस्तके संपादित करणे असे एक ना दोन अनेक विषय तिच्या अभ्यासाच्या कक्षेत आहेत. 'रील' तयार करणे हा अलीकडच्या मुलांच्या आवडीचा विषय पण त्याकरता नेमके काय करायला हवे यावर अनघा अतिशय उत्सुकेने बोलते. अमराठी भाषकांना मराठी शिकवणे हा तिच्या विशेष आवडीचा विषय आहे. खेळांच्या माध्यमातून तो अधिक यशस्वीपणे कसा पोहोचवता येईल, यावर लक्ष केंद्रित करून अनघा आणि तिचे सहकारी मदत करतात.

शालेय स्तरावरील मुलांसाठी अनघा शब्दांचे वैभव वाढविणाऱ्या कार्यशाळा घेते. खेरीज अंध मुलांसाठी रोजगाराच्या विविध संधी निर्माण करण्याचे काम ती आणि तिचे सहकारी एकत्रितपणे करतात. त्याकरता अंध मुलांच्या भाषेवर विशेष काम करतात. साहित्याचा अभ्यास करून ही मुलगी साहित्याच्या चौकटीबाहेर पडून अनुवादाच्या क्षेत्रातही रमली आहे. कायद्याच्या क्षेत्रातील अनुवादासंदर्भातील जिज्ञासेतून ती तांत्रिक अनुवादाचा प्रत्यक्ष अनुभव घेते आहे.

अनघासारखी तरुण मने मराठीची स्पंदने मनापासून ऐकत आहेत ही खरोखर कौतुकाची गोष्ट आहे. अलीकडे मी अशा तरुणाईचा शोध घेत राहते. अध्यापन आणि अध्ययन ही आदान प्रदानातून घडणारी प्रक्रिया आहे. आजची तरुणाई खूप काही शिकवते आहे. मात्र शिकण्याची तयारी शिक्षकांनीही दाखवली पाहिजे.

# बाप्पासमोरच घटस्फोटाच्या चर्चांना पूर्णविराम



गेल्या काही महिन्यांपासून अभिनेता गोविंदा आणि त्याची पत्नी सुनिता आहुजा यांच्यातील घटस्फोटाच्या चर्चा होऊ लागल्या आहेत. याबद्दल रोज काही ना काही अपडेट्स समोर येत असताना आता घटस्फोटाच्या चर्चांना पूर्णविराम लागला आहे. आज गणेश चतुर्थीच्या निमित्ताने गोविंदा आणि सुनीता एकत्र स्पॉट झाले. यावेळी माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तरेही दिली. शिवाय अफवा पसरवणाऱ्यांना सडेतोड उत्तरही दिलं. घटस्फोटाबद्दल खुद्द सुनीता काय म्हणाल्या?

**गोविंदा-सुनिता यांचा एकत्र व्हिडिओ व्हायरल**

यंदा गणपती बाप्पांचे स्वागत करताना गोविंदा-सुनिता यांचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. दोघे डार्क मरून ब्राऊन कलर आऊटफिटमध्ये दिसत होते. सुनिता यांनी साडी नेसली होती तर गोविंदा यांनी शेरवानी परिधान केली होती. दोघेही एकत्र कॅमेराबद्ध झाले, त्यामुळे घटस्फोटांच्या चर्चांना आता पूर्णविराम लागला आहे.

काय म्हणाल्या सुनिता आहुजा?

सुनिता आहुजा यांनी माध्यमांना सांगितलं की, "आमच्यात काही बिनसलं असतं तर आमच्यामध्ये दुरावा असता. आम्ही इतके जवळ नसतो. आज तुम्ही पाहिला आहात. कुणीही आम्हाला वेगळं करू शकत नाही. मेरा पती सिर्फ मेरा है, मेरा गोविंदा सिर्फ मेरा है..प्रथम देवता आहे गणपती..जे काही चांगलं होणार आहे त्याच्या आशीर्वादाने. सर्व जण उत्सव साजरा करा, आनंदोत्सव साजरा करा. जोपर्यंत आम्ही स्वत: काही बोलत नाही, तोपर्यंत कृपया काहीही आमच्याबद्दल बोलू नका." तर गोविंदा यांनी गणपती बाप्पाचा जयघोष कॅमेरासमोर करत आनंदोत्सव साजरा केला.

**सुनिता यांनी माध्यमांना केलं आवाहन**

सुनिता पुढे म्हणाल्या, 'जेव्हा गोविंदाच्या कारकिर्दीत प्रगती होत होती, तेव्हा त्याने त्याच्या ऑफिसमध्ये गणपती ठेवण्याची परंपरा सुरू केली. यशवर्धनच्या चित्रपटाचे चित्रीकरण पुढच्या महिन्यात सुरू होत आहे, म्हणून मी म्हणाले की, यावेळी माझा मुलगा गणपती घेऊन येईल. मला वाटते की, त्याने गोविंदाप्रमाणेच सर्वांकडून खूप प्रसिद्धी, आदर आणि प्रेम मिळवावे. म्हणूनच मी यशवर्धनला यावेळी 'गणपती स्थापना' करायला लावले.'

मागील काही दिवसांपासून गोविंदा आणि सुनीता यांच्या घटस्फोटाच्या वृत्तांना जोर पकडला आहे. सुनीता यांच्या यूट्यूब व्लॉग नंतर दोघांचे नाते बिनसल्याचे वृत्त समोर आले. सुनिता यांनी नुकताच सांगितलं होतं की, गोविंदा यांच्या सोबत त्यांचे नाते कसे आहे.



# शाहरुख खान आणि दीपिका पदुकोण यांच्याविरुद्ध FIR

राजस्थामधील भरतपूर येथे बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान आणि अभिनेत्री दीपिका पदुकोण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही अभिनेत्यांवर सदोष वाहनांचे मार्केटिंग केल्याचा आरोप आहे. दोन्ही ब्रँड ॲम्बेसेडरसह, ह्युंदाई कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अन्सो किम, पूर्णवेळ संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तरुण गर्ग आणि शोरूम मालकांचीही नावे एफआयआरमध्ये आहेत. भरतपूर येथील वकील कीर्ती सिंह यांच्या याचिकेवर न्यायालयाने एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. शहरातील मथुरा गेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

कीर्ती सिंह यांनी एफआयआरमध्ये सांगितले आहे की, 'मी जून २०२२ मध्ये २३ लाख ९७ हजार ३५३ रुपयांना कंपनीची कार खरेदी केली होती. मी ही कार मालवा ऑटो सेल्स प्रायव्हेट लिमिटेड कुंडली, सोनीपत (हरियाणा) येथून खरेदी केली होती.' त्यांनी एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडकडून कारसाठी १०,०३,६९९ रुपयांचे कर्ज घेतले होते.

उर्वरित रक्कम त्यांनी रोख दिली होती.सिंह यांचा आरोप आहे की, हायवेवर ओव्हरटेक करताना कार पिकअप घेत नाही. ६-७ महिने गाडी चालवल्यानंतर, त्यात तांत्रिक बिघाड दिसू लागले.

# लालबागचा राजाच्या चरणी सिद्धार्थ-जान्हवी



सिद्धार्थ मल्होत्रा आणि जान्हवी कपूर यांनी मुंबईच्या लालबागच्या राजाचे दर्शन घेतले. गुरुवारी, या दोन्ही कलाकारांचा आगामी चित्रपट 'परम सुंदरी'च्या यशासाठी जान्हवी-सिद्धार्थने बाप्पांचा आशीर्वाद घेतला. दोघे लालबागच्या राजाच्या चरणी पोहोचले. यावेळी अभिनेत्री नुसरत भरूचाने देखील लालबागचा राजाचे आशीर्वाद घेतले.

**गर्दीत जान्हवी कपूर अस्वस्थ?**

सिद्धार्थ-जान्हवीचे बाप्पाच्या दर्शनाचे अनेक व्हिडिओज सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. जान्हवीने लाल रंगाची पैठणी नेसली होती तर गुलाबी रंगाच्या कुर्ता सिद्धार्थने परिधान केला होता. प्रचंड गर्दीत जान्हवी-सिद्धार्थ मार्ग काढत बाप्पाच्या चरणी लीन झाले.

**नुसरत, दीपवीरने देखील घेतले दर्शन**

अभिनेत्री नुसरत भरूचा बाप्पांच्या दर्शनासाठी पोहोचली. दरम्यान, दीपिका पदुकोन आणि रणवीर सिंह दोघे दर्शनाला पोहोचले. त्यांचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल होत आहेत.

**गर्दीत अडकले जॅकलीन-अवनीत**

अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिस आणि अवनीत कौर पहिल्याच दिवशी बाप्पांच्या दर्शनासाठी पोहोचली. पण त्या गर्दीत अडकल्याचे दिसते, त्यांचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल होताना दिसताहेत. व्हिडिओमध्ये दिसते की, जॅकलीन-अवनीत कौर लालबागच्या राजाचे दर्शन घेतल्यानंतर मंडपमधून बाहेर येतात, त्यावेळी त्या गर्दीत आडकतात.

आणि मंडप बाहेर रस्त्यावर येण्यासाठी त्यांना तारेवरची कसरत करावी लागते. मंडपाचे सुरक्षारक्षक आणि स्वयंसेवक त्यांना सुरक्षितपणे बाहेर जाण्याचा मार्ग दाखवतात. यावेळी निर्माते राघव शर्मा देखील स्पॉट झाले.

# राशीभविष्य

**दिनांक ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर २०२५**

प्राचार्य डॉ. अनिल श्री. खांडेकर
अमरावती. मो. ९४२२९१५६६६

**दिनविशेष** - ३१ ऑगस्ट महालक्ष्मी आवाहन, १ सप्टेंबर महालक्ष्मी पुजन, २ सप्टेंबर महालक्ष्मी विसर्जन, ४सप्टेंपरिवर्तीनी एकादशी ५सप्टेंप्रदोष, ६ सप्टे अनंत चतुर्दशी**ग्रहयोग** - शुक-मिथुन, शुक्र- कर्क, रवि, बुध, केतु- सिंह, मंगळ कन्या
**चंद्रभ्रमन** - मकर, कुंभ

### समन्वयातु यश काबीज कराल

**मेष** - राशीस्वामी मंगळ लाभात, पंचमात रवि, बुध, तृतीयात गुरु, त्यायोगे या सप्ताहात बुध अस्त होईल, व्यवहारकौशल्य दाखवाल, घरगुती प्रश्न सुटतील, परिवर्तीनी एकादशी धार्मीक कार्यात योगदान देईल वरिष्ठांकडून मार्गदर्शन मिळेल. उत्तरार्ध यशदाशी व लाभाचा राहील व्यावहारिकपध्दतीने प्रश्नसहजपणे सोडवू शकाल, सामाजीक कार्यात वर्चस्व स्थापन काल अनावश्यक खर्चा ला लगाम घाला.
दि. ३ते ६

### व्यावसायिक प्रश्न सुटतील

**वृषभ**- राशीस्वामी शुक्र पराक्रमात, द्वितियात, पंचमात मंगळ, असुन चतुर्थात रवि, बुध, असुन या सप्ताहात बुध अस्त होईल. सप्ताहाची सुरुवात व्यावसायीक दृष्ट्या घडामोडीची ठरेल धार्मीक कार्यात योगदान राहुन गौरीच्या आगमनाने उत्साह वाढेल.उत्तरार्ध मार्ग प्रशस्त करील, योगायोगाने कामे जुळून येतील.सर्व बाबीतुन बरीच प्रश्नांची सोडवणूक होईल. सप्ताहअखेर समस्या सुटून येईल.
दि.३१, ४ ते ६

### निर्णयाची अंमलबजावणी कराल

**मिथुन** - राशीस्वामी बुध पराक्रमात असुन या सप्ताहात अस्त होईल द्वितियात शुक्र, राशीवर कर्क भाग्यात शनि वक्री असुन गौरीने आगमन शुभसंकेत येईल मंगळवार, बुधवार व्यावसायीक उलाढाली अपेक्षापूर्ती नुसार होईल, अनंतचतुर्दशी योग्यवळण देईल. वरिष्ठांचे योग्य मार्गदर्शन मिळेल परिवारात उत्साहाचे वातावरण राहुन कार्यक्षेत्र विस्तारेल निर्णयाची अंमलबजावणी केल्या जाईल.

### वक्तृत्व आकर्षित करील

कर्क- राशास्वामी चंद्र भाग्यात असुन सप्ताह अखेर अष्टमातून जाईल, भाग्यात शनि, राशीवर शुक्र, द्वितियात रवि बुध असल्याने आवक होवुन कमीशन, दलाल एहजन्सी वर्गाला लाभ मिळेल, महालक्ष्मीचे रविवार, सोमवार आगमन चैतन्य निर्मान करील परिवर्तनी एकादशी परोपकारी कार्यात नेईल. निर्णय प्रभावीपणे राबवाल, वि रोहाकांवर सहजपणे मात करू शकाल बंधु भांवडाचे विचार जुळणार नाही.
दि. ३१,१,४,५

### व्यक्तीमत्वाची छाप पडेल

**सिंह** - राशीस्वामी शनि राशावर बुधासोबत, द्वितियात मंगळ, सप्तमात राहु, असुन या सप्ताहात बुध अस्त होईल. मंगळवार, बुधवार सर्व स्तरातुन प्रतिसाद मिळेल संततीच्या प्रगतीने समाधान वाढेल, अनंतचतुर्वशी दिलासा देणारी ठरेल आत्मविश्वासाने पुढेजाल सिंह व्यक्तिचा प्रभाव पडोल आवक होवून बुध अस्त आल्यामुळे व्यवहाराला गती कमी येईल. दि. २,३

### महत्वाची कामे आटोपती घ्या

**कन्या** - राशीस्वामी बुध दशमात रवि सोबत, राशीवर मंगळ, भाग्यात शुक्र, दशमात गुरु, असुन या सप्ताहात अस्त होईल. गौरी आगमा उत्साह वातावरणात दिसेल रविवार, सोमवार चर्चा होतील, संपर्क साधु शकाल, बेरोजगारांगा रोजगार मिळून नविन हितसंबंध तयार होतील अधिकाराचा दुरूपयोग दांवत्य जीवनावर पडेल धार्मीक कार्यात योगदान देणारा कालावधी आहे. व्यावसायीक देन घेन सोईस्कर ठरेल गुरुवार, शुक्रवार दिलासा देणारा करेल. दि. ३०,१

### आलेख उंचावत जाईल

**तुळ** - राशीस्वामी शुक्र दशमात, लाभात रवि, दुष, भावयात शुक, चुक असुन उद्योगी राहाल. महालक्ष्मी आगमन तुळ व्यक्ति साठी भाग्य-बहरत्या होईल. सप्ताहाची सुरुवात अनुकूलता प्रदान करनारी असेल परिवर्तीनी एकादशी संपर्काची असेल. सप्ताह अखेर अनंत चतुर्दशी जम बसविणारे असुन समस्या सुटेल वरिष्ठांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल, नविन ओळखीत भर पडेल सरकारी कार्यात कामकाजात यश मिळेल दि. १ ते ६

### यश सोपे होईल

**वृश्चीक**- राशीस्वामी मंगळ लाभात, दशमात रवि, बुध, पंचमात शनि, भाग्यात शुक्र असुन जोड लाभून येईल. सरकारी कामात प्रभाव दिसुन येईल फाईल पुढे सरकतील. उत्तरांवर विसंबुन कार्य करू नका. समस्याचे समाधान होवुन पारीवारीक वातावरणात उत्साह वाढेल, भेटीगाठी होतील संततीच्या प्रश्नाला प्राधान्य द्यावे लागेल.
दि. १ ते ५

### योग्य वळण मिळेल

**धनु**- राशीस्वामी गुरु सप्तमात, भाग्यात रवि, बुध, पराक्रमात राहु दशमात मंगळ असुन लांबचे प्रवास साख्यदायी राहून महत्वाची कामे करू शकाल गौरी पुजनाने कृतार्थ व्हाल. उत्तरार्थ अपेक्षा पुर्तीचे ठरेल कार्यात वाढता प्रभाव राहु योजना गती घेईल.व्यावसायीक व व्यापारातील देव सेव करू शकाल हाती पैसा खेळता राहील, जोडीदाराची साथ मोलाची राहील, फाईल सांभाळ.
दि. ३ ते ६

### आर्थिक बाबतीत सफल राहाल

**मकर**-राशीवामी रानि तृतीयान, सजमात शुक्र, भारयात मंगळ असुन या साताहात बुध उमस्त होईल, सप्ताहाची सुरुवात दमदार सेवून रविवार, सोमवार अग्रेसर राहाल यश, प्रतिष्ठा मिळेल परिवर्तीत एकादशी योग्य वळन देईल. अनंतचतुर्दशी आवक वाढील व्यावसायाला स्वरूप दयाल आर्थीक कार्यात सफलता मिळून धार्मीक कार्यात सब पुढाकार घ्याल. सामाजीक कार्यात पुनकार काल, स्वतिर नियंत्रण ठेवा. दि. ३१,१,५,९


### व्यावसायिक समस्या सुटतील

**कुंभ**- राशीस्वामी शनि द्वितियात, पंचमात बुध, सप्तमात रवि बुध असुन गौरीच्या आगमनाने चैतन्य सभोवताली निर्माण होईल. पुर्वार्ध गतिशिल ठरेल. व्यावसाथीक प्रश्न चुटकी सरशी सुटतील, सप्ताहअखेर स्थिती पुर्वपदावर येईल परिवर्तीनी एकादशी लाभदायी राहून अनंतचतुर्दशी कार्यात बळ मिळवून देईल..
दि. ३१, ३ते६

### कार्यात प्रभाव वाढेल

**मीन**- राशीस्वामी गुरू चतुर्थात, पंचमात शुक्र, सप्तमात मंगळ, असुन शुक्र रवि, बुध षष्टात असुन सामाजीक वर्चस्व राहून चंद्रभ्रमण चढत्या क्रमाने यश, प्रतिष्ठा, लाभ देईल गौरीचे आममन मनोकामना पूर्ण करावे असेल परिवर्तीनी एकादशी प्रतिष्ठा देईल शुक्रवार, शुक्रवार योगायोगाने कामे जुळून येतील, संतेती बावत समाधानी राहुन जोडीदाराजोबत तडजोडी भूमिका घ्यावी लागेल दि. १ ते ५

# आर. माधवन लेहमध्ये अडकले



बॉलीवूड अभिनेता अवॉर २ नंतर ज्युनिअर एनटीराच्या दोन मोठ्या प्रोजेक्ट्सची घोषणा

साऊथ सिनेमातून थेट बॉलीवूडमध्ये एन्ट्री करत दाक्षिणात्य अभिनेता ज्युनिअर एनटीआर याने त्याच्या वॉर २ सिनेमातून धमाकेदार एन्ट्री केली. या सिनेमाने चांगली कमाई केली आहे. मात्र, जितकी अपेक्षा होती, त्या प्रमाणात या सिनेमाला गल्ला गोळा करता आलेला नाही. अशातच आता ज्युनिअर एनटीआरच्या त्याच्या दोन मोठ्या सिनेमांची घोषणा करण्यात आली आहे.

इंडस्ट्रीतील एका सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, वॉर २ नंतर ज्युनिअर एनटीआरचे दोन मोठे प्रोजेक्ट्सची सुरुवात केली जाणार आहे. या सिनेमांपैकी एका सिनेमाच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. देवरा २ असं या सिनेमाच नाव आहे. या सिनेमाच दिग्दर्शन प्रशांत नील करणार आहेत. तर दुसऱ्या सिनेमाच नाव अद्याप समोर आलेलं नाही. तसेच ज्युनिअर एनटीआरच्या आणखी काही सिनेमांची चर्चा होत आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, ज्युनिअर एनटीआरची सुरुवातीपासूनच ही योजना होती की, 'वॉर २' नंतर तो सर्वप्रथम प्रशांत नीलच्या सिनेमावर काम करेल. देवरा २ ऐवजी या सिनेमाचं टेंटेटिव्ह टायटल 'ड्रॅगन' असं ठेवण्यात आलं आहे. देवरा हा ज्युनिअर एनटीआर आणि अभिनेत्री जान्हवी कपूर र. माधवन सध्या लेह (लडाख) येथे अडकला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे लेह विमानतळावरची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. स्वतः माधवनने इन्स्टाग्रामवरून एक व्हिडीओ शेअर करत ही माहिती दिली.

माधवनने आपल्या हॉटेलच्या खिडकीतून घेतलेला व्हिडीओ शेअर केला आहे. त्यात बर्फाच्छादित डोंगर आणि ढगांनी वेढलेलं आकाश दिसत आहे. त्याने सांगितले की, 'ऑगस्ट महिना असूनही डोंगरांवर बर्फ पडला आहे. मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे विमान उड्डाणे बंद आहेत आणि त्यामुळे मी लेहमध्ये अडकून पडलो आहे.'

यावेळी त्याने २००८ मध्ये '३ इडियट्स'च्या शूटिंगदरम्यान घडलेली आठवणही सांगितली. 'मी शेवटचं २००८ मध्ये '३ इडियट्स'च्या शूटसाठी लेहला आलो होतो. त्यावेळीही अचानक बर्फवृष्टी झाली आणि शूट थांबवावं लागलं होतं. आता पुन्हा अगदी तसंच झालंय. पण या सगळ्यातही लेह अतिशय सुंदर दिसतंय,' असं तो म्हणाला.

गेल्या काही दिवसांपासून झालेल्या खराब हवामानामुळे लेह विमानतळाचा रनवे बंद ठेवण्यात आला असून दिल्ली विमानतळ प्रशासनाने प्रवाशांना सूचना जारी केल्या आहेत.

**माधवनची करिअर अपडेट्स**

माधवन शेवटचा फातिमा सना शेखसोबतच्या 'आप जैसा कोई' या नेटफ्लिक्स चित्रपटात दिसला होता. आता तो 'धुरंधर' या चित्रपटात दिसणार असून हा चित्रपट ५ डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात रणवीर सिंग, संजय दत्त, अक्षय खन्ना आणि अर्जुन रामपालही झळकणार आहेत.

# परिणिती चोप्राने दिली गूड न्यूज

अभिनेत्री परिणिती चोप्रा आणि आपचे नेते राघव चड्ढा आईबाबा होणार आहेत. दोघांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही गोड बातमी दिली. परिणिती-राघवने केकचा फोटो पोस्ट केला आहे. ज्यावर '१+१=३' असा गोड संदेश लिहिला असून लहान बाळाच्या पावलांचे चित्रही आहे. परिणितीने पोस्ट शेअर करताना लिहिलंय, 'आमचे चिमुकले विश्व लवकरच बाळाचे आगमन होणार आहे. आम्ही खूपच भाग्यवान आहोत.' परिणिती-राघववर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# सोशल मिडिया ट्रेंड्स

असे म्हणतात की, देव सर्व ठिकाणी उपस्थित राहू शकत नाही म्हणून त्याने आई बनवली आई ही प्रत्येकाच्या ह्रदयात वसलेली असते लहानसहान चुका पाठीशी घालणारी, मात्र जाणीवपूर्वक केलेल्या चुकीवर कठोर शिक्षा करणारी, वडिलांच्या रागापासून पाठीशी घालणारी आणि प्रत्येक संकटात आपल्या आधी पुढे येऊन त्या संकटाचा सामना करणारी अशी कितीतरी आईची रूपे आपण अनुभवत असतो. मात्र सगळ्याच गोष्टीत काहीतरी आगळेवेगळे करणाऱ्या चायनामध्ये सध्या पुरुषांनी आईचे रूप घेण्याचा जगावेगळा टेंड सुरू झाला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून आता हा ट्रेंड जगभर पसरत चालला आहे.या ट्रेंडची सुरुवात एका चायनीज मुलीच्या पोस्टने झाली. तिने लिहिले होते की, ती सध्या एक प्रबंध लिहिते आहे आणि त्या कामामुळे तिला अतिशय चकवा आलेला आहे. अशा वेळी तिला एका पाच मिनिटांच्या जादूच्या झप्पीची अर्थात प्रेमळ मिठीची आवश्यकता आहे. लहानपणी शाळेत तिला अशी एक झप्पी मिळाली होती आणि त्या वेळी तिला खूप आरामदायी वाटले होते. आतादेखील तिला एक अशी मिठी हवी आहे.

# लोह कमतरतेची समस्या आणि उपाय

जगभरातील आरोग्यविषयक चर्चेत लोहाच्या कमतरतेचा विषय नवीन नाही; पण अलीकडच्या काळात तो अधिकच गंभीर होत चालला आहे. पोषणतज्ज्ञ सांगतात की, लोहाची कमतरता ही केवळ एक वैयक्तिक आरोग्य समस्या नाही, तर ती समाज, अर्थव्यवस्था आणि पिढ्यान् पिढ्यांच्या आरोग्याच्या गुणवत्तेवर दीर्घकालीन परिणाम करणारी सार्वजनिक आरोग्याची समस्या आहे.

शाकाहारी अथवा पूर्णपणे वनस्पतीआधारित आहार पद्धतीचा स्वीकार करणाऱ्या लोकांमध्ये लोह कमतरतेची समस्या जास्त प्रमाणात दिसून येते.



**डॉ. भारत लुणावत**

### लोह का महत्त्वाचे?

लोह हे मानवी शरीरातील हिमोग्लोबिनचे मुख्य घटक आहे. हे रक्तातील लाल पेशींमार्फत शरीराच्या सर्व भागांना प्राणवायू पोहोचवण्याचे काम करते. लोहाची कमतरता झाल्यास रक्तक्षय (ॲनिमिया) होतो.

यामुळे थकवा, अशक्तपणा, एकाग्रतेत घट, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे आणि गंभीर अवस्थेत गर्भवती महिलांमध्ये मातामृत्यू अथवा बालमृत्यूचा धोका वाढतो.

### जागतिक स्तरावर वाढती लोहटंचाई

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालांनुसार, जगातील जवळपास ३० टक्के लोकसंख्या लोहअल्पतेच्या समस्येला सामोरे जाते. विशेषत: विकसनशील देशांमध्ये, जिथे लोकसंख्या मोठी आणि पोषणविषयक संसाधने मर्यादित असतात, तिथे ही समस्या गंभीर रूप धारण करते.

अलीकडील अभ्यासांनुसार, २०४० पर्यंत जागतिक अन्न उत्पादन आणि पुरवठा पद्धतीत मोठे बदल झाले नाहीत, तर लोहटंचाईचे प्रमाण आणखी वाढण्याची शक्यता आहे. याचे मुख्य कारण म्हणजे, हवामान बदल, जमिनीची सुपीकता घटणे, पिकांच्या पोषण मूल्यातील घट आणि लोकांच्या आहार पद्धतीतील बदल.

वनस्पती-आधारित अन्नामध्ये लोह असते; पण ते 'नॉन-हीम आयर्न' स्वरूपात असल्यामुळे ते मानवी शरीरात सहज शोषले जात नाही. याशिवाय अशा अन्नपदार्थांमध्ये फायबर, फायटिक ॲसिडसारखे घटक जास्त प्रमाणात असतात, जे लोहाच्या शोषणाला अडथळा निर्माण करतात.

उदाहरणार्थ, कडधान्ये, धान्ये, पालेभाज्या यामध्ये लोह असते; पण त्यातील मोठा भाग शरीरात उपयोगी पडत नाही.

याउलट, मांस, मासे, अंडी यांसारख्या प्राणिजन्य अन्नामध्ये 'हीम आयर्न' असते, जे सहज शोषले जाते आणि त्यामुळे शरीरात लोहाची पातळी टिकवून ठेवणे सोपे होते. म्हणूनच आहारतज्ज्ञ सांगतात की, पूर्ण शाकाहारी आहार घेताना लोहाच्या स्रोतांची काळजीपूर्वक निवड करणे आवश्यक आहे.

### लोहटंचाईचे दीर्घकालीन परिणाम

लोहाच्या कमतरतेचे परिणाम केवळ आरोग्यावरच नव्हे, तर देशाच्या आर्थिक उत्पादक तेवरही दिसून येतात. काम करण्याची क्षमता कमी होणे, शैक्षणिक कामगिरी घसरणे, लहान मुलांच्या मानसिक व शारीरिक विकासात अडथळे निर्माण होणे ही याची काही गंभीर उदाहरणे आहेत. गर्भवती महिलांमध्ये लोहअल्पता असली, तर प्रसूतीदरम्यान गुंतागुंत होण्याचा धोका वाढतो.

# भोपळ्याच्या बिया आणि खजूर...

*रात्री शांत आणि गाढ झोप लागणे हे आजच्या धावपळीच्या जीवनात एक मोठे आव्हान बनले आहे. अनेक जण निद्रानाश आणि अस्वस्थ झोपेच्या समस्येने ग्रासलेले आहेत. अशा परिस्थितीत, योग्य आहार घेणे खूप महत्त्वाचे ठरते. आहारतज्ज्ञ आणि आरोग्य तज्ज्ञ रात्रीच्या चांगल्या झोपेसाठी काही खास पदार्थांचा समावेश करण्याचा सल्ला देतात, ज्यामध्ये भोपळ्याच्या बिया आणि खजूर हे प्रमुख आहेत.*



### मॅग्नेशियमची भूमिका

झोपेसाठी मॅग्नेशियम हे एक महत्त्वाचे खनिज आहे. हे शरीरातील स्नायूंना आराम देते आणि मज्जासंस्थेचे कार्य सुधारण्यास मदत करते, ज्यामुळे शांत झोप लागते. भोपळ्याच्या बिया आणि खजूर हे मॅग्नेशियमचे उत्कृष्ट नैसर्गिक स्रोत आहेत.

### भोपळ्याच्या बियांचे फायदे

**मॅग्नेशियमचे भांडार:** भोपळ्याच्या बियांमध्ये मोठ्या प्रमाणात मॅग्नेशियम असते, जे निद्रानाशाचा त्रास कमी करण्यास मदत करते.

ट्रिप्टोफॅनचा स्रोत: यात ट्रिप्टोफॅन नावाचे अमिनो आम्ल असते, जे सेरोटोनिन आणि मेलाटोनिन तयार करण्यास मदत करते. सेरोटोनिन हे 'फील-गुड' हार्मोन आहे, तर मेलाटोनिन हे झोपेसाठी आवश्यक हार्मोन आहे.

**कसे खावे:** रात्री झोपण्यापूर्वी मूठभर भाजलेल्या भोपळ्याच्या बिया खाणे फायदेशीर ठरू शकते.

### खजुराचे फायदे

**नैसर्गिक साखर आणि ऊर्जा:** खजूर नैसर्गिकरित्या गोड असतात आणि शरीराला ऊर्जा देतात.

**मॅग्नेशियम आणि इतर पोषक तत्वे:** खजूरमध्ये मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि बी व्हिटॅमिन सारखी पोषक तत्वे असतात, जी मज्जासंस्थेसाठी चांगली असतात.

**कसे खावे:** रात्री झोपण्यापूर्वी १-२ खजूर खाणे किंवा दुधासोबत घेणे उपयुक्त ठरते.

### आहारतज्ज्ञांचा सल्ला

पोषणतज्ज्ञ सांगतात की, चांगल्या झोपेसाठी रात्रीच्या जेवणानंतर कमीत कमी दोन तास आधी हे पदार्थ खाणे योग्य आहे. तसेच, रात्रीचे जेवण हलके असावे आणि त्यात कार्बोहायड्रेट्सचा समावेश असावा, कारण ते झोपेच्या प्रक्रियेस मदत करतात.

याव्यतिरिक्त, रात्रीच्या जेवणानंतर चहा किंवा कॉफीसारखे कॅफीनयुक्त पदार्थ टाळावेत आणि स्क्रीन टाइम (मोबाईल, टीव्ही) कमी करावा. या सोप्या टिप्सचा वापर करून तुम्ही तुमच्या झोपेची गुणवत्ता सुधारू शकता.

# दीर्घ आणि निरोगी आयुष्यासाठी महत्त्वाच्या सवयी

**प्रत्येक व्यक्तीला दीर्घायुष्यासह निरोगी आयुष्य जगण्याची इच्छा असते. पण हे फक्त इच्छा असून साध्य होत नाही, त्यासाठी योग्य सवयी अंगीकारणे आवश्यक आहे. जर तुम्हाला कोणत्याही मोठ्या आजाराशिवाय आनंदी आणि आरोग्यपूर्ण जीवन जगायचं असेल, तर या ५ सोप्या सवयींचा नक्की अवलंब करा**



### रोज ३० मिनिटे चाला

आपल्या व्यस्त दिनचर्येतून फक्त ३० मिनिटे चालण्यासाठी काढणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. नियमित चालण्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो, मधुमेह नियंत्रणात राहतो आणि शरीरात रक्ताभिसरण सुधारते. यामुळे तुम्ही दिवसभर उत्साही राहता.

### भरपूर पाणी प्या

शरीराला पुरेसं हायड्रेटेड ठेवण्यासाठी दिवसभर भरपूर पाणी पिणं गरजेचं आहे. पाणी शरीरातील विषारी घटक बाहेर काढायला मदत करतं, पचनक्रिया सुधारतं आणि त्वचेला निरोगी ठेवतं. तहान लागल्यावरच नाही, तर नियमित अंतराने पाणी पिण्याची सवय लावा.

### पुरेशी झोप घ्या

शरीराला आराम देण्यासाठी आणि त्याला पुढील कामासाठी तयार करण्यासाठी पुरेशी झोप खूप महत्त्वाची आहे. दररोज ७ ते ८ तास शांत झोप घेणं आवश्यक आहे. अपुऱ्या झोपेमुळे तणाव, चिडचिड आणि इतर आरोग्य समस्या वाढू शकतात.


### संतुलित आहार घ्या

तुमच्या आहारात पौष्टिक आणि संतुलित पदार्थांचा समावेश करा. ताजी फळे, भाज्या, कडधान्ये आणि कमी चरबीयुक्त पदार्थ खा. जंक फूड आणि प्रक्रिया केलेले पदार्थ टाळा. संतुलित आहारामुळे शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळतात.

### मानसिक आरोग्याची काळजी घ्या

शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्यही तेवढंच महत्त्वाचं आहे. ध्यान योगा किंवा तुमच्या आवडीचा कोणताही छंद जोपासा.

यामुळे तणाव कमी होतो आणि मन शांत राहतं. सकारात्मक विचारांमुळे जीवनात आनंद आणि समाधान टिकून राहतं.



# नारळाच्या तेलात 'या' गोष्टी मिसळा...

आजकाल लहान वयात केस पांढरे होणे ही एक सामान्य समस्या बनली आहे. पूर्वी ४०-५० वर्षांच्या वयात केस पांढरे होत असत. तिथे आता २०-२५ वर्षांच्या तरुणांनाही या समस्येचा सामना करावा लागत आहे. याचे कारण चुकीची जीवनशैली, ताणतणाव, प्रदूषण आणि पोषणाचा अभाव आहे. तुम्हीही केस पांढरे होण्याने त्रस्त असाल आणि नैसर्गिकरित्या ते काळे करण्याचा मार्ग शोधत असाल या समस्येवर एक सोपा आणि नैसर्गिक उपाय जाणून घ्या.

### तेल कसे तयार करावे?

लोखंडी पॅनमध्ये दीड कप व्हर्जिन नारळ तेल ठेवा आणि ते मंद आचेवर गरम करा.तेल गरम झाल्यावर १ ते १.५ कप कढीपत्ता आणि ४ चमचे मेथीचे दाणे घाला आणि ५-१० मिनिटे शिजवा.सर्वकाही चांगले शिजल्यानंतर, पॅनमध्ये ५ चमचे आवळा पावडर घाला आणि आणखी २ मिनिटे शिजवा.कढीपत्ता काळा झाल्यावर आणि तेलातून हलका धूर येऊ लागला की, गॅस बंद करा.तेल थंड झाल्यावर ते गाळून काचेच्या बाटलीत भरा.रात्री झोपण्यापूर्वी आठवड्यातून दोनदा हलक्या हातांनी या तेलाने मुळांना मालिश करण्याची शिफारस करतात. सकाळी सौम्य शाम्पूने केस धुवा. २-३ महिने सतत वापरल्याने चांगले परिणाम मिळू शकतात.कढीपत्त्यामध्ये बीटा कॅरोटीन आणि प्रथिने असतात. यामुळे केसांचा नैसर्गिक रंग राखण्यास मदत होते.मेथीच्या दाण्यांमध्ये फॉलिक ॲसिड, जीवनसत्त्वे अ, क आणि खनिजे असतात. यामुळे केसांची वाढ होण्यास मदत होते.आवळा पावडरमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात.

# जंक फूड डोळ्यांसाठीही घातक

नुकत्याच झालेल्या एका संशोधनात असे समोर आले आहे की, जंक फूडचे अधिक सेवन मुलांच्या डोळ्यांच्या प्रकाशावर परिणाम करू शकते आणि ही सवय दीर्घकाळ सुरू राहिली, तर ती अंधत्वाचे कारणसुद्धा बनू शकते.



आजकाल लहान मुले असोत किंवा मोठी माणसे, घरचे पौष्टिक अन्न सोडून बर्गर, पिझ्झा, चिप्स, कोल्डड्रिंक्स, केक, वेफर्स यांसारख्या जंक फूडकडे जास्त आकर्षित होत आहेत. जंक फूडचे जास्त सेवन पचनाशी संबंधित अनेक समस्यांना कारणीभूत ठरते, ही गोष्ट बहुतेक लोकांना माहीत असते; पण जास्त प्रमाणात जंक फूड खाल्ल्याने मुलांच्या डोळ्यांना हानी पोहोचू शकते आणि त्यांच्या डोळ्यांची दृष्टीसुद्धा कमी होऊ शकते. मुळातच बौद्धिक, शारीरिक विकासासाठीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर असणाऱ्या मुलांना जंक फूड देणे पूर्णतः चुकीचे आणि अनारोग्यदायी आहे.

डोळ्यांचा विचार करता, जंक फूडमध्ये डोळ्यांसाठी आवश्यक असणारे व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई, ओमेगा-३ फॅटी अ?सिड आणि झिंक यांसारखे पोषक घटक जवळजवळ नसतात. असे अन्न वारंवार खाल्ल्याने मुलांच्या डोळ्यांच्या पेशींना आवश्यक पोषण मिळत नाही. त्यामुळे डोळ्यांमध्ये कोरडेपणा येणे, धूसर दसिणे, जळजळ होणे, कमी प्रकाशात दिसण्याची क्षमता घटणे अशा समस्या सुरू होतात.

ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि व्हिटॅमिन एची कमतरता झाल्यास रेटिनाच्या पेशी कमकुवत होऊ लागतात. ही पोषणतूट दीर्घकाळ कायम राहिली, तर डोळ्यांच्या नसांमध्ये नुकसान होऊ शकते आणि त्यामुळे अंधत्वाचा धोका निर्माण होतो.

मुलांच्या डोळ्यांचे आरोग्य टिकवण्यासाठी त्यांच्या आहारात गाजर, पालक, दूध, अंडी, अक्रोड आणि मासे यांसारख्या पदार्थांचा समावेश करणे गरजेचे आहे. संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैली स्वीकारल्यास डोळ्यांची दृष्टी कमी होण्यापासून मोठ्या प्रमाणात बचाव करता येतो. याशिवाय डोळ्यांची नियमित तपासणी डोळ्यांच्या डॉक्टरांकडून करून घेणे आणि तज्ज्ञ नेत्ररोगतज्ज्ञांच्या सल्ल्याने डोळ्यांचे व्यायाम करणे उपयुक्त ठरते.

# या ५ प्रश्नांची उत्तरं द्या आणि जाणून घ्या तुम्ही कोण आहात; ट्रॅड वाईफ की बॉस

आजच्या जमान्यातल्या मुलींची ओळख कोणत्यातरी एका चौकटीत बसू शकत नाही. काही स्त्रियांसाठी आपलं घर, कुटुंब, नातेसंबंध आणि मित्र मैत्रिणी हे महत्त्वाचं वाटतं. नाती आणि पारंपरिक मूल्यांना अग्रभागी ठेवणाऱ्या स्त्रियांना 'ट्रॅड वाईफ' असं संबोधलं जातं. दुसरीकडे आहेत बॉस बेब्ज् किंवा बॉस लेडी! या प्रकारच्या स्त्रिया स्वतःचं करिअर, आत्मनिर्भर वृत्ती आणि स्वतःच्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देतात. अशा स्त्रियांसाठी व्यक्तिमत्त्व विकास आणि आर्थिक स्वातंत्र्य या गोष्टी जास्त महत्त्वाच्या वाटतात.

खरंतर ही अशी तुलना करणं काही खरं नाही. फार ढोबळ मानाने याकडे बघायला गेलं तर लक्षात येईल की बहुतांश स्त्रिया आधी उल्लेख केलेल्या दोन्ही प्रकारच्या व्यक्तिमत्त्वाचं मिश्रण असल्यासारख्या असतात. काही जणी घरी सणावारी उत्तम स्वयंपाक करतात आणि त्याचवेळी ऑफिसमध्ये नव्या प्रोजेक्टसाठी दमदार पीचिंग करत



असतात. तसंच पूर्णवेळ गृहिणी असलेल्या स्त्रिया एनर्जेटिक असतात.

घर आणि घरातल्यांची आवश्यक ती काळजी घेताना महत्त्वाचे सगळे आर्थिक व्यवहार, आजारपण आणि इतर नियोजनही यशस्वीपणे पार पाडत असतात. आता या दोन्ही प्रकारच्या व्यक्तिमत्त्वांचा तुमच्या मनात गोंधळ उडाला असेल तर या ५ प्रश्नांची उत्तरं द्या... चुटकीसरशी उत्तर मिळेल.

### सकाळी उठल्यावर तुमच्या मनात सर्वात आधी काय येते?

जर तुम्ही तुमच्या दिवसाची सुरुवात कुटुंबाच्या गरजा पूर्ण करून केली, जसे की नाश्ता बनवणे किंवा घरातील कामे करणे, तर हे ट्रॅड वाईफ असल्याचं लक्षण आहे.

दुसरीकडे, जर तुमची सकाळ लॅपटॉप, मीटिंग्ज किंवा ईमेल पाहण्याने सुरू होत असेल आणि तुमच्या मनात फक्त याच गोष्टी येत असतील, तर तुम्ही बॉस लेडी किंवा बॉस बेब आहात.

### तुमची प्राथमिकता काय आहे?

तुमच्या पतीचा आणि कुटुंबाचा आनंद तुमच्या जगाचा केंद्रबिंदू आहे की तुमची करिअरची ध्येयं आणि स्वतःची वाढ ही तुमची प्राथमिकता आहे? या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला सांगेल की तुम्ही कोण आहात.

### पैशाबद्दल तुमचे काय मत आहे?

एक ट्रॅड वाईफ बहुतेकदा जोडीदाराच्या उत्पन्नावर आणि घरातील बचतीवर लक्ष केंद्रित करते. बॉस बेब स्वतः पैसे कमवण्यावर, गुंतवणूक करण्यावर आणि आर्थिक स्वातंत्र्यावर विश्वास ठेवते. बऱ्याच ट्रॅड वाईफ नोकरी करत नाहीत, पण बॉस बेब्स नोकरीशिवाय जगू शकत नाहीत.


### तुमची वैयक्तिक शैली कशी आहे?

जर तुम्हाला साधी आणि कुटुंबासाठी अनुकूल शैली आवडत असेल तर तुम्ही पारंपारिक विचारसरणीच्या आहात. परंतु जर तुम्ही फॉर्मल पेहराव, नेटवर्किंग आणि वैयक्तिक ब्रँडिंगकडे लक्ष दिले तर ही बॉस बेबची ओळख आहे.

### तुम्ही स्वतःला कुठे पाहता?

जर तुम्ही तुमच्या भविष्यातील चित्रात स्वतःला कुटुंबाने वेढलेल्या, घराची जबाबदारी घेणाऱ्या आणि नातेसंबंधांमध्ये मनःशांती शोधणाऱ्या असाल तर ही ट्रॅड वाईफची लक्षणं आहेत . जर तुम्हाला ऑफिसमध्ये, बिझनेस मीटिंगमध्ये किंवा तुमच्या कामा

# कुटुंब चालले जग प्रवासाला



भारतीय नौदलाचे निवृत्त कॅप्टन गौरव गौतम, त्यांची पत्नी वैदेही आणि मुलगी काया हे तिघे मिळून रीवा प्रोजेक्ट या नावाने एका छोट्या सेलबोटवरून जग प्रवासाला निघाले आहेत. हिमाचल प्रदेशातील सोलन येथे जन्मलेले आणि महाराष्ट्राचे जावई असलेले कॅप्टन गौरव गौतम हे नौदलातील अनुभवी अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या पत्नी वैदेही चिटणवीस या मूळच्या नागपूरच्या असून त्या काही काळ मीडिया पर्सन म्हणून काम करत होत्या. त्यांच्या आयुष्याचा बराचसा कालावधी भारतीय नौदलात गेला असून, त्यांनी कारकिर्दीत अनेक महत्त्वाच्या मोहिमांचे नेतृत्व केले. गौरव यांनी भारतीय नौदलाच्या पहिल्या टॉल शिप म्हणजेच आयएनएस तरंगिणी या सेलबोटचे कमांडिंग ऑफिसर म्हणून काम केले असून २०१५ मध्ये झालेल्या युरोपमधील टॉल शिप्स रेसमध्ये त्यांनी नौदलाचे नेतृत्व केले होते. त्या काळातच त्यांच्या मनात समुद्रावर दीर्घकाळ राहून जग प्रवास करण्याची प्रेरणा निर्माण झाली.

गौरव यांनी जुलै २०२२ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि त्यानंतर पत्नी व मुलीसह जग प्रवासाला निघण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या प्रवासासाठी त्यांनी रिवा नावाची ४२ फुटांची टायाना व्हॅन्कुव्हर ४२ मॉडेलची खास सेलबोट निवडली. ही बोट त्यांनी मलेशियामध्ये तयार करून घेतली आणि सप्टेंबर २०२२ पासून समुद्रावरचे जीवन प्रत्यक्षात आणले. रिवाही त्यांची केवळ बोट नाही, तर त्यांचे घरच बनली आहे. गौतम आणि त्यांचे कुटुंब सध्या पूर्णपणे समुद्रावर राहते. त्यांच्या बोटीवर सौरऊर्जा आणि वाऱ्याच्या साहाय्याने वीजनिर्मिती होते, ज्यामुळे त्यांना दीर्घकाळ किनाऱ्यापासून दूर राहता येते. या बोटीत त्यांनी एक छोटेसे घरच बनवलेले आहे. त्यामध्ये एक छोटा हॉल, किचन आणि बेडरूमचा समावेश असून त्यामध्ये अटॅच टॉयलेट, बाथरूमचीही सोय आहे.

या प्रवासादरम्यान त्यांनी थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया, बोर्निओ आणि अंदमान परिसरातील अनेक बेटांवर थांबे घेतले आहेत.



# हेअर डायमुळे मूत्रपिंड धोक्यात?

डॉ. दीपा उसुलुमार्टी

बरेच लोक आपले पांढरे केस लपविण्यासाठी तसेच तरुण दिसण्यासाठी रासायनिक घटकांचा समावेश असलेले केसांचे तयार रंग वापरतात. हे रंग कॉस्मेटिकदृष्ट्या फायदेशीर ठरत असले, तरी वारंवार आणि दीर्घकाळ वापरल्याने हे आरोग्यासंबंधित धोके निर्माण करू शकतात.

बहुतेक केसांच्या कृत्रिम रंगांमध्ये पॅरा फेनिलेने डायमाईन (पीपीडी), अमोनिया, रेसोर्सिनॉल आणि लीड एसीटेटसारखी रसायने असतात. हे आपल्या टाळूद्वारे शरीरात शोषले जाऊ शकतात किंवा श्वासाद्वारे आत घेतले जातात. ते हळूहळू शरीरात जमा होतात आणि नंतर डिटॉक्सिफिकेशनमध्ये सहभागी असलेल्या अवयवांवर विशेषतः मूत्रपिंडांवर परिणाम करतात.

आपल्या मूत्रपिंडांचे मुख्य कार्य म्हणजे रक्त शुद्ध करणे आणि शरीरातील अतिरिक्त पाणी आणि कचरा (टाकाऊ पदार्थ) बाहेर टाकणे. केसांच्या रंगांमधील रसायनांच्या वारंवार संपर्कामुळे मूत्रपिंडावर अधिक भार येऊन त्यांना अधिक काम करण्यास भाग पाडले जाते, ज्यामुळे मूत्रपिंडाचे नुकसान होऊ शकते. कालांतराने यामुळे दीर्घकालीन मूत्रपिंडाचा आजार किंवा मूत्रपिंड निकामी होण्याचा धोका वाढू शकतो.

काही व्यक्तींमध्ये पीपीडीमुळे त्वचेची ॲलर्जी आणि शरीरातील रंगपेशींना इजा होते. अमोनिया आणि रेसोर्सिनॉल आपल्या त्वचा आणि श्वसनसंस्थेवर परिणाम करतात. काही हेअर डाय उत्पादनांमध्ये लेड एसीटेटचा वापर केला जातो त्याचा परिणाम अवयवांवर होतो. हे रंग परवडणारे आणि व्यापकपणे उपलब्ध असले तरी, त्याच्या दीर्घकालीन वापरामुळे आरोग्य समस्या उद्भवण्याची शक्यता असते.

याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी पीपीडी, अमोनिया किंवा तत्सम घातक रसायने असलेले केसांचे रंग टाळा. अशावेळी प्लांट बेस किंवा हर्बल पर्याय निवडा आणि नेहमी त्यावरील लेबल तपासा. केसांना रंग करताना हँडग्लोव्हज वापरा आणि त्वचा कमीत कमी संपर्क येईल याचा प्रयत्न करा. हेअर डाय करणाऱ्यांसाठी नियमित मूत्रपिंड कार्य तपासण्यासाठी विविध चाचण्या करण्याचा सल्ला दिला जातो.

योग्य जीवनशैली बाळगणे - आहारातील मिठाचे प्रमाण कमी करावे आणि प्रक्रिया केलेले पदार्थांचे सेवन टाळावे. फळे आणि भाज्यांनी समृद्ध आहाराचे सेवन करावे. सौंदर्यप्रसाधनांमध्ये अनावश्यक रासायनिक घटकांशी संपर्क टाळावा आणि मूत्रपिंडाच्या कार्याचे रक्षण करावे. तुमच्या डॉक्टरांचा वेळोवेळी सल्ला घ्यावा व नियमित तपासणी करावी.

प्रत्येकाला आपण चांगले दिसावे असे वाटते; मात्र त्यासाठी आरोग्याशी तडजोड करू नये. मूत्रपिंडास होणारे नुकसान हे अनेकदा सुरुवातीच्या टप्प्यात आढळून येत नाही. वापरत असलेल्या उत्पादनांबद्दल जागरूक राहणे आणि त्यादृष्टीने सक्रिय पाऊल उचलणे हे महत्त्वाचेआहे.

**त्वचा उजळविणाऱ्या क्रीम्स**

त्वचा उजळविणाऱ्या अनेक क्रीम्समध्ये पारा, हायड्रोक्विनोन किंवा स्टिरॉइडस् असतात, ज्यामुळे गंभीर आरोग्य धोके निर्माण होऊ शकतात. विशेषतः पारा हा एक जड धातू आहे जो मूत्रपिंडात साचून राहतो, ज्यामुळे कालांतराने मूत्रपिंडाचे कार्य बिघडू शकते. या क्रीम्सचा वापर अनेकदा वैद्यकीय देखरेखीशिवाय करू नये.दीर्घकालीन वापराने पाऱ्याची विषबाधा होऊ शकते, ज्यामध्ये थकवा येणे, सूज किंवा लघवीमध्ये बदल यासारख्या मूत्रपिंडाचे नुकसान होणारी लक्षणे आढळून येतात.

जर अशा क्रीम्स वारंवार वापरल्या गेल्या तर हा धोका आणखी वाढतो. म्हणून त्वचाविकार तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय कोणत्याही क्रीम्स वापरू नका आणि सुरक्षित पर्यायांसाठी त्वचाविकारतज्ज्ञांचा सल्ला घ्या.

# भारत मार्ग कसा काढणार?



ट्रम्प यांनी लादलेल्या 'टेरिफ वॉर' बाबत भारतासाठी सर्वात चांगला मार्ग म्हणजे धोरणात्मक स्वायत्तता स्वीकारणे. म्हणजे अमेरिका किंवा चीनपैकी कोणत्याही एका राष्ट्रासोबत पूर्णपणे जोडले न जाणे. भारताने एकाच भागीदारावर अवलंबून राहू नये. पुरवठा साखळी लवचिक बनविण्यासाठी युरोपियन युनियन, जपान, आसियान आणि इतर राष्ट्रांसोबतचे व्यापार आणि गुंतवणुकीचे संबंध वाढवणे आवश्यक आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या टैरिफ युद्ध किंवा आयात कर युद्धातून मार्ग कसा काढायचा? त्यासाठी दोन खराब पर्याय आपल्यासमोर आहेत. अमेरिका आणि चीनपैकी एकाची निवड करावी लागेल अमेरिकेने काही आयातींवर २५ टक्के शुल्क लादले आहे. ज्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे हे कर अमेरिकेतील उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी असले तरी त्या भारताच्या स्पर्धात्मकतेला धोका निर्माण करत आहेत आणि भारताच्या आर्थिक विकासाला बीळ घालू शकतात.

ट्रम्प यांच्या 'टॅरिफ'चाया जकातींचा थेट परिणाम भारतातील कापड. रत्ने, वाहन सुटे भाग आणि सी-फूड यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांवर होत आहे. त्यामुळे अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत वार्षिक १६-४० अब्ज डॉलरची घट होऊ शकते याचा परिणाम म्हणून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीमध्ये ०२ ते १ टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता आहे गार्मेंट आणि हस्तकला यांसारख्या उद्योगांचा कणा असलेल्या लहान आणि मध्यम उद्योगांना सर्वाधिक धोका आहे. वाढलेला खर्च आणि कमी झालेल्या ऑर्डर्समुळे नोकऱ्यांचे नुकसान होऊ शकते कारण या उद्योगांकडे लवकर नवीन बाजारपेठा शोधण्यासाठी किंवा परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक संसाधनांची कमतरता असते

निर्यातीमध्ये घट झाल्यामुळे भारताची व्यापार तूट वाढेल. ज्यामुळे रुपयावर दबाव येईल. त्यामुळे आयातीचा खर्च आणि महागाई वाढू शकते. शेअर बाजारातही अस्थिरता येऊ शकते, ज्यामुळे परदेशी गुंतवणूकदार अधिक सावध होतील.रत्ने आणि दागिने, कापड आणि ऑटो कंपोनंट्स यांसारख्या प्रमुख निर्यात क्षेत्रांवर या जकातींचा मोठा परिणाम होण्याची अपेक्षा आहे. फार्मास्युटिकल्स आणि इलेक्ट्रॉनिक्सवर अद्याप परिणाम झाला नसला तरी जकातींचा विस्तार झाल्यास भारताच्या उत्पादन मूल्य साखळीसुधारण्याच्या महत्त्वाकांक्षेला धोका निर्माण होऊ शकतो.या आव्हानांना तोंड देण्यासाठी भारत सरकार विविध उपायांद्वारे परिणाम कमी करण्याचा प्रयत्न करत आहे.

# हेकेखोरपणा ही एक मानसिकता

मीनाक्षी जगदाळे

अनेकदा आपल्या आजूबाजूलासुद्धा आपण असे लोक बघतो जे कायम स्वतःच खरं करतात. अगदी कोणीही कितीही अनुभवी व्यक्तीने सल्ला दिला, मार्गदर्शन केले तरी काही व्यक्ती ते समजून उमजून घेण्याच्या मानसिकतेतच नसतात. अशा लोकांना स्वतःला स्वतःच्या चुकांचा, अविचारी निर्णयांचा खूप त्रास होतो पण विनाशकाले विपरीत बुद्धी या उक्तीनुसार नुकसान होत असलं तरी ते अजिबात स्वतःमध्ये बदल करत नाहीत. एकदा आजूबाजूच्या सगळ्यांना असे भावनिक, मानसिक ब्लॅकमेल करून आपला कोणताही अट्टाहास पचू शकतो हे सिद्ध झाल्यावर ही व्यक्ती खूप आत्मविश्वासाने स्वतःच्या चुकांचे प्रमाण वाढवत नेते. अशा व्यक्तींच्या चुकांमुळे, चुकीच्या व्यवहारामुळे, वागण्यामुळे त्याचे स्वतःचे शारीरिक मानसिक स्वास्थ्य हरवतेच पण असे लोकं यासाठी मी जबाबदार आहे असं मान्य न करता वेळोवेळी कोणाचेही नाव पुढे करून त्याच्यावर आपल्या अपयशाच खापर फोडतात. हेकेखोरपणा अशा स्वभावामागील मानसिकतेचे सविस्तर कारण आणि त्यांच्या स्वभावामागे असलेल्या घटना या लेखामार्फत आपण जाणून घेणार आहोत.

मी म्हणतो तेच खरं अशा व्यक्तींच्या स्वभावात अनेक गुंतागुंतीची मानसशास्त्रीय कारणे दडलेली असू शकतात. बाह्यतः ही व्यक्ती हट्टी, दुर्लक्ष करणारी किंवा अहंकारी वाटू शकते. अशा व्यक्तीमध्ये काही ठरावीक मानसिक वैशिष्ट्ये दिसून येतात ते म्हणजे असुरक्षितता आणि भीती हा एक मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. अशा लोकांच्या मनात एक प्रकारची खोलवर रुजलेली असुरक्षितता असते. त्यामुळे, कोणत्याही कोणाच्याही सल्ल्याला किंवा मार्गदर्शनाला ते स्वतःवरचा हल्ला मानतात आणि त्याला विरोध करतात. त्यांच्या मते, दुसऱ्याचे मार्गदर्शन स्वीकारणे म्हणजे स्वतःची कमी कबूल करण्यासारखं आहे. दुसरे म्हणजेच नियंत्रण गमावण्याची भीती यांच्यामध्ये असते. दुसऱ्यांनी दिलेला सल्ला स्वीकारणे म्हणजे आपल्या आयुष्याचा ताबा दुसऱ्यांच्या हातात देण्यासारखं त्यांना वाटतं. ही नियंत्रण गमावण्याची भीती



इतकी जास्त असते की, चुकीच्या मार्गावर असूनही ते स्वतःच्याच निर्णयावर ठाम राहतात. 'सत्य' आणि 'मी' यांची एकरूपता हा एक पैलू अशा लोकांमध्ये आढळतो. अशा व्यक्तीसाठी 'सत्य' हे त्यांच्या स्वतःच्या विचारांशी आणि कृतींशी जोडलेलं असतं. त्यांच्या मते, 'मी जे करतोय तेच बरोबर आहे' आणि 'मी जो आहे तोच बरोबर आहे'. त्यामुळे, त्यांच्या विचारांना किंवा कृतींना आव्हान देणे म्हणजे त्यांच्या अस्तित्वालाच आव्हान देणे होय. जर कोणी त्यांच्या मताला, विचारांना, निर्णयाला आडवं गेलं, विरोध केला, त्यांना जे आवडत नाही, पटत नाही ते केल तर हे लोक त्यांच्याशी संपर्क तोडतात. त्यांच्या मनाविरुद्ध वागणारी जितकी लोक असतील त्यांच्यामध्ये फूट पाडण्यासाठी हे पूर्ण प्रयत्न करतात. आपल्या भूमिकेच्या आड येणारे आपले शत्रू आहेत, विरोधक आहेत अशी त्यांची मानसिकता असते आणि त्यामुळे आपल्या विरोधात अनेक लोकांचे एकमत होऊ नये आणि आपल्यावर सामूहिक हल्ला आपल्या वागणुकी विरोधात होऊ नये यासाठी ते पूर्ण प्रयत्न करतात. आपल्या इच्छेविरुद्ध वागणाऱ्या प्रत्येकाला ते आपला शत्रू मानत असल्यामुळे त्याची इतरांमध्ये बदनामी करणे, त्याच्या बद्दल अफवा पसरवणे, गटबाजी करणे, एखाद्याला एकटे पाडणे, त्याला टार्गेट करणे यातून हे लोकं स्वतःच्या चुकांना झाकण्याचा प्रयत्न करतात.चुका स्वीकारण्याची अक्षमता हा सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा या लोकांना कोणत्याही थराला नेण्यासाठी कारणीभूत असतो. आपल्या चुका मान्य करणे हे एक प्रकारचं मानसिक धैर्य आहे. पण, अशा व्यक्तीमध्ये हे धैर्य नसतं. त्यांना असं वाटतं की चूक स्वीकारणे म्हणजे पराभव स्वीकारणे. स्वतःला आणि इतरांना त्रास झाला तरी, ते या गोष्टी गांभीर्याने घेत नाहीत कारण त्यांना हे मान्य करायचं नसतं की त्यांची कृती, त्यांचा निर्णय चुकीचा होता.

ते अनेक गंभीर गोष्टी उडवून लावतात, जेणेकरून त्यांना आपल्या चुकीचा सामना करावा लागणार नाही. आपल्या चुकीकडे कोणाचे लक्ष जाण्याअगोदर ते या चुकीचं खापर फोडण्यासाठी एखादा बळीचा बकरा शोधून ठेवतात. त्यांच्या नियंत्रणाबाहेर कोणतीही गोष्ट जाते आहे अस लक्षात आल्यास हे लोक ताबडतोब एखादी मन घडत कहाणी रचून इतरांच्या गळी उतरवतात आणि स्वतःची बाजू सुरक्षित करतात. अशा प्रकारच्या मानसिकतेची पाळे मुळे त्या व्यक्तीच्या बालपणात किंवा तिच्या मागील अनुभवांमध्ये दडलेली असू शकतात त्यावर नजर टाकणे गरजेचे आहे.

'संरक्षण यंत्रणा' अशा व्यक्ती वारंवार काही विशिष्ट संरक्षण यंत्रणांचा वापर करतात. जसे की 'नकार'. ते समस्या अस्तित्वातच नाहीये असं मानतात, जेणेकरून त्यांना त्या समस्येचा सामना करावा लागणार नाही. तुम्ही ज्या गोष्टीला समस्या किंवा त्रास म्हणत आहात तो माझ्या लेखी त्रास नाहीच आहे कोणतीही समस्या नाहीच आहे असं ते इतरांना पटवून देतात. कोणतीही चुकीची घटना घडल्यावर पण हे असे झालेच नव्हतेच हे माझ्यामुळे नाही झाले याला कारणीभूत भलतीच व्यक्ती होती. या पद्धतीने पटवून देण्यात हे लोक माहीर असतात. जे कोणी अशा लोकांना काही गंभीर चुकांचे, घटनांचे भविष्यात होणारे गंभीर परिणाम लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करतो त्याला हे लोक वेसण घालण्याचा प्रयत्न करतात. अशा लोकांकडून अनेकदा त्यांच्या आजूबाजूच्या लोकांना खूप मर्यादा घातल्या जातात, बंधनात ठेवले जाते, इतरांवर लक्ष आणि नजर ठेवली जाते.

इतरांचे वागणे, बोलणे कंट्रोल करून इतरांमध्ये फूट पाडून ही व्यक्ती स्वतःला सुरक्षित समजते.

अशा व्यक्तीला मदत करण्यासाठी, तिच्या वर्तनाला केवळ 'चुकीचे' ठरवण्याऐवजी, त्यामागची खरी कारणे समजून घेणे महत्त्वाचे असते. अशा व्यक्ती, अशा मानसिकतेमधून जाणारी कुटुंब यांच्यासाठी समुपदेशन, एकमेकांशी मोकळा संवाद साधने, सतत बोलत राहणे, परस्परांना समजावून घेणे गरजेचे आहे.

# ड्रोन हल्ल्यांविरोधी कवच

हेमंत महाजन

युद्धात ड्रोनचा वाढता वापर पाहता आता ड्रोन हल्ल्यांविरोधी कवच उभारणीला प्राधान्य देणे गरजेचे आहे. रिफायनरी, डेटा सेंटर्स आणि अणुवीज प्रकल्पांवर संभाव्य ड्रोन हल्ल्यांविरोधी संरक्षण कवच पाहिजेच.

**पाकिस्तानची नवी धमकी**

पाकिस्तानचे सैन्यप्रमुख जनरल आसिम मुनीर यांनी नुकतेच अमेरिकेच्या भूमीवरून भारताला धमकी दिली की, भारत-पाकिस्तानमध्ये अणुयुद्ध होऊ शकते. त्यांच्या या विधानामुळे जागतिक समुदाया मध्ये चिंता निर्माण झाली आहे. त्यांनी भारतावरील हल्ल्याचा उल्लेख करताना विशेषत: जामनगर (गुजरात) येथील जगातील सर्वात मोठ्या रिफायनरी प्रकल्पावर (क्षमता- सुमारे १.२४ दशलक्ष बॅरल प्रतिदिन) ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या मदतीने हल्ला करण्याची धमकी दिली. यामुळे भारताच्या सामरिक व औद्योगिक केंद्रांवर ड्रोन हल्ल्याचा धोका गंभीर आहे, हे पुन्हा एकदा समोर आले आहे.

**ड्रोनचा युद्धासाठी वाढता वापर**

आजच्या आधुनिक काळातील युद्धात ड्रोन्स हे सर्वात प्रभावी व स्वस्त शस्त्र बनले आहेत. रशिया-युक्रेन युद्ध याचे स्पष्ट उदाहरण आहे.

**भारतावरील थेट धोका**

भारताच्या बाबतीत, पाकिस्तान गेल्या काही वर्षांत पंजाब सीमेतून मोठ्या प्रमाणात ड्रोनद्वारे अफू, गांजा, चरस व शस्त्रे घुसवण्याचे प्रयत्न करत आहे. २०२३ मध्येच पंजाब पोलिसांनी आणि बीएसएफने मिळून ५०० हून अधिक ड्रोन भारतीय सीमेवर जप्त केले. ही संख्या २०१९ च्या तुलनेत तब्बल अनेक पट जास्त आहे. हे आकडे या धोक्याची तीव्रता अधोरेखित करतात.

आता पाकिस्तानकडून जर भारताच्या सामरिक ठिकाणांवर- जसे, रिफायनऱ्या, विमानतळ, डेटा-सेंटर्स, अणुवीज प्रकल्प किंवा मोठी शहरे यावर हल्ल्याचा धोका निर्माण झाला, तर प्रतिकार करण्यासाठी एक अत्याधुनिक संरक्षण-व्यवस्था आवश्यक आहे.



याच पार्श्वभूमीवर, १५ ऑगस्ट २०२५ रोजी लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनी भाषण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी ड्रोन व क्षेपणास्त्र विरोधी संरक्षण कवच उभारण्याची महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली. त्यांनी स्पष्ट केले की, पुढील दहा वर्षांत भारतातील सर्व महत्त्वाची सामरिक केंद्रे आधुनिक प्रणालीखाली आणली जातील.

ही योजना टप्प्याटप्प्याने राबवली जाणार असून, प्रथम टप्प्यात सीमाभाग, रिफायनऱ्या व मोठी शहरे कव्हर केली जातील. २०३५ पर्यंत पूर्ण भारतावर बहुस्तरीय हवाई सुरक्षा कवच उभारण्याचे लक्ष्य आहे. भारताला सर्वसमावेशक व स्वदेशी हवाई संरक्षण व्यवस्था उभारणे ही काळाची गरज आहे.

**ड्रोन, सायबर आणि युद्ध सावट : भारताच्या ऊर्जा सुरक्षेची नवी लढाई**

मे २०२५ मधील ऑपरेशन सिंदूर या कारवाईदरम्यान भारताच्या पश्चिम आणि उत्तरेकडील सीमेजवळील ऊर्जा केंद्रे शत्रूच्या हल्ल्यांच्या कक्षेत असल्याचे स्पष्ट झाले. यामुळे ऊर्जा सुरक्षिततेला राष्ट्रीय संरक्षणाच्या चौकटीत आणणे अपरिहार्य आहे.

**ऊर्जा पायाभूत सुविधांवरील वाढती असुरक्षितता**

युद्धाचे स्वरूप बदलत आहे. पारंपरिक शस्त्रास्त्रांऐवजी आता मानवरहित ड्रोन, सायबर साधने आणि माहिती युद्ध यांचा वापर वाढतो आहे. ऊर्जा केंद्रे थेट युद्धभूमीचे लक्ष्य बनू शकतात हे अधोरेखित झाले.

**सायबरहल्ल्यांचे वाढते प्रमाण**

ऊर्जा सुरक्षेला मोठा धोका आता सायबर हल्ल्यांमुळे आहे.

**आंतरराष्ट्रीय चित्र**

अमेरिकेतील उेश्रेपळरश्र झळशिश्रळपश (२०२१) वर झालेल्या रॅन्समवेअर हल्ल्यामुळे देशाच्या पूर्व किनाऱ्यावरील ४५ज इंधन पुरवठा ठप्प झाला. सायबरसुरक्षा कंपनी डेहीं च्या अहवालानुसार २०२४ मध्ये जगभरातील ऊर्जा, तेल-गॅस व युटिलिटी क्षेत्रांपैकी ६७% संस्थांवर रॅन्समवेअर हल्ले झाले.

**भारतातील आकडे**

भारत आपले ८८% कच्चे तेल आणि ५०% एलएनजी आयात करतो, त्यामुळे कोणताही अडथळा थेट अर्थव्यवस्थेवर परिणाम करतो.

२०२२ मध्ये भारतातील पेट्रोलियम रिफायनऱ्यांवर ३.२ लाखांहून अधिक सायबरहल्ले नोंदले गेले.

एप्रिल २०२५ मधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतावरील ऊऊेड हल्ल्यांमध्ये मोठी वाढ झाली. त्यातील ६६ज हल्ले ऊर्जा क्षेत्रावर केंद्रित होते.

कोल इंडिया लिमिटेडच्या उपकंपनीवर हॅकिंगचा प्रयत्न झाला, तर २०२० आणि २०२२ मध्ये चीनशी संबंधित सायबर गटांनी मुंबई व लडाखमधील वीज वितरण व्यवस्थेत मालवेअर बसवले.

**भारताची ऊर्जा सुरक्षा**

भारताची वाढती अर्थव्यवस्था ऊर्जा आयातीवर प्रचंड अवलंबून आहे. देशातील एकूण तेल आयातीपैकी ४० टक्के तेल हार्मुझ सामुद्रधुनीमार्गे येते. या मार्गात अडथळा निर्माण झाला तर आर्थिक संकट उभे राहते.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने ड्रोन आणि क्षेपणास्त्र अडवले, पंजाबमधील सीमावर्ती भागांत वीजपुरवठा बंद करून इंधन पाइपलाइन व वितरण यंत्रणा वाचवावी लागली. यावरून स्पष्ट होते की ऊर्जा सुरक्षेला संरक्षणाच्या चौकटीत प्राथमिकता दिली जावी.

**भारताची अपुरी साठवण व्यवस्था**

ऊर्जा सुरक्षेसाठी भारताने डींरींशसळल झशींश्रशीं ठशीशींशी (डझठ) उभारले आहेत. पण त्यात त्रुटी आहेत. २०२४ च्या सुरुवातीला डझठ मध्ये फक्त ५.३३ दशलक्ष टन तेल होते, जे भारताच्या आयातीच्या ९.५ दिवसांसाठी पुरेसे आहे. सार्वजनिक तेल कंपन्यांच्या साठ्यासह ही वेळ ७४ दिवसांपर्यंत जाते, पण आणीबाणीच्या वेळी केवळ डझठ साठाच तातडीने वापरता येतो.

आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या निकषानुसार ९० दिवसांचा साठा आवश्यक आहे. मात्र, भारताकडे प्रत्यक्षात त्याची पूर्तता नाही. कारण, यावर खर्च खूप होतो. विद्यमान डझठ केंद्रे विशाखापट्टणम, मंगळुरू आणि पडूर येथे समुद्रकिनाऱ्यावर आहेत. त्यामुळे ती क्षेपणास्त्र हल्ल्यांना व नैसर्गिक आपत्तीपासून असुरक्षित आहेत. ऊर्जा क्षेत्राला केवळ व्यावसायिक नाही तर लष्करी सुरक्षेच्या चौकटीत समाविष्ट करणे आवश्यक आहे.

**१. विकेंद्रीकरण :** सीमावर्ती भागांत मायक्रोग्रीड्स व नूतन ऊर्जा प्रणाली उभारल्यास केंद्रित वितरण यंत्रणांवरील अवलंबन कमी होईल.